विद्यापीठ अनुदान आयोग

(UNIVERSITY GRANTS COMMISSION)

संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती

अंतर्गत

लघु संशोधन प्रकल्प

(MINOR RESEARCH PROJECT REPORT)

विषय-

# "भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील वर्धा जिल्हयातील योगदान"

"Bhartiya Swatantrya Aandolanatil Wardha Jilhyatil Yogdan"





Bapu Kuti





- संशोधक-

डॉ. स्मिता मनोहरराव जाधव

एम.ए.एम.फिल.पीएच.डी.

(इतिहास विभाग प्रमुख)

कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा

ता. तिवसा जि.अमरावती (म.रा.)

# विद्यापीठ अनुदान आयोग

(UNIVERSITY GRANTS COMMISSION)

**संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती**

**अंतर्गत**

# लघु संशोधन प्रकल्प

## विषय

“भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील वर्धा जिल्हयातील योगदान”

“Bhartiya Swatantrya Aandolanatil Wardha Jilhatil Yogdan”

संशोधक

**डॉ. स्मिता मनोहरराव जाधव**

एम.ए., एम.फिल. पीएच.डी.

इतिहास विभाग प्रमुख

कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा

ता.तिवसा जि.अमरावती (म.रा.)

# ऋणनिर्देश

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, पुरस्कृत 'इतिहास' विषयातील लघुसंशोधन प्रकल्पाचा माझा विषय ''भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील वर्धा जिल्ह्यातील योगदान'' हा असून मी प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण केले आहे. भारताच्या इतिहासातील स्वातंत्र्यलढा हे एक तेजस्वी क्रांतीपर्व होय. या स्वातंत्र्यलढ्याचे अध्ययन करतांना असे लक्षात आले की, भारतावर इंग्रजांचे राज्य असतांना 'वर्धा जिल्हा' भारताच्या राजकीय क्षितीजावर अतिशय प्रसिद्ध झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात पुकारण्यात आलेल्या अनेक चळवळीमध्ये जिल्ह्याने उल्लेखनीय भूमिका बजावली. तसेच येथून विविध रचनात्मक कार्य झाले तेही दृष्टीसमोर आले. त्याविषयीचा समग्र अभ्यास करण्यासाठी मी उपरोक्त विषय निश्चित केला.

माझ्या संशोधन कार्याला प्रत्यक्ष सुरुवात झाल्यापासून मला ज्यांचे अमूल्य मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्यांचा नाम व ऋणनिर्देश करणे मला महत्वाचे वाटते.

माझ्या लघुसंशोधन प्रकल्पाच्या प्रस्तावाला मान्यता देवून अर्थपुरवठा करणारे विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व विभागीय कार्यालय, पुणे यांचे मी सर्वप्रथम आभार मानते.

आमच्या श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अरुणभाऊ अडसड, महाविद्यालयाच्या स्था. व्य. समितीचे अध्यक्ष, श्री. सुरेशभाऊ मुंधडा तसेच संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी यांनी माझ्या संशोधन कार्यास सहकार्य केल्याबद्दल मी सर्वांचे मनस्वी आभार व्यक्त करते. माझे संशोधन कार्य सुरु असतांना आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. अरविंद देशमुख साहेब यांनी माझ्या संशोधन कार्यास सर्वतोपरी सहकार्य व मार्गदर्शन करून सतत प्रोत्साहित केले, त्याबद्दल त्यांचे मनस्वी आभार.

संशोधनाकरिता मला वेळोवेळी ग्रंथसंपदा उपलब्ध करुन देणाऱ्या व मार्गदर्शन करणाऱ्या माझ्या महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. हर्षा कांबे व ग्रंथालय परिचर श्री. प्रदीप पवार यांची मी अत्यंत आभारी आहे.

संशोधन कार्याकरिता मला जी माहिती आवश्यक होती ती मिळण्याकरिता मी प्रश्नावली तयार केली ती प्रश्नावली भरुन देवून मला माहिती उपलब्ध करून देणारे सर्व उत्तरदाते यांचे मी शतशः आभारी आहे.

तसेच लोकमान्य वाचनालय, आर्वी, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ ग्रंथालय, राष्ट्रभाषा प्रचार समिती ग्रंथालय, वर्धा, गांधी ज्ञान मंदीर, वर्धा या सर्व ग्रंथालयांनी मला संशोधनाकरिता सर्वतोपरी मदत केली. तेथील ग्रंथपाल व ग्रंथालय प्रशासनाची मी अत्यंत आभारी आहे.

या संशोधन कार्याकरिता ज्यांनी मला वेळोवेळी प्रोत्साहित करुन सहकार्य केले, ते माझ्या महाविद्यालयातील डॉ. सुनिल आखरे (भूगोल विभाग प्रमुख) यांचे मी आभार व्यक्त करते. तसेच महाविद्यालयातील माझे सहकारी डॉ. विभा देशपांडे, डॉ.नीशा नायगांवकर, डॉ. उमेश राठी, प्रा. किशोर ताकसांडे, प्रा. अजय अभ्यंकर, डॉ. कीर्ती गांधी, प्रा. रंजनसेन शेंडे, प्रा. अंकुश अंबुरे या सर्वांचे मनस्वी आभार !

माझ्या महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वृंद, श्री. मनमोहन राठी, श्री. सुरेश अंबापुरे, श्री. दिलीप पाटील, श्री. गजानन बेहरे, श्री. विलास भोंगाडे, श्री. राजेश लोहे, सौ. सावित्री कुमरे या सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार !

याशिवाय ज्यांचे ऋण मी कधीही फेडू शकत नाही, ते माझे वडील श्री. मनोहरराव जाधव, आई सौ. मृदुला व भाऊ डॉ. प्रशांत जाधव यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व प्रेमळ आशीर्वाद यांमुळे माझे संशोधन कार्य पूर्णत्वास जाऊ शकले.

माझ्या संशोधन कार्याला सर्वतोपरी सहकार्य करुन सतत प्रोत्साहन देणारे माझे यजमान डॉ. गणेश मोहोड यांचे आभार शब्दात व्यक्त करणे मला अवघड आहे. भावनिक पाठबळाबरोबरच संशोधनाकरिता त्यांनी मला सतत मदत केली, शुद्धलेखनापासून तर प्रकल्प अहवालाच्या मांडणीपर्यंत त्यांनी मला केलेली मदत अतिशय मोलाची ठरली. त्यामुळे संशोधन कार्य पूर्णत्वास जाऊ शकले याची मला पूर्णः जाणीव आहे. त्यामुळे मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते.

माझा मुलगा चि. वेदान्त याने मला संशोधनाकरिता सतत प्रोत्साहित केले, त्याबद्दल त्याचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

थ्री-डी कॉम्प्युटर, आर्वीचे श्री. राम देशमुख यांनी प्रबंधाचे मुद्रण अल्पावधीत व सुबक रीतीने करून दिले त्याबद्दल त्यांचे आभार.

प्रस्तुत संशोधन कार्य सुरु असतांना ज्यांनी मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहकार्य केले, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानते. पुनश्च सर्वांच्या सहकार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करते धन्यवाद !

दिनांक :-

ठिकाण :-

**डॉ. स्मिता म. जाधव**
इतिहास विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय,कुऱ्हा
जि.अमरावती

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण - १ | वर्धा जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १ ते ९ |
| प्रकरण - २ | असहकार आंदोलनातील वर्धा जिल्हयाचे योगदान | १० ते २७ |
| प्रकरण - ३ | सविनय कायदेभंग व वैयक्तिक सत्याग्रहातील वर्धा जिल्हयाचे योगदान | २८ ते ४५ |
| प्रकरण - ४ | भारत छोडो आंदोलनातील सहभाग | ४६ ते ७२ |
| प्रकरण - ५ | रचनात्मक कार्याची प्रयोगभूमी-वर्धा जिल्हा | ७३ ते ९८ |
| प्रकरण - ६ | निष्कर्ष | ९९ ते १०० |
| | **परिशिष्ट्ये (Appendix)** | |
| | परिशिष्ट - १ प्रश्नावली | १०१ ते १०४ |
| | परिशिष्ट - २ छायाचित्रे | |
| | परिशिष्ट - ३ संदर्भ ग्रंथ सूची (References) | १०५ ते ११० |

# प्रकरण - १
# वर्धा जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**प्रस्तावना :-**

भारताच्या इतिहासातील 'स्वातंत्र्यलढा' हे एक तेजस्वी 'क्रांतीपर्व' होय. आधुनिक जगाच्या इतिहासातील हा सर्वाधिक प्रभावशाली आणि व्यापक लढा होता. या लढ्याने समाजाच्या सर्व स्तरातील आणि भिन्न भिन्न विचारप्रणालीच्या लाखो लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रेरणा तर दिलीच पण त्याचबरोबर स्वातंत्र्याकरिता कृतीप्रवण केले. पारतंत्र्याच्या शृंखलेतून भारताला मुक्त करण्यासाठी विविध वयोगटातील स्त्री-पुरुषांनी आपले तन-मन-धन अर्पण करुन बलाढ्य अशा ब्रिटीश साम्रज्याला आपल्यापुढे गुडघे टेकविण्यास भाग पाडले. स्वातंत्र्यप्राप्तीकरिता ध्येयप्रवण झालेल्या लोकांची विचारसरणी, कार्यपद्धती आणि मार्ग भिन्न-भिन्न असले तरी ध्येय मात्र एकच होते ते म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीचे. स्वातंत्र्यप्राप्तीकरिता आपले सर्वस्व अपर्ण करण्याची ही भावना देशात सर्वत्र होती व त्यात 'वर्धा जिल्हा' अग्रेसर होता.

भारतावर इंग्रजांचे राज्य असतांना वर्धा जिल्हा भारताच्या राजकीय क्षितीजावर अतिशय प्रसिद्ध झाला. स्वातंत्र्याच्या पूर्वतयारीकरिता संघटित स्वरुपाच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे, असा मूलमंत्र महात्मा गांधींनी लोकांना दिला व त्याची सिद्धता वर्धा या ठिकाणाहून झाली. महात्मा गांधींनी विहीत केलेल्या प्रणालीनुसार जी आंदोलने झाली त्यावेळीच नव्हे तर महात्मा गांधींचा भारताच्या राजकीय क्षितीजावर उदय होण्याच्या पूर्वीही वर्धा जिल्हा राष्ट्रवादी चळवळीचे केंद्रस्थान व स्फूर्तिस्थान होते. या जिल्ह्यात स्वातंत्र्यसेनानींची एक फार मोठी परंपरा उदयाला आली. या परंपरेत समाविष्ट असणाऱ्या सेनांनींनी भारतीय राष्ट्रवादाला खतपाणी दिले. या जिल्ह्यातील लोकांनी स्वातंत्र्यप्राप्तीकरिता पुकारलेल्या चळवळीत स्वतःचे सर्वस्व अर्पण केले. या जिल्ह्याने स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात जे योगदान दिले आणि चळवळींचे पोषण केले ते कार्य प्रस्तुत संशोधनकार्यातून अभ्यासण्यात आले आहे. या जिल्ह्याचे

हे महत्व जाणूनच महात्मा गांधींनी वेळोवेळी जिल्ह्याचा उल्लेख 'गौरवान्वीत गांव' असा केला.

महाराष्ट्रातील एक समृद्ध भौगोलिक प्रदेश तसेच ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्वपूर्ण प्रदेश म्हणजे 'विदर्भ'. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिकच नव्हे तर सांप्रतच्या काळातही या प्रदेशाचे अनन्यसाधारण महत्व आहे. वर्धा, नागपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, अमरावती,बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ हे आजच्या विदर्भातील जिल्हे विदर्भाचे वैभवच म्हणता येईल. त्यातील वर्धेच्या बाबतीत विचार करू जाता, हा भाग प्राचीन काळात मौर्य, शृंग, सातवाहन, वाकाटक, त्यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट, यादव राज, दिल्लीचे सुलतान, बहामनी शासक, गोंड राजे, मराठे, भोसले यांच्या साम्राज्यात मोडत होता.

वर्धा जिल्ह्यातील काही गावांना सम्राट अशोकाच्या काळापासूनचा वारसा लाभला आहे. याच परिसरातील 'प्रवरापूर' म्हणजेच आजचे 'पवनार' हे एकेकाळी वाकाटकांचे सत्ताकेंद्र होते. त्याचप्रमाणे मुस्लीम राजवटीच्या काळातील पाऊलखुणाही पवनार येथे आढळल्यात. डॉ. शा.मा.देव यांच्या मार्गदर्शनाखाली पवनार येथे जे उत्खनन झाले त्यात "देवनागरीतील १५१० ते १५५३ या काळातील बुऱ्हाण निजामशहाच्या काळातील शिलालेख आढळला. धाम नदीच्या तीरावर अरबी भाषेत बिस्मिल्ला लिहिलेली तांब्याची नाणीही मिळालीत."[१]

पवनार प्रमाणेच पोहणा, केळझर, गिरड, कापसी, ठाणेगांव, ढगा, मांडगाव, भिडी, कोटेश्वर येथे प्राचीन सांस्कृतिक वैभवाच्या पाऊलखुणा प्राप्त झालेल्या आहेत. मध्ययुगात सम्राट अकबराच्या काळात लिहिल्या गेलेल्या 'ऐन-ए-अकबरी' या ग्रंथातही या जिल्ह्यातील गावांचे संदर्भ आढळतात. असा हा प्राचीन, मध्ययुगीन काळातही ऐतिहासिक वारसा जतन करीतच या जिल्ह्याने आधुनिक व सांप्रतच्या काळात स्वतःचे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे.

---

१. कथले प्रकाश - लेख - वर्धाश्रम आणि आश्रम संस्कृती (लोकराज्य ऑक्टो. १२) पृ. ५३

१८५७ पूर्वी वर्धा शहराचे नाव 'पालकवाडी' होते. विदर्भप्रदेशात नागप्रदेश व वऱ्हाड यांचा समावेश होत होता. नागप्रदेशावर भोसल्यांचे तर वऱ्हाडवर निजामचे राज्य होते. नागप्रदेशात नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा यांचा समावेश होत होता. १८५४ मध्ये लॉर्ड डलहौसीने विलीनीकरण तत्व आधारावर नागपूर ब्रिटीश साम्राज्यात विलीन केले.

१८६२ मध्ये सर रिचर्ड टेंपल यांनी वर्धा जिल्हा तयार करून 'पुलगांव' जवळ असणाऱ्या कवठा येथे जिल्ह्याचे मुख्यालय ठेवले. तर १८६६ मध्ये 'पालकवाडी' येथे जिल्हा मुख्यालय ठेवण्यात आले. १८६१ मध्ये इंग्रजांनी 'सेंट्रल प्रॉव्हिन्सेस' नामक प्रांत तयार केला पण तो प्रशासनाच्या सोयीचा नसल्यामुळे नवीन जिल्हा निर्माण केला व नगर नियोजनाच्या आराखड्याद्वारे 'वर्धा' शहराची निर्मिती केली. देशामध्ये हा छोटासा जिल्हा असला तरी तो स्वातंत्र्य आंदोलनात अग्रेसर राहिला व तेच 'पालकवाडी' म्हणजे आताचे 'वर्धा' होय. या जिल्ह्याच्या सीमा वरदा नदीने निश्चित केल्या असल्यामुळे 'पालकवाडी' नाव बदलवून 'वर्धा' हे नांव देण्यात आले.

पारंपारिक दृष्टीने वर्धा हे फार मोठे ऐतिहासिक अथवा प्रेक्षणीय स्थळ नव्हते, पण तरी हा जिल्हा आधुनिक भारताच्या संदर्भात विचार करू जाता राजकीय क्षितीजावर अधिकच प्रसिद्ध झाला. वर्धा जिल्हा 'राष्ट्रवादी चळवळीचे स्फूर्तिस्थान व केंद्रस्थान' होते. १८८५ च्या राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून राष्ट्रवाद व नवविचारांचे वारे सर्वत्र वाहू लागले पण त्यापूर्वीच वर्धा येथे राष्ट्रवाद उदयाला आला होता. सन १८६७ पर्यंत मुंबईहून वर्धा-नागपूरपर्यंत रेल्वे आलेली होती. सन १८८८ पर्यंत रेल्वे कलकत्यापर्यंत पोहचली त्यामुळे बंगालमधील राजकीय प्रेरणा येथे येणे सुलभ झाले. वर्धा जिल्ह्यातील आष्टी, आर्वी ही गाव राष्ट्रवादी विचारसरणीची माहेरघर होती. अशा या वर्धा जिल्हयाने स्वातंत्र्य आंदोलनात अतिशय महत्वपूर्ण योगदान दिले. अमेरिकेचे लुई फिशर यांनी 'एशिया' नावाच्या पत्रात भारताबद्दल संस्मरण लिहितांना जे मत व्यक्त करतात त्यातून वर्धेचे महत्व लक्षात येते. ते म्हणतात, ''मै जब दिल्ली से वर्धा पहूंचा तो मेरी आखे खुली। मेरे अंतःकरण ने मुझे चेतावनी दी कि भारत की राजधानी

दिल्ली नही वर्धा है। हजारों प्रणालियो में राष्ट्र का चैतन्य वर्धा में एकत्र होकर वहाँ से सारे देश में वितरित होता है। इसके विपरीत दिल्ली ऐसा किला लगता है जिसके द्वार देश की आशा निराशाओं के लिए सदैव बंद रहते है।" [२]

## काँग्रेसची स्थापना व वर्धा जिल्हा :-

२८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथे काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरले. या अधिवेशनाला नागपूर प्रांतातील एकही प्रतिनिधी उपस्थित नव्हता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पाचव्या अधिवेशनापासून वर्धा जिल्हयातील प्रतिनिधी अधिवेशनाला जाऊ लागलेत. १८९१ मध्ये पी. आनंद चार्लुच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे भरलेल्या अधिवेशनापासून वर्धा जिल्ह्यातील प्रतिनिधी उपस्थित राहू लागलेत. या अधिवेशनात चर्चिल्या गेलेले विषयामुळे ते अत्यंत प्रभावित झालेत. सार्वजनिक सभा, लोकसभा, गोरक्षण सभा यांच्या प्रभावामुळे वर्धा जिल्ह्यात राजकीय जागृतीकरिता अनुकूल वातावरण निर्माण झाले. वर्धा, आर्वी, हिंगणघाट व पुलगाव येथील लोकांमध्ये जनजागृती घडवून आणण्याचे कार्य या सभांनी केले. कृष्णराव फाटक आणि गंगाधरराव चिटणवीस यांनी लोकसभेच्या मंचावरुन त्या काळात स्वदेशी प्रचाराचे कार्य केले.

## बाल समाज (बांधव समाज ) :-

१९ व्या शतकातील उत्तरार्धात देशाची राजकीय परिस्थिती अत्यंत असंतोषजनक होती. १८९६-९७ मध्ये वर्धा येथे राष्ट्रवाद प्रबळ झाला. याच सुमारास वर्ध्याला १० ते १६ या वयोगटातील मुलांनी बाजसमाज स्थापन केला. ही सर्व मुले लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रभावित झाली होती. त्यामध्ये डॉ. पांडुरंग खानखोजे, हनुमंत व्यंकट नायडू, गजानन रघुनाथ पाठक, लक्ष्मण सुखनंदन शर्मा, विश्वनाथराव केळकर हे समर्थपणे कार्य करीत होते. "समविचारी क्रांतीप्रवण असणाऱ्यांनी ही संघटना गुप्त असून पुढे प्रचारासाठी तिला 'बांधव समाज' असे नांव दिले." या बांधव समाजाने राष्ट्रवादाच्या उभारणीत मौलिक योगदान दिले.

---

२. बजाज कमलनयन - काकाजी, बापू, विनोबा, पृ. ८०

## वंगभंग चळवळ आणि स्वदेशी आंदोलन :-

१९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली त्याविरोधात संपूर्ण देशात पडसाद उमटलेत. जहाल नेतेच नव्हे तर मवाळ नेतेही या घटनेमुळे हवालदिल झालेत. विदर्भामध्ये दादासाहेब खापर्डे, बॅरिस्टर मुंजे, बापुजी अणे या नेत्यांनी लॉर्ड कर्झनचा फाळणीमागील मूळ हेतू किती स्वार्थी आहे , हे प्रतिपादन केले. बापूजी अणे यांनी 'हरिकिशोर' या वर्तमानपत्रात १३ मे १९०७ ते ८ जुलै १९०७ या कालावधीत 'नवीन पंथ- निःशस्त्र अथवा संरक्षक' या शीर्षकाखाली एक लेखमाला प्रकाशित केली. फाळणीमुळे पूर्ण देशात असंतोषाचे वातावरण असतांनाच गोपाळकृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या बनारस येथील अधिवेशनात काँग्रेसने स्वदेशी व बहिष्कार या चळवळींना पाठिंबा दर्शविला.''स्वदेशी चळवळीने विदेशी कापड न वापरता देशी कापड वापरावा त्यातच राष्ट्राचे हित आहे ही कल्पना प्रथमतः महाराष्ट्रात निघाली.'' [३]

याबाबत टिळकांनी याच काळात मराठी भाषिकांना आठवण करून दिली आणि पाहता पाहता संपूर्ण देशभर स्वदेशी आंदोलन व बहिष्काराची लाट उसळली. त्यातून वर्धा जिल्हा सुटणे शक्यच नव्हते. कारण यापूर्वीच वर्धा येथे कृष्णराव फाटक, केशवराव भवाळकर, गंगाधरराव चिटणवीस यांच्या स्वदेशी कार्याचा वर्धा जिल्ह्यातील आर्वी, हिंगणघाट, पुलगांव येथील लोकांवर प्रभाव होता. स्वदेशी वस्तुंचा पुरस्कार व विदेशी वस्तुंवर बहिष्कार यामध्ये वर्धा जिल्हा आघाडीवर होता. रामभाऊ अभ्यंकर, विनायक देशमुख, रामभाऊ श्रोती, निळकंठराव देशमुख, पांडुरंग खानखोजे, चंपतराव शेंडे, दामोधर देशपांडे, शंकरराव वसू, त्र्यंबकराव देशपांडे, गणपतराव जोशी, शंकरराव उपदेव यांनी स्वदेशी आंदोलनात स्वतःला झोकून दिले.

महाराष्ट्रातील स्वदेशी आंदोलनाबद्दल लोकमान्य टिळकांचे 'केसरी' निर्भीडपणे मत मांडत होते. वर्धा जिल्ह्यातील टिळकांचे अनुयायी असलेले पांडुरंग खानखोजे हे स्वदेशीच्या क्रांतीकार्यातील अग्रणी होते. ''डॉ. पांडुरंग खानखोजे यांनी तर या काळात काळया

३. रेगे , मे. पुं. - नवभारत काँगेस शताब्दी विशेषांक- पृ. ६८

कंबलच्या टोप्या, हाताने बनविलेले लिफाफे, बुनकरांनी तयार केलेला कपडा आणि साबण विकण्याचे कार्य केले.'' [४]

स्वदेशी व बहिष्कार आंदोलनाने वर्धा जिल्ह्यात राष्ट्रवादाची लाट उसळली. तिचा परिणाम असा झाला की, बहिष्कार तत्वाच्या प्रभावाखाली येवून हमदापूर येथील बाजीराव तुकाराम फुलझेले यांनी सरकारी नोकरीचा त्याग करुन लोकांपुढे क्रांतीचे महत्व ठेवून एक आदर्श प्रस्थापित केला.

## होमरूल चळवळ आणि वर्धा जिल्हा :-

'भारतीयांना स्वशासनाचा हक्क आहे आणि तो ब्रिटीश सरकारने मान्य केलाच पाहिजे' या तत्वावर 'होमरूल' चळवळ आधारित होती. लोकमान्य टिळकांनी या चळवळीचा प्रसार करण्याकरिता देशभर दौरे काढलेत. ठिकठिकाणी होमरुलच्या शाखा प्रस्थापित करण्यात आल्या. नागपूर विदर्भात होमरुल लिगचे त्यावेळी नागपूर, वर्धा, चांदा, भंडारा येथे १४०७, ८१६, ४४४ व ५१ सभासदांची नोंदणी झाली.'' [५] या चळवळीचे उद्दिष्ट लोकांपर्यंत पोहचविण्याकरिता स्वतः लोकमान्य टिळकांनी वर्धा जिल्ह्याचा दौरा केला. त्यांनी राजद्रोहाच्या आरोपातून शिक्षा भोगून तुरुंगातून मुक्तता झाल्यानंतर 'केसरी'त 'पुनश्च हरीओम' हा अग्रलेख लिहून सरकारला हादरा दिला. होमरूल चळवळीचे ध्येय निश्चित करुन त्यांनी संपूर्ण देशासह वर्धा, आर्वी, पुलगांव, हिंगणघाट, सेलू, आष्टी येथे होमरुलचे प्रचारकार्य केले. त्याचा परिणाम असा झाला की, ''वर्धा जिल्ह्यातील वर्धा, आर्वी, हिंगणघाट, सेलू, आष्टी येथे होमरूल लीगच्या शाखा स्थापन झाल्यात. अल्पावधीतच (१९२० मध्ये) आर्वी तालुका काँग्रेस समिती स्थापन झाली.'' [६]

आर्वी या ठिकाणी ज्यावेळी टिळकांनी प्रचार कार्यानिमित्त भेट दिली त्यावेळी त्यांना २००० रुपयांची थैली लोकांनी अर्पण केली. मोरेश्वर वासुदेव अभ्यंकर, डॉ. केदार, सेठ

---

४. बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास- पृ. ५

५. कोलारकर, डॉ. शं. गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास - पृ. ५५

६. चौधरी, कि. का. (संपादक) वर्धा जिल्हा गॅझेटिअर - पृ. ६७

खुशालचंद जाजू, पुरुषोत्तम चिपळूणकर, मनोहरपंत देशपांडे, परशुराम थत्ते, पंढरीनाथ वर्तक, वसंतराव कदम, गंगाधरराव देशमुख, तुकाराम केदार यांनी होमरुलच्या कार्यास स्वतःस वाहून घेतले. होमरूलच्या प्रचारासाठी 'सुमती' पत्र काढण्यात आले. जिल्ह्यातून ८६६ इतकी सभासदांची नोंदणी झाली. होमरुलच्या या कार्यात सहभागी झालेल्या सत्याग्रहींना सरकारने पकडले, त्यावेळी अशा सत्याग्रहींची वकीली बॅ. अभ्यंकर यांनी केली तर वकील असणाऱ्या केशवराव कावळे यांनी वर्ध्याच्या लोकांमध्ये जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने 'वर्धा लहरी' नावाचे शिलामुद्रित वर्तमानपत्र आणि 'न्यायदर्पण' नावाचे कायद्यासंबंधी मासिक प्रकाशित केले.

**वर्धा जिल्हयातील क्रांतीकार्य :-**

न्याय हा सनदशीर व विधायक मार्गाने मिळत नसतो तेव्हा हिंसक मार्गाचा अवलंब करणे अपरिहार्य असते, अशी जी क्रांतीकारकांची धारणा होती. त्यात पांडुरंग खानखोजे यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. वर्धा हे राष्ट्रवादी विचारसरणीचे फार मोठे केंद्र होते. लोकमान्य टिळकांचे अनुयायी असलेले डॉ. पांडुरंग खानखोजे हे फार मोठे क्रांतीकारक होते. त्यांचे आजोबा व्यंकटेश खानखोजे हे १८५७ च्या संघर्षात सहभागी होते. ते मुळचे काटोलचे होते. पण पुढे ते भूमीगत झाले व वर्धा येथे स्थायिक झाले. त्यामुळे त्यांच्या क्रांतीकारी विचारसरणीचा पांडुरंग यांच्यावर प्रभाव पडला. ते 'बाल समाज', 'बांधव समाज' या संघटनांचे सदस्य होते. चाफेकर बंधूंनी स्थापन केलेल्या क्रांतीकारी चळवळीचा त्यांचेवर विलक्षण प्रभाव होता. छत्रपती शिवाजी महाराजांना लुटारु संबोधल्यामुळे त्यांनी क्रमिक पुस्तक फाडले. म्हणून त्यांना त्यांच्या शिक्षकांनी शिक्षा केली. त्यांनी क्रांतीसाठी उद्युक्त असणाऱ्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन बालसमाजाद्वारे कार्य केले. हनुमंत व्यंकट रेड्डी नायडू , गजानन रघुनाथ पाठक, लक्ष्मण सुखनंदन शर्मा हे त्यांचे सहकारी होते.

नागपूर येथे हायस्कूल मध्ये शिकत असताना त्यांनी ब्रिटिशांविरोधात उठाव करण्याची घोषणा केल्यामुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले. भारतातच नव्हे तर विदेशातही त्यांनी क्रांतीकार्य केले. त्याकरिता त्यांनी सनफ्रँस्निस्को येथे हिंदुस्थान असोसिएशन

स्थापन केली तर लाला हरदयाळ यांनी अमेरिकेत स्थापन केलेल्या 'इंडियन इंडिपेडन्स' (गदर) या पार्टीच्या कार्याकरिता त्यांनी स्वतःस वाहून घेतले. किं. का चौधरी संपादित 'वर्धा जिल्हा गॅझेटिअर' मध्ये संदर्भ आहे की, पांडूरंग खानखोजे यांनी क्रांतिकार्यात वैवाहिक जीवनाची बाधा येईल म्हणून विवाहबद्ध होण्यास नकार दिला. पांडुरंग खानखोजे यांच्याप्रमाणेच बांधव समाजातील गो.स. पानपते, गंगाप्रसाद पांडे, तात्याजी बावीस्कर, मनोहरपंत देशपांडे, डॉ. मुजुमदार, श्रीकृष्ण मौजी, चिन्नाबारी, गुलाबराव वाघ इत्यादि वर्धा येथील थोर व्यक्तींनी क्रातीकार्यात मोलाचे योगदान दिले.

''पांडुरंग खानखोजे, हनुमंत व्यंकट रेड्डी नायडू, गोपाळराव पानसे यांचा राष्ट्रीय क्रांतिकारक भगतसिंह, राजगुरू, लाला हरदयाळ, विष्णू गणेश पिंगळे यांच्याशी संबंध होता.''[७]

१९३४ मध्ये महात्मा गांधींनी वर्ध्यास स्थलांतर केल्यापासून 'वर्धा जिल्हा' हा खऱ्या अर्थाने 'देशपातळीवर' प्रसिद्ध झाला. याबाबत कमलनयन बजाज लिहितात, ''वर्धा से प्रेरणा लेकर सैकडो, हजारो कर्मठ तपस्वी कार्यकर्ता देश के कोने कोने में पहुंचे और उनमे से अधिकांश आज भी वहाँ निर्माण कार्य में संलग्न है। देश के भाग्य को बनानेवाले ऐतिहासिक निर्णय अधिकतर वर्धा में ही हुए। स्वतंत्रताप्राप्ति से पूर्व देश का शायद ही कोई ऐसा राष्ट्रीय कार्यकर्ता अथवा सेनानी होगा, जो किसी ना किसी प्रसंग को लेकर वर्धा न आया हो।''[८]

स्वातंत्र्यआंदोलनात जिल्ह्याने महत्वाची भूमिका बजावली. असहकार आंदोलन, झेंडा सत्याग्रह, सविनय कायदेभंग आंदोलन, वैयक्तिक सत्याग्रह, भारत छोडो आंदोलन, यात जिल्ह्याने अभूतपूर्व योगदान दिले. वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम आश्रमाने तर स्वातंत्र्यआंदोलनात हिरीरीची भूमिका बजावली. या जिल्ह्याला स्वातंत्र्यसेनानींची एक फार मोठी परंपरा लाभली आहे. याच वर्धा जिल्ह्याने गांधीप्रणित विविध आंदोलनात मोलाचा सहभाग देवून ब्रिटीश साम्राज्यशाहीला खिळखिळे केले. स्वातंत्र्यसेनानींचे 'तीर्थस्थान' तर

---

७. बैस, डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास, पृ. १४

८. बजाज, कमलनयन - काकाजी - बापू- विनोबा, पृ. ८०-८१

साम्राज्यवाद्यांचे 'भयस्थान' म्हणून ही भूमी प्रसिद्ध आहे. असहकार आंदोलनात असहकाराचे ठराव पूर्णत्वास नेण्याचे कार्य स्वातंत्र्यवीरांनी केले. सविनय कायदेभंग आंदोलनात विविध उपक्रम जिल्हयात राबविण्यात आले तर १९४२ चा 'छोडो भारत' ठराव हा 'वर्धा' येथेच प्रथमतः मांडला तर 'वैयक्तिक सत्याग्रहा'ची सिद्धता 'वर्धा' येथेच झाली. या संपूर्ण बाबींचा स्वतंत्र परामर्श स्वतंत्र प्रकरणात घेतला आहे.

## रचनात्मक कार्याची प्रयोगभूमी -वर्धा जिल्हा :-

वर्धा जिल्हा ही महात्मा गांधींच्या 'रचनात्मक कार्या'ची 'प्रयोगशाळा' होती. अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळ, गोसेवा संघ, अखिल भारतीय चरखा संघ इत्यादिंच्या माध्यमातून ग्रामोद्योग व ग्रामोन्नतीचे ध्येय सतत नजरेसमोर ठेवून सक्षमपणे त्याची पूर्तता केली. सेवाग्राम आश्रम, पवनार आश्रम, नालवाडी आश्रम येथून अनेक प्रकारची विधायक कार्ये झालीत. या विधायक कार्याला मदत करणारा कार्यकर्ता जमनालाल बजाज यांच्या रुपाने जिल्ह्याला मिळाला तर मगनलाल गांधी, गोपाळराव काळे, आर्यनायकम, कृष्णदास गांधी, काकासाहेब कालेलकर, जेसी कुमारप्पा, मनोहर दिवाण, किशोरीलाल मश्रुवाले, विनोबा भावे, डॉ. सुशीला नायर, मीराबेन, शांता नारुलकर यांसारखे कार्यकर्तेही विधायक चळवळ चालविण्यासाठी मिळालेत.

आजही अनेक विधायक स्वरुपाच्या रचनात्मक संस्था, गांधी सेवा संघ, बजाज वाडी, गांधी ज्ञान मंदीर, मगनसंग्रहालय, मातृसेवा संघ इत्यादि संस्था प्रामाणिकपणे कार्य करीत आहेत.

प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक परंपरेचा वारसा जपतच सांप्रतच्या काळातही जिल्हा देशविकासात मोलाचे योगदान देत आहे.

## प्रकरण - २

# असहकार आंदोलनातील वर्धा जिल्ह्याचे योगदान

### पार्श्वभूमी :-

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून ब्रिटीश राजवटीबद्दल सर्वत्र असंतोष पसरला होता. त्या असंतोषाला कारणेही बरीच होती त्यातीलच एक कारण म्हणजे लॉर्ड कर्झनने १९०५ मध्ये केलेली 'बंगालची फाळणी' ही होय. या फाळणीमागील आपला हेतू प्रशासनाची सोय आहे अशी सबब त्याने पुढे केली असली तरीही, या फाळणीमागील त्याचा मूळ हेतू हिंदू - मुस्लीम ऐक्यावर आघात करणे हा आहे, हे भारतीयांच्या लगेच लक्षात आले व असंतोष निर्माण झाला. भारतामध्ये या असंतोषातून राष्ट्रवाद प्रबळ झाला. वंगभंग आंदोलनाने सर्व देश ढवळून निघाला. आंदोलनाच्या ज्वाळांनी संपूर्ण देशात असंतोष धुमसला. म्हणून इंग्रजांनी १९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द केली. १९१४ ते १९१८ या पहिल्या महायुद्धाच्या काळामध्ये ब्रिटीश साम्राज्या अंतर्गत असणाऱ्या भारतीयांची सहानुभुती मिळविण्याकरिता इंग्रजांनी भारतीयांशी मवाळ धोरण स्वीकारले. महायुद्धादरम्यान भारताने इंग्लंडला मदत केली. मात्र युद्धादरम्यान जी आश्वासने भारतीयांना देण्यात आली त्याची पूर्तता सरकारने केली नाही. उलट सरकारने पुन्हा दमनतंत्राचा अवलंब केला.

### रौलेट कायदा :-

दि. १८ मार्च १९१९ ला सरकारने 'रौलेट कायदा' प्रसिद्ध केला. या कायद्यान्वये कुणालाही विनाचौकशी अटक करण्याचा अधिकार तसेच कोणत्याही ठिकाणावर धाड घालून झडती घेण्याचा अधिकार सरकारला मिळाला. परंतु आपली बाजू मांडण्याचा अधिकार पकडलेल्या व्यक्तीला देण्यात आला नाही. त्यामुळे रौलेट कायद्याबाबत देशभरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्यात. हा कायदा होण्यापूर्वी जे विधेयक केंद्रीय कौंसिलमध्ये मांडण्यात आले त्याला वैदर्भीय नेते दादासाहेब खापर्डे यांनी विरोध केला. त्याचप्रमाणे विदर्भातील नागपूर, अकोला, वर्धा अमरावती येथील नेत्यांनी व हिंदवासी यांनी विरोध केला. या संदर्भात दादासाहेब

खापर्डे आपल्या रोजनिशीत लिहितात, ''सर्व गैरसरकारी हिंदुस्थानी प्रतिनिधींनी (फक्त एकाला वगळून सर्वांनी) या विधेयकाचा विरोध केला. कौंसिलच्या कारकिर्दीत हेच एकमेव उदाहरण असे आहे की, सर्व हिंदवासीयांनी एकाच बाजूने मतदान केले. ''[१]

'रौलेट कायद्या'ला 'काळा कायदा' संबोधल्या गेले. या कायद्याचा निषेध करण्यासाठी ठिकठिकाणी निदर्शने झाली. सर्वत्र निषेध सभा आयोजित झाल्यात. या निदर्शनांना व निषेधसभांना सरकारने विरोध केला. एकीकडे १९१९ च्या कायद्याने केलेला भ्रमनिरास तर दुसरीकडे रौलेट कायदा यामुळे भारतीय जनता संतापली. दिल्ली, मुंबई, अहमदाबाद, पंजाब, उत्तर भारत येथे रौलेट कायद्याविरोधात सत्याग्रह झालेत. पंजाबमध्ये स्वामी श्रद्धानंद आणि लाला लजपतराय यांनी लोकांमधील राष्ट्रवादाच्या भावनेला खतपाणी घातले.

## जालियनवाला बाग हत्याकांड (१३ एप्रिल, १९१९)

रौलेट कायद्याविरोधात देशभरात प्रतिक्रिया उमटत असतांनाच १३ एप्रिल १९१९ रोजी पंजाबमधील अमृतसर शहरात कायद्याचा निषेध करण्यासाठी एक सभा आयोजित करण्यात आली. या सभेला जवळपास २० हजार लोक उपस्थित होते. जनरल डायर १५० शिपायांना घेवून सभास्थळी आला व त्याने १० मिनिटात १६५० राउंड गोळ्या चालवून बेछुट गोळीबार केला. त्यावेळी निशस्त्र जमावाने स्वतःचा जीव वाचविण्याकरिता प्रयत्न केले पण अनेकांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेने संपूर्ण भारत देश सुन्न झाला. या अमानुष घटनेची चौकशी व्हावी, अशी भारतीय नेत्यांनी मागणी केली. यावेळी सरकारने 'हंटर कमिशन' नेमले. कमिशनने आपल्या अहवालात दोषी अधिकाऱ्यांना माफ केले.

अशा प्रकारे रौलेट कायदा, जालियनवाला बाग हत्याकांड आणि हंटर कमिशन या प्रकरणातून इंग्रजांच्या क्रूर नीतीची साक्ष भारतीयांना पटली. १८९२, १९०९, १९१९ या कायद्याने भारतीयांचा भ्रमनिरास झाला होता. शिवाय सरकारने पहिल्या महायुद्धाच्या काळात भारतीयांची मदत घेतली. परंतु युद्धकाळात भारतीयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली

---

१. डॉ. वक्काणी, नि.आ. - आधुनिक विदर्भाचा इतिहास, पृ. ७६

नाही. या पार्श्वभूमीवर 'असहकार चळवळ' करण्याचे निश्चित झाले. लोकमान्य टिळकांनी मृत्यूपूर्वी असहकाराच्या कार्यक्रमाला समर्थन दिले. ते गांधीजीजवळ म्हणाले, ''तुमच्या नव्या प्रयोगाला माझा व्यक्तिशः विरोध नाही; देश तुमच्याबरोबर येण्यास तयार असेल तर मी तुमच्याबरोबर आहे..'' टिळकांनी दिलेला हा विश्वास गांधीजींकरिता निश्चितच प्रेरक ठरला व त्यांनी अहिंसक असहकाराच्या मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे, असा निर्णय घेतला आणि या चळवळीला सुरुवात करण्याच्या निमित्ताने त्यांनी व अली बंधूंनी देशभर दौरा करून जनतेचे समर्थन मिळविले.

## कलकत्ता अधिवेशन (४ सप्टेंबर १९२०)

१ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचे निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करणे व असहकार चळवळ शिस्तीने चालविण्याची लोकांना विनंती करणे तसेच हंटर कमिशनच्या अहवालावर तीव्र नाराजी व्यक्त करणे अशा महत्वाच्या ठरावावर विचारविनिमयाकरिता लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे '४ सप्टेंबर १९२०' ला अधिवेशन भरले. अधिवेशनात पहिल्या ठरावात लोकमान्य टिळकांच्या मृत्यूवर शोक व्यक्त करण्यात आला. पाचवा ठराव असहकार चळवळीबाबत होता. हा ठराव महात्मा गांधींनी मांडला. हा ठराव १८८५ विरुद्ध ८८४ मतांनी पास झाला.''[२]

सी.आर. दास, ॲनी बेझंट, पं. मदनमोहन मालवीय, बिपीनचंद्र पाल यांनी असहकाराच्या अस्त्राबद्दल अनुत्साह दाखविला. परंतु विरोध असतांनाही असहकाराचा कार्यक्रम मान्य करण्यात आला. कलकत्ता अधिवेशनाला भारतातील अनेक प्रांतातून काँग्रेसचे प्रतिनिधी उपस्थित होते. वर्धा येथूनही जमनालाल बजाज व महात्मा गांधींचे अनेक अनुयायी या अधिवेशनास उपस्थित होते. अधिवेशनाच्या वेळी व्यासपीठावर बसलेल्या ३५०० प्रतिनिधींपैकी एक प्रतिनिधी जमनालाल बजाज हे होते.

---

२. बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास- पृ. १७

**असहकाराच्या ठरावाची ९ कलमे :-**

१. सरकारकडून प्राप्त सन्मानदर्शक पदव्यांचा व अधिकारांचा त्याग करणे.

२. सरकारी कार्यक्रम, उत्सव अशा समारंभावर बहिष्कार घालणे.

३. सरकारी व निमसरकारी शाळांमधून मुलांना काढून राष्ट्रीय शाळांची स्थापना करणे.

४. वकीलांनी ब्रिटीश न्यायासनांवर बहिष्कार घालून खाजगी पंचायती स्थापन करणे.

५. लष्करी व मुलकी नोकऱ्यांवर बहिष्कार घालणे.

६. सुधारणा कायद्याखालच्या कायदेमंडळावर व मतदानावर बहिष्कार घालणे.

७. परकीय मालावर बहिष्कार घालणे व स्वदेशीचा प्रसार करणे.

८. मेसोपोटेमियातील लष्करी भरतीवर बहिष्कार घालणे.

९. खिलाफती चळवळीला सहकार्य करून हिंदू-मुस्लीम ऐक्याचा प्रयत्न करणे.

कलकत्ता अधिवेशनातील ठरावावर डिसेंबर १९२० च्या नागपूर अधिवेशनात शिक्कामोर्तब करावे असे ठरले. त्याचप्रमाणे डिसेंबर १९२० ला मद्रासचे काँग्रेस पुढारी वीरराघवाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर अधिवेशन भरले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून महात्मा गांधींनी वर्धा येथील सेठ जमनालाल बजाज यांची नियुक्ती केली. त्यावेळी माझे वय, शिक्षण व अनुभव कमी असल्यामुळे ही जबाबदारी आपण दुसऱ्यांकडे द्यावी, असा युक्तीवाद जमनालाल यांनी केला. पण महात्मा गांधींनी त्यांचा हा युक्तीवाद ऐकला नाही व ती जबाबदारी आपणास स्वीकारावीच लागेल असे सांगितले. त्यामुळे जमनालाल बजाज यांचे समोर पर्याय उरला नाही. त्यांना स्वागताध्यक्षपदाचा बहुमान मिळण्यामागे आणखी एक महत्वाचे कारण होते. ते म्हणजे अधिवेशनाला हिंदी भाषिकांचा सहभाग लाभावा, म्हणून अधिवेशनाचे स्वागताध्यक्षपद वर्ध्याचे जमनालाल बजाज यांना दिले गेले.

जमनालाल बजाज यांनी या संधीचा वापर आपली निष्ठा व कौशल्य सिद्ध करण्यासाठी योग्य पद्धतीने व कुशलतेने केला. त्यांच्या विनंतीनुसार वर्धा-नागपुरातील सर्व व्यापारी, धनिक मारवाडी, प्रगतीशील स्वयंसेवक यांनी अधिवेशनाला यशस्वी करण्यासाठी

खूप परिश्रम घेतले. ''बजाजजींनी पंडित भगवानदिन आणि अर्जूनलाल सेठी व पंडित सुंदरलाल यांना अनुक्रमे राजस्थान व उत्तर प्रदेशातील कार्यकर्त्यांना इकडे आणले. जमनालालजींसह वीर वामनराव जोशी, आर.एस. रुईकर, पुनमचंद राका, एन.एम.घटवाई, व्ही.एस. दांडेकर, एम.जे. कानेटकर, समिउल्ला खान इ. तरुणांचा नागपूर अधिवेशनाच्या यशात वाटा होता.''[३]

विदर्भातील नागपुरचे (महाराष्ट्र), अमरावती येथील दादासाहेब खापर्डे संपादित 'उदय' आणि हिंदी भाषिक लोकांसाठी प्रकाशित होणारे 'संकल्प' या वृत्तपत्रांनी असहकाराच्या कार्यक्रमासंबंधी जनजागरण घडवून आणले. विशेष म्हणजे बॅ. दासांनी असहकाराचा घेतलेला निर्णय अव्यावहारिक आहे, असा आक्षेप घेतला होता. त्यांनी आता असहकाराच्या ठरावाला पूर्णतः अनुमोदन दिले. ते म्हणाले, '' I claim that this reolution is stronger than the one passed at Culcutta. I claim it is stronger, fuller and horder because this nation resolved to put into force the entire scheme of Non-Cooperation down to the non Payment of taxes.'' [४]

अशाप्रकारे कलकत्ता अधिवेशनातील सर्व ठराव नागपूर अधिवेशनात पास करण्यात आले. या अधिवेशनाला वर्धा जिल्हयातील हिरासाव चावडे, बाबासाहेब देशमुख, श्रीकृष्णदास जाजू, व्यंकटराव गोडे, आप्पाजी जोशी, मनोहरपंत देशपांडे, बॅ. अभ्यंकर, एन.एम. घटवाई इत्यादि उपस्थित होते.

या सर्व मंडळींनी असहकाराच्या चळवळीच्या प्रचारासाठी फार मोठे कार्य केले. ''असहकार चळवळीच्या प्रसारासाठी सिंदी येथे भाष्करराव पंडित, हमदापूर येथे दादासाहेब सुभेदार, मदनी येथे मनोहरपंत देशपांडे, सालोड येथे डॉ हेडगेवार यांच्या अध्यक्षतेखाली सभा होवून या सभांमध्ये गणपतराव जोशी, दादाजी शास्त्री, गोविंदराव चरडे यांची भाषणे झाली.'' [५]

---

३. चौधरी, किं. का. (संपादक) वर्धा जिल्हा गॅझेटिअर - पृ. ६८, ६९
४. व्यास, डॉ. नंदकिशोर- नागपूर नगर एवम् स्वतंत्रता आंदोलन, पृ. १०९
५. बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास- पृ. १६

नागपूर अधिवेशनात ठरले की,

१. असहकार चळवळीचा खर्च चालविण्याकरिता एक राष्ट्रीय कोष स्थापन करण्यात यावा.

२. लो. टिळकांच्या स्मरणार्थ 'अखिल भारतीय टिळक स्वराज्य फंड' या नावाने निधी गोळा करावा.

३. एक कोटी लोकांची सदस्यता मिळविणे.

४. स्वदेशीच्या प्रचारासाठी एक लाख चरखे देशाच्या विविध भागात पोहचविणे

नागपूर अधिवेशनास १४,५८२ काँग्रेस प्रतिनिधी हजर होते. त्यापैकी ७९.०४ प्रतिशत प्रतिनिधी विदर्भ व मुंबईतून आले होते. वर्धा जिल्हयाच्या दृष्टीने बघितल्यास जमनालालजींना या अधिवेशनाने मोठेपण प्राप्त करुन दिले. यासंदर्भात नागपूर अधिवेशनाला उपस्थित असणारे बॅ. मुकुंदराव जयकर यांचे उद्‌गार अभ्यासनीय आहेत ते म्हणतात,

" Gandhi had made one of his finest conquests in Jamnalal"

नागपूर काँग्रेस अधिवेशनाच्या स्वागताध्यक्ष पदाची यशस्वीपणे धुरा सांभाळणाऱ्या जमनालाल बजाज यांची काँग्रेसचे 'खजीनदार' म्हणून नियुक्ती करण्यात आली. असहयोग तत्वाचा अविष्कार, पुरस्कार व प्रत्यक्ष कृतीचा आदेश देणाऱ्या या अधिवेशनाने वर्धा जिल्हयात उत्साह निर्माण झाला.

## असहकार चळवळ आणि वर्धा जिल्हा :-

नागपूर अधिवेशनानंतर असहकार चळवळीचा संपूर्ण देशात जोमाने प्रसार झाला. ब्रिटीश सरकारने भारतीयांसमोर उभ्या केलेल्या आशा आकांक्षांचे भ्रमकत्व आणि सरकारचे उद्दाम व अन्यायकारी धोरण यामुळे व्यथित झालेल्या भारतीय जनतेने म. गांधींच्या आवाहनानुसार असहकार धोरणाचा अवलंब करण्याचे ठरविले व त्याची सुरुवात स्वतः गांधीजींनी केली.

## सन्मानदर्शक पदवीचा व अधिकाराचा त्याग :-

महात्मा गांधींनी सर्वप्रथम ब्रिटीश सरकारकडून मिळालेल्या 'कैसर-ए-हिंद' हा किताब सरकारला परत केला. आपणास मिळालेल्या पदव्यांचा वापर हा राष्ट्रहिताकरिता

व्हावा, असे गांधीजी म्हणत. सरकारकडून १९१७ मध्ये जमनालाल बजाज यांना 'रायबहादूर' व १९१८ ला ऑनरेरी मॅजिस्ट्रेट ही पदवी मिळाली होती. त्यावेळी गांधीजींनी जमनालालजींना शिकवण दिली की, ''इस नये सम्मान का उपयोग अच्छी तरह से करना। अपमानित अवस्था में झुके रहना बडा सरल है, पर सन्मानित अवस्था में झुके रहना बडा कठिन काम है। सम्मान और उपधियाँ बडी खतरनाक चीजे है। इनका दुरुपयोग अधिक होता है। और उपयोग कम। मेरी कामना है कि तुम इसका उचित उपयोग करो। मुझे पुरी आशा है कि यह तुम्हारी देशभक्ती और आध्यात्मिक प्रगती के मार्ग में कभी नही आयेगी।'' म. गांधींच्या या शिकवणीचा जमनालाल बजाज यांचेवर इतका प्रभाव पडला की, त्यांनी ''बिटीश सकारकडून प्राप्त झालेल्या 'ऑनरेरी मॅजिस्ट्रेट' व 'रायबहादूर' या दोन्ही पदव्या ९ एप्रिल १९२१ ला सरकारला परत केल्यात. तसेच आपल्या कुटुंबातील तलवार, बंदूक आणि इतर शस्त्रांचे लाइसेंस सरकारला परत केले.'' [६]

हिंगणघाट येथे डॉ. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत श्री. बिडकर, नरसिंगदास मोहता, मथुरादास मोहता,मोतीलाल मोहता, शेख रहिमान यांना पदव्या सोडण्याची विनंती करणारा ठराव संमत झाला. याचवेळी वर्धा जिल्ह्यातील आर्वी येथील गोपालदास राठी यांनी 'ऑनरेरी मॅजिस्ट्रेट' या पदवीचा त्याग केला व सरकारकडून प्राप्त झालेल्या अधिकारांचा त्याग करून या सर्वांनी असहकार आंदोलना'त आपला अभूतपूर्व सहभाग नोंदविला. गांधीजींच्या आवाहनानुसार निळकंठराव देशमुखांनी प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीतील आपली उमेदवारी मागे घेतली.

### वकीलीचा त्याग :-

असहकाराच्या कार्यक्रमात ब्रिटीश न्यायासनांवर बहिष्कार घालणे व वकिलांनी आपल्या वकीलीचा त्याग करावा असे ठरले. त्याचप्रमाणे देशातील बॅ. चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू, व्ही.व्ही. गिरी, वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल, सी. राजगोपालाचारी, टी.

---

६. कित्ता, पृ. १९

प्रकाशम, सैफुद्दिन किचलू, असफअली या देशातील वकीलांनी आपल्या वकिलीच्या व्यवसायावर पाणी सोडले .

५ एप्रिल,१९२१ रोजी वकिलांनी वकिलीचा त्याग करावा यासाठी सेठ चिरंजीलाल यांच्या अध्यक्षतेखाली श्री. परांजपे, केदार पांडे, देशमुख, केळकर यांनी वकिली सोडावी. असा विनंती ठराव करण्यात आला. पुरुषोत्तम परांजपे यांनी याचवेळी वकीली सोडण्याचे जाहीर केले. आर्वी येथील प्रसिद्ध वकील श्रीकृष्णदास जाजू, श्री. अगस्ती, हिंगणघाट येथील श्री. नागले, श्री. शिंगरू यांनी वकीली व्यवसायाचा त्याग केला. विशेष म्हणजे त्यांना गांधीजींची ब्रिटीश न्यायासनावर बहिष्कार व वकीलीचा त्याग करुन 'एक वर्षात स्वराज्य' ही संकल्पना अव्यवहार्य वाटते होती. त्यांनीही आपल्या हजारो रुपयांच्या वकीलीवर पाणी सोडले. त्यामध्ये बापुजी अणे, बॅ. अभ्यंकर, बॅ. देशमुख, विश्वनाथराव केळकर, बापुराव हरकरे, नारायणराव वैद्य, घाडगे, गंगाधरपंत देशपांडे, सी.के. दामले, अब्दूल रौफ, गद्रे, परशुराम थत्ते इत्यादिंचा नामनिर्देश करणे या ठिकाणी उचित ठरेल.

ज्या वकिलांनी आपल्या हजारो रुपयांच्या वकिलीवर तुळशिपत्र ठेवले अशा वकिलांच्या उदरनिर्वाहाकरिता वर्धा येथील जमनालाल बजाज यांनी वार्षिक १ लक्ष रुपये दिलेत. ज्यावेळी आर्थिक अडचणी उद्‌भवत त्यावेळी जमनालालजी आर्थिक मदत करीत, म्हणूनच महात्मा गांधी त्यांचा उल्लेख 'कामधेनू' असा करीत. ते म्हणत ''जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने श्रीमंत माणसांनी आपल्या संपत्तीचे विश्वस्त असले पाहिजे. ही कल्पना मी जेव्हा जेव्हा मांडतो त्या त्या वेळी माझ्या मनात जमनालाल बजाज या तरुण राजपुत्राचे जीवनचरित्र समोर येते. आपल्या संपत्तीचा विनियोग जमनालाल यांनी असा केला की, त्यांचे उदाहरण इतरांनी गिरविण्यासारखे आहे.''[७] नरकेसरी अभ्यंकर यांनीही वकिलीचा त्याग केला. ब्रिटीश न्यायासनावर बहिष्कार या कार्यक्रमांतर्गत अनेकांनी न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यांना मागे घेतले. वर्धा जिल्ह्यात २१ ठिकाणी लवाद कोर्टाची स्थापना करण्यात आली व लोकांना

---

७. कोलारकर डॉ. श.गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. ३७९

सरकारी न्यायालयाऐवजी या लवाद कोर्टात आपले दावे सादर करण्यासंदर्भात प्रेरीत करण्यात आले.

### सरकारी शैक्षणिक संस्थांवर बहिष्कार- राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना :-

सरकारी शाळा, कॉलेजवर बहिष्कार घालणे हे सुद्धा चळवळीचे प्रधान उद्दिष्ट होते. शैक्षणिक संस्थांवर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांची स्थापना करावी ही लोकमान्य टिळकांच्या 'चतुःसूत्री'तील एक महत्त्वाचे सूत्र होते. असहकार आंदोलनाच्या काळात ज्यावेळी विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा व महाविद्यालयांवर बहिष्कार टाकला त्यावेळी बापूजी अणे यांनी या कार्यक्रमावर प्रखर टीका केली. ते म्हणाले, ''शाळांवर बहिष्कार टाकला तर विद्यार्थ्यांचे जीवन बर्बाद होईल. विद्यार्थी उघड्यावर पडतील.'' परंतु यावेळी अनेकांनी बापूजी अणेंना विरोध केला. सी.आर. दास यांनी तर एकवेळी 'शिक्षण थांबू शकते पण स्वराज्य नाही' असे मत निर्भिडपणे मांडले. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, आसाम येथे विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा, महाविद्यालयांवर बहिष्कार घातला. ''चळवळीच्या पहिल्या महिन्यातच हजारे विद्यार्थ्यांनी एका अंदाजानुसार नव्वद हजार विद्यार्थ्यांनी सरकारी शाळा, महाविद्यालये सोडून नव्याने स्थापन झालेल्या ८०० राष्ट्रीय शाळा व महाविद्यालयात प्रवेश घेतला.'' [८]

याच काळात काशी विद्यापीठ, बनारस विश्वविद्यालय, गुजरात विद्यापीठ, जामिया मिलीया विद्यापीठ यासारख्या शिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. वर्धा तालुक्यामध्ये शासकीय व गैरशासकीय शाळांमधून १२०० विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्या. या काळात वर्धा तालुक्यात २२ राष्ट्रीय शाळा स्थापन करण्यात आल्यात. असहकार आंदोलनापूर्वीच वर्धा येथे जमनालाल बजाज यांनी १९१२ मध्ये मारवाडी हायस्कूलची व १९१५ मध्ये मारवाडी विद्यालयाची स्थापना केली होती. या विद्यालयाला सरकारची मान्यता तर होतीच पण अर्थसहाय्यही होते. परंतु जमनालाल बजाज यांनी शासनाप्रती असहकार या भावनेने प्रेरीत होवून आंदोलन काळात सरकारच्या मान्यतेचा व अर्थसहाय्यतेचा त्याग केला. आणि

---

८. बिपिनचंद्र (अनु.- डॉ. काळे एम.व्ही.) इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डन्स, पृ. २१५

गांधीजींच्या राष्ट्रीय शिक्षण प्रणाली नजरेसमोर ठेवून अभ्यासक्रमात बदल घडवून आणला. ''१९२४ मध्ये मारवाडी विद्यालय राष्ट्रीय शाळा झाली. कोळवणा, सोनेगाव, मिरापूर, मुरदगांव, सिंदी, सेलू, हिंगणी, हिंगणघाट, गिरड येथे राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्यात. श्री. भिडे यांनी स्वावलंबी शाळेची स्थापना केली. वर्धेसह नागपूर, यवतमाळ, अमरावती, खामगाव, अकोला, आकोट, हिंगणघाट येथे राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्यात. त्याचप्रमाणे भंडारा, गोंदिया, तुमसर, मोहाडी, तिरोडा येथील विद्यार्थ्यांनी शाळांवर बहिष्कार टाकला. असहकार आंदोलनादरम्यान ज्या राष्ट्रीय शाळांची स्थापना झाली त्यांच्यावर ब्रिटीश शासनाचा रोष होता. त्या बंद पाडण्याकरिता सरकारने नाना परीने प्रयत्न केलेत. सरकारच्या या प्रयत्नांना तुरळक प्रमाणात यशही मिळाले.

**परदेशी मालावर बहिष्कार :-**

नागपूर येथील १९२० च्या काँग्रेस अधिवेशनातील असहकार ठरावात परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यात यावा, यास विशेष प्राधान्य देण्यात आले. हे बहिष्काराचे तत्व भारतीयांकरिता निश्चितच नवीन नव्हते. यापूर्वी लोकमान्य टिळकांनी या तत्वाला आपल्या चतुःसूत्रीत विशेष स्थान दिले होते.

असहकार चळवळीतील परदेशी वस्तुंवरील प्रामुख्याने कापडावरील बहिष्कार सर्वाधीक यशस्वी ठरला. नागपूर येथील १९२० च्या काँग्रेस अधिवेशनात असहकार ठरावात परदेशी मालावर बहिष्कार घालावा व स्वदेशीचा पुरस्कार करावा असे ठरले. त्याकरिता महात्मा गांधींनी श्री. प्रभुदास गांधी यांचे समवेत देशव्यापी दौरा केला. त्यावेळी त्यांनी ठिकठिकाणी भेटी देवून लोकांना परदेशी कापडावर कडकडीत बहिष्कार घाला व सूत कातण्याची कला शिकावी व जाडीभरडी खादी वापरा असा आग्रह धरला. त्याचा तात्काळ परिणाम असा झाला की, सरकारच्या कापडापासून मिळणाऱ्या उत्पन्नात लक्षणीय घट झाली.

''१९२०-२१ मध्ये १०२ कोटी रुपये किमतीचे परदेशी बनावटीचे कापड आयात करण्यात आले होते. १९२१-२२ मध्ये ही आयात ५७ कोटी रुपयांपर्यंत खाली आली.''[९]

---

९. कित्ता, पृ. २१६

१६ व १७ मार्च १९२१ रोजी वर्धा जिल्ह्यातील 'आष्टी' येथे घेण्यात आलेल्या परगणा परिषदेत महात्मा गांधींनी दि. १७ मार्च ला सायं. ७-०० वाजता लोकांना उद्देशून ''सूताचे रहाट व हातभाग यांचे पुनरुज्जीवन झाल्याशिवाय देशाला चांगले दिवस येणार नाही'' असा इशारा दिला. याच दिवशी त्यांनी नागपूरला पार्डीच्या सभेत परदेशी मालावर बहिष्कार घालण्याबाबत लोकांना आग्रह धरला. 'केसरी' या वृत्तपत्राने महात्मा गांधींच्या 'परदेशी मालावर बहिष्कार' याबाबत समर्थनार्थ लेख लिहून बहिष्काराबाबतचा महात्मा गांधींचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहचविला. केसरीबरोबरच वर्धेतील 'सुमती ', 'वर्धा लहरी' या वृत्तपत्रांनी तसेच सत्यदेव विद्यालंकार संपादित 'राजस्थान केसरी' निळकंठराव देशमुख संपादित 'सुबोधमाला', वा.ज. घोरपडे संपादित 'तरुण भारत', 'विजय' या वृत्तपत्रांनी असहकारितेचे लोण खेड्यापाड्यापर्यंत पोहचविले. विनोबांनी सुरू केलेल्या 'महाराष्ट्र धर्म' या मासिकानेही फार मोठे कार्य केले. वर्धेतील वृत्तपत्रांना जमनालाल बजाज यांनी वेळोवेळी अर्थसहाय्य केले.

असहकार आंदोलनाचे लोण वर्धा येथे वृत्तपत्रांनी व स्वतः म. गांधींनी पोहचविले. त्यांना याकरिता निष्ठावंत कार्यकर्त्यांची परंपरा जमनालाल बजाज, निळकंठराव देशमुख यांच्या रुपाने मिळाली. जमनालाल बजाज हे ज्यावेळी असहकार चळवळीच्या प्रचार दौऱ्यावर होते त्यावेळी त्यांनी आपली पत्नी जानकीदेवी यांना एक पत्र लिहिले. त्यात ते लिहितात, ''न तो मै और न तुम ही विदेशी कपडा प्रयोग में लाओगी। हमारे सारे परिवार को सादा रहना चाहिए और खद्दर पहनना चाहिए। हमें यह मार्ग बडी दृढता और कठोरता से निभाना चाहिए। तुम इस बात का ख्याल रखों कि हमारे घर के मंदिरो में भी विदेशी कपडा न आये।'' [१०]

जमनालालजी यांनी केलेल्या आदेशाचे संपूर्णतः पालन त्यांच्या पत्नी जानकीदेवी यांनी शेवटपर्यंत केले. यामागे निश्चितच त्यांची आत्मप्रेरणाही होती. त्यांनी स्वतः खादीची जाडीभरडी साडी परिधान करणे सुरु केले. त्यासंदर्भात त्या 'माझी जीवनयात्रा'

---

१०. परवटे, टी.वी. - जमनालाल बजाज पृ. २३

या आत्मचरित्रात लिहितात, ''सुरुवातीला जाड खादीची साडी घातल्यामुळे मला अस्वस्थता वाटत होती. पोत्यावर झोपले आहे असा भास होत होता.'' ठिकठिकाणी खादीचा प्रचार, चरख्याचा प्रचार, सूत कताई, त्या संदर्भात व्याख्याने करून जानकीदेवींनी विदेशी कापडाची होळी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

असहाकर आंदोलनादरम्यान जमनालाल बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय अर्थव्यवस्थेच्या शोषणाबद्दल व अत्याचारी राज्यकारभाराबद्दल संतापून जी होळी पेटविण्यात आली ती अत्यंत परिणामस्वरुप व प्रतिकात्मक स्वरुपाची ठरली. कदाचित विदेशी कापड भारतात सर्वप्रथम वर्धा येथेच जाळले गेले असावे, असा एक विचारप्रवाह आहे.

जमनालाल बजाज यांच्या घरातील त्यांचे स्वतःचे, पत्नीचे, मुलाबाळांचे, नोकरांचे, देवाचे सर्व कपडे बाहेर काढण्यात येवून त्याची मिरवणूक काढण्यात आली. वाटेत लोकांनीसुद्धा या कपड्यांच्या मिरवणुकीत स्वतःच्या घरातील विलायती व रेशमी कापड टाकले व या सर्व परदेशी कापडाची वर्धेच्या गांधी चौकात होळी पेटविण्यात आली. जसजशी होळीच्या ज्वालांनी कापड पेटत होते तसतशा स्वदेशीच्या घोषणा सुरू होत्या. वर्धा, सेलू, घोराड, सालोड, अल्लीपूर, पवनार, आर्वी, हिंगणघाट, आष्टी येथेही विदेशी कापडाची होळी पेटविण्यात आली.

वर्धा येथे परकीय मालाच्या विक्री करणाऱ्या दुकानांसमोर केल्या गेलेल्या निदर्शनाचे नेतृत्व जमनालाल बजाज यांनी केले. त्याशिवाय सेलू येथील गणपतराव जोशी, पिंगळे, पं.प. सत्यदेव, डॉ. गोखले, श्री. परांजपे, करीमभाई, कृष्णाचार्य यांनी कार्य केले. जमनालाल बजाज यांनी परदेशी माल न मागवण्याचा व साठ्यातील परदेशी माल न विकण्याचा व्यापाऱ्यांनी निर्णय घ्यावा, असे आवाहन कापड व्यावसायिकांना केले. त्यानुसार व्यापाऱ्यांनी परदेशी मालाबाबत कठोर धोरण अवलंबले. त्याचा सरकारच्या आर्थिक तिजोरीवर ताण पडला. जमनालालजींचे हे कार्य निश्चितच स्पृहणीय आहे. त्यांच्या या कार्याने प्रेरीत होवूनच महात्मा

गांधींनी त्यांना खादी बोर्डाचे अध्यक्षपद दिले. त्यांनी खादी प्रचाराचे कार्य फार जबाबदारीने केले त्याबद्दल महात्मा गांधींनी त्यांची वेळोवेळी स्तुती केली. वर्धा जिल्हयाने अशा प्रकारे परदेशी मालावर बहिष्कार या कार्यक्रमांतर्गत भरीव कार्य केले.

## दारू निरोधणे (पिकेटिंग)

असहकाराच्या कार्यक्रमात 'दारुबंदी' या तत्वास प्राधान्य देण्यात आले. या दारुबंदी चळवळीचा १९२१ पासून विशेष जोर होता. आत्मभान हरविण्यास दारू किंवा अन्य मादक पदार्थ कारणीभूत आहे. ज्या समाजात व्यसनाधीनता आहे तो समाज कधीच स्वतःची उन्नती साधू शकणार नाही, इतकेच नव्हे तर कोणतेही विधायक कार्य करू शकणार नाही आणि म्हणूनच समाजातून या व्यसनाधिनतेचे उच्चाटन व्हावे, म्हणून गांधीजींनी असहकाराच्या कार्यक्रमात दारुबंदी हे तत्व अनुस्यूत केले.

असहकार आंदोलनाच्या काळात दारूबंदी चळवळीचा प्रसार करण्याकरिता प्रांतीय सभा स्थापन करण्यात आल्या. त्या सभांमधून दारुचे गुत्ते घेवू नका असा संदेश देशवासीयांना दिला. तसेच दारुच्या दुकानांसमोर पिकेटिंग निरोधने करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार लोकांनी दारुच्या दुकानांसमोर निदर्शने केलीत. देशाच्या विविध प्रांतातील जिल्हा लोकल बोर्डाने दारु पिकेटिंगकरिता स्वतंत्र निधी दिला. ''वर्धा येथील लोकल बोर्डाने दारू पिकेटिंगकरिता ३०००/- रुपये तर आर्वी लोकल बोर्डाने खेड्यापाड्यातून दारू दुकानांचे पिकेटिंग करण्याकरिता २०००/- रुपये मंजूर केले.'' [११]

काटोल नगर पालिकेने आपल्या हद्दीत दारू दुकांनांना जागा देण्याचे नाकारले. अशा वेळी सरकारने दारुपासून उत्पन्न घेण्याकरिता डाकबंगल्यातून दारुची विक्री केली. परंतु दारू पिकेटिंगचे कार्य जोमाने सुरू होते. पं. सुंदरलाल यांच्या नेतृत्वात सत्याग्रही कार्य करीत होते. ''एका दारूच्या ठेकेदाराला टांग्यातून नेण्याचे नाकारल्यामुळे बापू मल्हारराव, महादेव परदेशी, दौलत खान या तीन टांगेवाल्यांना सरकारने अटक केली त्यावेळी न्यायालयात

---

११. कोलारकर, डॉ. शं.गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. ९२

टांगेवाल्यातर्फे रा. पांडे व केदार वकिलांनी वकिली करून या तीनही टांगेवाल्यांना निर्दोश सोडले.'' [१२]

देवळी येथेही तरुणांनी दारू पिकेटिंगचे कार्य उत्साहात केले. वर्धा येथील महादेवपूरा भागात हनुमान मंदिराजवळ असणाऱ्या दारुच्या भट्टीसमोर स्वयंसेवक पिकेटिंग करीत. दारू पिण्याकरिता येणाऱ्या लोकांना भट्टीच्या ठिकाणी अडविण्याचे कार्य हे स्वयंसेवक करीत. त्याकरिता ते त्या ठिकाणी रात्रंदिवस रहायचे व झोपायचे सुद्धा. अशा स्वयंसेवकांवर पोलीस अत्याचार करीत. परंतु पोलीसांच्या लाठ्याकाठ्यांचा मारही हे स्वयंसेवक सहन करीत.त्याचा परिणाम असा झाला की, वर्धा जिल्ह्यात दारू पिणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी झाले. सरकारच्या अबकारी विभागाच्या उत्पन्नात कमालीची घट झाली. वर्धा, आर्वी, हिंगणघाट तालुक्यात सरकारने दारूच्या विक्रीसाठी विविध मार्ग स्वीकारले. आर्वी येथील डाकबंगल्यात दारूचे दुकान स्थापन करुन सर्रास दारुविक्री होत असे. पण तरीही आर्वीच्या जनतेने वेळोवेळी या डाकबंगल्यावरही जावून पिकेटिंग केले. असहकार आंदोलन काळात देशातंर्गत दारुच्या दुकानासमोरील पिकेटिंग इतके लोकप्रिय झाले की, सरकारला त्याकरिता एक प्रचारमोहीमच हाती घ्यावी लागली.

## टिळक स्वराज्य फंड आणि वर्धा जिल्ह्याचे योगदान :-

स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही चतुःसूत्री मांडून संपूर्ण भारतीयांमध्ये 'लढाऊ राष्ट्रवाद' निर्माण करणाऱ्या 'लोकमान्य टिळकांचे' निधन झाले व काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. डिसेंबर १९२० च्या नागपूर अधिवेशनात असहकार चळवळीवर शिक्कामोर्तब झाले आणि या चळवळीचा खर्च भागविण्यासाठी 'टिळक स्वराज्य फंड' या नावाखाली निधी जमा करण्याचे ठरले. स्वराज्यप्राप्तीकरिता लोकमान्य टिळकांनी दिलेले अपूर्व योगदान जाणून त्यांच्या स्मरणार्थ निधी उभारण्यात अनेकांनी पुढाकार घेतला. व जवळपास १ कोटी रुपये जमा करावे असे ठरले. असहाकर आंदोलनाच्या काळात गांधीजींनी देशव्यापी दौरा केला त्यावेळी लोकांनी उत्स्फूर्तपणे निधी अर्पण केला. वर्धा जिल्ह्यातही महात्मा गांधींनी

१२. बैस डॉ. वीरेंद्र- वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. २२

भेट देवून लोकांना टिळक स्वराज्य फंडाकरिता आवाहन केले. जमनालाल बजाज यांनी त्यावेळी टिळक स्वराज्य फंडाकरिता 'एक लाखाची देणगी' दिली. वर्धा, हिंगणघाट, देवळी, आर्वी, आष्टी, आर्वीजवळील छोटेसे गांव वाढोणा येथील टिळक स्वराज्य फंड' गोळा करण्यात आला. ''वर्धेतून १७८१० रुपये, देवळी येथून ११०० रुपये, हिंगणघाट मधून २०००० रुपये आर्वीतून १२००० रुपयांचा 'टिळक स्वराज्य फंड' गोळा करण्यात आला.'' [१३]

आष्टी येथे महात्मा गांधींनी १७ मार्च १९२१ रोजी सभा घेतली व या सभेत लोकांनी टिळक स्वराज्य फंडाकरिता योगदान द्यावे असे आवाहन केले. त्यावेळी उपस्थित जनसमुदायातील पुरुषांनी आपल्या जवळ असलेले पैसे व महिलांनी अंगावरील दागिने फंडाकरिता दिले. आष्टी येथून २००० रु. गोळा झाले. वाढोणा येथील लोकांनी महात्मा गांधींना २०१ रु. पैशांची थैली अर्पण केली. 'टिळक स्वराज्य फंडात' गोळा झालेल्या पैशांचा विनियोग 'असहकार आंदोलना'च्या काळात यथायोग्य झाला.

## वर्धा येथील सत्याग्रह आश्रम व असहकार आंदोलन :-

असहकार आंदोलनाच्या काळामध्ये वर्धा येथे 'सत्याग्रह आश्रमा'ची स्थापना झाली व हा आश्रम लवकरच असहकाराच्या देशव्यापी लढ्याचे केंद्र बनला. सत्याग्रह आश्रमाचे प्रमुख म्हणून गांधीजींनी विनोबा भावे यांची नेमणूक केली. विनोबांसोबत मगनलाल गांधी, रघुनाथ धोत्रे, द्वारकानाथ हरकरे, वल्लभस्वामी, कृष्णदास गांधी, केशव गांधी, शिवाजी भावे, ही मंडळीही वर्धेला आलीत. या आश्रमामध्ये अस्पृश्यता निवारण, ग्रामसफाई, अंधश्रद्धा निर्मूलन, सूतकताई, कापड विणने, गोसेवा, राष्ट्रीय शिक्षण इ. प्रयोग आश्रमात सुरु झालेत. विनोबा भावेंचे नैतिक सदाचरण शिस्तप्रिय व स्वावलंबी जीवन, आध्यात्मप्रवणता त्यांचे उपनिषदांवरील ज्ञान यामुळे या आश्रमाकडे लोक आकर्षित होत असत. आश्रमामध्ये रचनात्मक कार्याचे धडे कार्यकर्त्यांना मिळत असत. राधाकृष्ण बजाज, गोपाळराव वाळुंजकर, गोपाळ काळे, बाबाजी मोघे, घाणेकर, दीपकदत्त चौधरी, वल्लभस्वामी, अण्णासाहेब दास्ताने, मनोहर

---

१३. कित्ता, पृ. २१

दिवाण, भाऊ पानसे, द्वारकानाथ लेले, दत्तोबा दास्ताने अशी रचनात्मक कार्यकर्त्यांची परंपरा या आश्रमातूनच उदयाला आली. रचनात्मक कार्य हा कोणत्याही चळवळीचा आत्मा असतो हा महात्मा गांधींचा विचार आत्मसात करून त्यांच्या हाकेला प्रतिसाद देणारे वरील सर्व कार्यकर्ते होते. स्वराज्य प्राप्तीचे ध्येय हे रचनात्मक कार्यातून गवसते हा गांधीजींचा दृढविश्वास होता. हा त्यांचा दृढविश्वास सार्थ करण्याचे कार्य सत्याग्रह आश्रमाने केले. ''या सत्याग्रह आश्रमाने रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक परंपराच निर्माण केली. आश्रमातील राधाकृष्ण बजाज खादी व गोसेवा कार्य करीत. वल्लभस्वामी सर्वसेवा संघाचे काम बघत. मनोहर दीवाण महारोग निवारण कार्य करीत. भाऊ पानसे चरखा साहित्य निर्मितीचे सरंजाम कार्यालय चालवित. दत्तोबा दास्ताने यांनी पुढील काळात गांधी सेवा संघाची धुरा सांभाळली तर द्वारकानाथ लेलेंनी खादी कार्यास स्वतःस वाहून घेतले.''[१४]

नागपूर अधिवेशनात ज्या विधायक कार्यक्रमावर चर्चा करण्यात आली त्या सर्व कार्याचा व्याप सत्याग्रह आश्रमात चालत असे. कडक शिस्त, आत्मसमर्पणाची भावना, देशभक्ती, व्रतस्थ जीवनाचे परिपाठ व विशेष म्हणजे देशाकरिता जीवन मरणासाठी तत्पर राहण्याचे बाळकडू या आश्रमाने लोकांच्या मनात निर्माण केले. परिश्रम, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन वृत्ती, देशभक्ती, निर्भयता, राष्ट्रप्रेम, स्वदेशी इत्यादिंचे शिक्षण आश्रमात दिले जाई. या आश्रमवासीयांनी असहकार आंदोलनात सत्याग्रह करून तुरुंगवासही पत्करला. मात्र आश्रमवासियांचे पहिले मोठे आंदोलन म्हणजे नागपूर येथील 'झेंडा सत्याग्रह' होय. वर्धा येथील सेठ जमनालाल बजाज यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे जो झेंडा सत्याग्रह झाला त्यात आश्रमातील आश्रमवासीयांनी स्वतःस झोकून दिले. पुढील काळात गांधीजींनी पुकारलेला असा एकही कार्यक्रम नव्हता की ज्यात आश्रमवासी सहभागी नव्हते.

वर्धा येथील हा 'सत्याग्रह आश्रम' सत्याग्रहींच्या विचार विमर्शाचे, रचनात्मक कार्याचे व श्रमप्रतिष्ठेचे तत्व लोकांच्या मनावर बिंबविण्याचे तसेच शांतता व अहिंसेच्या माध्यमातून लोकांना स्वराज्य प्राप्तीकरिता ध्येयप्रवन करण्याचे ते एक पुण्यस्थळच होते. या

१४. चौधरी, कि. का. (संपादक) - वर्धा जिल्हा गॅझेटिअर, पृ. ७०

सत्याग्रह आश्रमाने वेळोवेळी रचनात्मक कार्याबरोबरच स्वातंत्र्याच्या प्रयत्नांकरिता सुरू असणाऱ्या प्रत्येक चळवळीत स्वतःला झोकून दिले.

असहकार चळवळीच्या काळामध्ये काँग्रेस सभासदत्व पदाकरिता नोंदणी या उपक्रमात एकट्या 'वर्धा' तालुक्यात ७,९४६ काँग्रेस सभासद नोंदण्यात आले. या पवित्र कार्यात स्त्रियाही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्यात. जमनालाल बजाज यांच्या पत्नी जानकीदेवी यांनी असहकार आंदोलनाच्या काळात अक्षरशः स्वतःला झोकून देऊन कार्य केले. कधीकाळी आपल्या पायाचे नख दिसू न देता पडदा वापरणाऱ्या जानकीदेवींनी या काळात पडदा प्रथेचा त्याग केला. त्यांचेच अनुकरण वर्धा जिल्ह्यातील असहकार आंदोलनाच्या काळात अनेक स्त्रियांनी केले.

डिसेंबर १९२० च्या नागपूर अधिवेशनात 'अस्पृश्यता निवारण' या मुद्यावर बरीच चर्चा झाली. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष जमनालाल बजाज यांनी वर्धा जिल्ह्यात असहकार आंदोलनाच्या काळात व त्यानंतरही अस्पृश्यता निवारणाचे व अस्पृश्योद्धाराचे भरीव कार्य केले. आंदोलन ऐन भरात असतांना त्यांनी वर्धा येथील मारवाडी हायस्कूल व मुंबई येथील मारवाडी विद्यालय हरिजन विद्यार्थ्यांकरिता खुले केले. त्यानंतरही त्यांनी अविरतपणे ते कार्य सुरूच ठेवले. १९२७ मध्ये त्यांनी बच्छराज धर्मशाळेची 'विहीर' व १९२८ मध्ये लक्ष्मीनारायण 'मंदिर' हरिजनांरिता खुले केले.

संपूर्ण देशात असहकार चळवळ यशस्वीपणे चालली होती. ही चळवळ अयशस्वी करण्याचा सरकारने सुरुवातीपासूनच प्रयत्न केला. पण राष्ट्रवाद इतका प्रबळ होता की, हे आंदोलन यशस्वीतेच्या परमोच्च शिखरावर होते. अहिंसेच्या मार्गाने शासनाशी असहकार पत्करून शासनाला जेरीस आणण्याचे अभिनव तंत्र वापरून या लढ्यात विद्यार्थी, स्त्रिया-पुरुष, व्यापारी, मजूर, शेतकरी, कर्मचारी, वकील, न्यायाधीश, तरुण-तरुणी सहभागी झाले. वर्धा जिल्ह्यामध्येही ब्रिटीश न्यायासने, शाळा, महविद्यालये, पदव्या यांचा त्याग लोकांनी केला. विदेशी कापडावरील बहिष्कार, अस्पृश्योद्धार, मद्यपान बंदी या चळवळीही समक्षपणे

राबविण्यत आल्यात. भारतीय जनतेने घेतलेल्या असहकाराच्या भूमिकेकडे सरकारने दुर्लक्ष करण्याचे धोरण स्वीकारले परंतु असहकार चळवळीने जसे देशामध्ये प्रभावी रुप धारण केले, त्यामुळे सरकार हादरले व सरकारने दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. सत्याग्रहींना पकडून त्यांना लाठीमार करणे, तुरुंगात डांबणे, सभा उधळणे हे मार्ग सरकारने अवलंबले. महात्मा गांधींना सोडून सर्व नेत्यांना सरकारने अटक केली. सरकारच्या या कृतीमुळे जनता व्यथित झाली व प्रतिशोधाच्या भावनेने उद्दिपित झाली. त्याचे प्रत्यंतर 'चौरीचौरा'च्या हिंसक घटनेतून दिसून येते.

५ फेब्रुवारी १९२२ रोजी संयुक्त प्रांतात चौरीचौरा येथे जी हिंसक घटना घडली त्यामुळे महात्मा गांधींनी असहकार चळवळ मागे घेतली. तरी या चळवळीचा प्रभाव वर्धा जिल्हयामध्ये सर्वत्र जाणवतच होता. या चळवळीने लोकांमध्ये उदंड उत्साह, चैतन्य, समर्पणवृत्ती व राष्ट्रभक्तीची लाट निर्माण केली. वर्धा जिल्ह्यातील खेड्यापाड्यांमध्ये या चळवळीचे लोण पसरले.

या 'असहकार आंदोलना'मुळे लोकांच्या 'राष्ट्रीय भावनेचा व देशाभिमाना'च्या भावनेचा उत्कर्ष झाला. या आंदोलनात 'वर्धा जिल्ह्या'ने महत्वाची व मोठी कामगिरी बजावली.

# प्रकरण - ३
# सविनय कायदेभंग व वैयक्तिक सत्याग्रहातील वर्धा जिल्ह्याचे योगदान

**पार्श्वभूमी :**

असहकार आंदोलन ऐन यशस्वितेच्या परमोच्च शिखरावर असतांनाच ५ फेब्रुवारी १९२२ च्या चौरीचौरा घटनेमुळे आंदोलन महात्मा गांधींनी मागे घेतले. सरकारने महात्मा गांधीसह अनेक नेत्यांना तुरुंगात टाकले. त्यामुळे काँग्रेस पक्षात पोकळी निर्माण झाली. अशा वेळी बॅ. चित्तरंजन दास, पं. मोतीलाल नेहरू यांनी स्वराज्य पक्षाची स्थापना केली. या पक्षात विदर्भातील न.चि. केळकर, बॅ. जयकर, मुंजे हे नेते होते. या पक्षाने सतत भारताला जबाबदार शासन पद्धती द्यावी ही मागणी सरकारपुढे केली. तसेच सरकारने पुकारलेल्या जनविरोधी धोरणाचा सतत विरोध केला. परंतु स्वराज्य पक्ष लोकप्रिय होत असतांनाच १९२५मध्ये चित्तरंजन दासांचा मृत्यू झाला. यामुळे स्वराज्य पक्षात फुट पडली. पण पक्षाने सतत जबबादार शासनपद्धतीची जी मागणी केली होती त्यावर विचार करण्यासाठी तसेच भारतात सांसदिय लोकशाही कितपत विस्तारता येईल, जबाबदार शासनपद्धती राबविण्यास देश सक्षम झाला आहे का ? यावर विचारविमर्श करण्यासाठी तसेच १९१९ च्या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होत आहे की नाही, याचा अंदाज घेण्यासाठी सरकारने एका वैधानिक आयोगाची नेमणूक केली. तेच 'सायमन कमिशन' होय. या कमिशनचे सर्व सदस्य युरोपियन होते.

सायमन कमिशन भारतात येताच देशभर हरताळ, निदर्शने याद्वारे व निषेध व्यक्त करण्यात आला. मुंबई, लाहोर, कलकत्ता, लखनौ, पुणे, विजयवाडा, नागपूर येथे कमिशनविरोधात निदर्शने करण्यात आली. स्वतःच्या देशाची घटना कशी असावी, हे ठरविण्याचा देखील अधिकार सरकारने भारतीयांना दिला नाही, ही अपमानास्पद बाब आहे

अशा शब्दात तेजबहादूर सप्रू यांनी सायमन कमिशनबाबत आपली नाराजी व्यक्त केली. अनेक ठिकाणी 'सायमन परत जा' या घोषणा देवून आयोगाप्रती रोष व्यक्त करण्यात आला. ठिकठिकाणी सायमनची प्रतिमा जाळण्यात आली. म्हणून सरकारने दमनतंत्राचा वापर करून दडपशाहीचा मार्ग अवलंबला. आंदोलनकर्त्यांची मुस्कटदाबी केली. त्यांच्यावर लाठीमार केला. या लाठीमारात लाहोर येथे लाला लजपतराय गंभीर जखमी झालेत व या जखमी अवस्थेतच त्यांचा मृत्यू झाला. अशा स्थितीत देशभर संतापाची लाट उसळली. अशा वातावरणात २९ डिसेंबर १९२८ रोजी कलकत्ता येथे पं. मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यात ३१ डिसेंबर १९२८ पर्यंत सरकारने एका वर्षात वसाहतीचे स्वराज्य दिले नाही तर सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्यात येईल असे ठरले. परंतु सरकारने या मागणीकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. म्हणून ३१ डिसेंबर १९२९ च्या काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनात अधिवेशनाचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांनी 'वसाहतीचे स्वराज्य हे काँग्रेसचे अंतिम ध्येय नाही, तर संपूर्ण स्वातंत्र्य हेच काँग्रेसचे अंतिम उद्दिष्ट आहे' हे स्पष्ट केले. तसेच २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून मान्य करण्यात यावा, असाही ठराव मांडण्यात आला. या अधिवेशनाला देशपातळीवरील अनेक नेते उपस्थित होते. या अधिवेशनात काँग्रेसची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. त्यात वर्धा जिल्ह्याला प्रतिनिधित्व देण्यात आले. या कार्यकारिणीत महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू, मौलाना आझाद, चक्रवर्ती राजगोपालाचारी, सरदार वल्लभभाई पटेल, जे.एन. सेनगुप्ता, डॉ. पट्टाभिसितारामय्या, डॉ. सत्यपाल, जयरामदास, दौलतराम, श्री. प्रकाश, डॉ. सैय्यद अहमद, शिवप्रसाद गुप्ता यांच्या बरोबर वर्धा येथील सेठ जमनालाल बजाज यांचा समावेश होता.

लाहोर काँग्रेसच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावानंतर महात्मा गांधींच्या आवाहनानुसार २६ जानेवारी १९३० हा 'पहिला स्वातंत्र्यदिन' अखिल भारतातील प्रांतीक कार्यालयांनी साजरा करण्यात येईल असे ठरले. त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये हा 'पहिला स्वातंत्र्यदिन' साजरा करण्यात आला. तसेच २६ जानेवारी १९३० ला 'वर्धा' येथे

गांधी चौकातून जमनालाल बजाज यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांनी स्वराज्याची प्रतिज्ञा घेतली. तयाचबरोबर आर्वी येथे तालुका काँग्रेस समितीने स्वातंत्र्यदिन पाळला. हिंगणघाट येथेही गोविंदराव देशपांडे वकील यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्यदिनाचा सोहळा पार पडला. ''२६ जानेवारी १९३० पासूनच जनमत तयार करण्यासाठी वर्ध्यातील कार्यकर्ते कटिबद्ध झाले. जमनालालजी, भगवानदिन, निळकंठराव देशमुख, हटवाई, अभ्यंकर, खरे, व पुनमचंद रांका प्रचारार्थ व स्वयंसेवकांना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करू लागलेत.''[१]

महात्मा गांधींनी लॉर्ड आयर्विन यांना पत्राद्वारे भारतीयांच्या वतीने ११ मागण्या कळविल्यात. परंतु या मागण्यांकडे आयर्विन यांनी दुर्लक्ष केले. मागण्यांचा प्रस्ताव सरकारने फेटाळून लावताच गांधीजींनी सविनय कायदेभंग हा एकमेव पर्याय आहे हे ओळखले व 'सविनय कायदेभंग' चळवळीचा कार्यक्रम जाहीर केला.

## सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम :

१. मिठाचा सत्याग्रह करणे

२. राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करणे

३. परकीय मालावर बहिष्कार टाकणे.

४. सरकारी नोकऱ्यांचा त्याग करणे.

५. न्यायालयीन कामकाजांवर बहिष्कार घालणे.

६. संपूर्ण दारुबंदी

७. जंगल कायद्यांचा भंग करणे इ.

सविनय कायदेभंगाच्या कार्यक्रमाचा सर्वत्र प्रसार व्हावा या दृष्टिकोनातून काँग्रेसतर्फे परिपत्रक काढण्यात आले व त्यानुसार कार्य करण्याचे ठरले.

या चळवळीत दोन कालखंड आहेत.

---

१. चौधरी, किं. का. (संपादक)- वर्धा जिल्हा गॅझेटिअर, पृ. ७४

१. पहिली कायदेभंग चळवळ - पहिला टप्पा (मार्च १९३० ते मार्च १९३१)

यात प्रामुख्याने मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, जप्त साहित्य सत्याग्रह, निवडणुकांवर बहिष्कार, साराबंदी, विदेशी कापडावर बहिष्कार व होळी हे कार्यक्रम राबविण्यात आले.

२. दुसरी कायदेभंग चळवळ - (३ जानेवारी १९३२ ते २६ जानेवारी १९३३)

यात प्रामुख्याने कौन्सिल प्रवेशावर बहिष्कार, साराबंदी, निवडणुकांवर बहिष्कार हे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले.

## दांडी सत्याग्रह :-

या दोन्ही कालखंडातील सविनय कायदेभंग चळवळीने शासकीय यंत्रणा मुळापासून खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला. या चळवळीचा प्रांरभ 'दांडी' यात्रेपासून झाला. १२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधी सकाळच्या प्रार्थनेनंतर ७८ आश्रमवासीयांसह साबरमती आश्रमातून दांडी कडे मिठाच्या सत्याग्रहाकरिता निघाले. साबरमती ते दांडी या प्रवासादरम्यान वाटेत जी खेडी आली तेथील लोक यात्रेत सहभागी झाले. ५ एप्रिल १९३० ला गांधीजी आपल्या अनुयायांसह दांडी येथे पोहचले. ६ एप्रिल ला त्यांनी दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून सरकारने मीठावर जे कर लादले होते त्या कायद्याचा भंग केला. याचवेळी सरोजिनी नायडू यांनी ''आम्ही मिठाचा कायदा मोडला'' अशी घोषणा केली आणि कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात झाली. या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत 'वर्धा जिल्ह्या'ने अपूर्व 'योगदान' दिले. या दांडी यात्रेमध्ये काही दिवस वर्धा येथील जमनालाल बजाज यांच्या पत्नी जानकीदेवी व मुलगा कमलनयन सहभागी झाले होते.

## सविनय कायदेभंग चळवळ - वर्धा जिल्हा :-

दांडी यात्रेदरम्यान प्रांतिक कमिटीने 'युद्ध कमिटीची' स्थापना करण्यात आली. ''१६ मार्च १९३० रोजी प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष मोरोपंत अभ्यंकर, उपाध्यक्ष भगवानदिन, जनरल सेक्रेटरी पुनमचंद रांका, दु. सेक्रेटरी एम.एन. घटवाई, कोषाध्यक्ष सेठ जमनालाल

बजाज यांनी आंदोलनाची द्वाही फिरविण्यासाठी व स्वयंसेवकांची नोंदणी करण्यासाठी संपूर्ण प्रांताचा दौरा केला.'' [२]

प्रांतिक स्तरावर ज्याप्रमाणे आंदोलनाकरिता 'युद्धमंडळे' स्थापन केली गेलीत त्याचप्रमाणे जिल्हा व तालुका स्तरावरही युद्धमंडळे स्थापन करण्यात आले. वर्धा येथील सत्याग्रह आश्रमातील अनेक सत्याग्रहींनी चळवळीकरिता आपल्या नावांची नोंदणी केली आणि दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावरुन गांधीजींनी सविनय कायदेभंगाची घोषणा करताच 'वर्धा' जिल्ह्यातील 'युद्धमंडळे' कामाला लागली.

## मुंबई येथील सत्याग्रहात वर्धा जिल्ह्याचा सहभाग :-

दि. १२ मार्च ते ६ एप्रिल, १९३० ला महात्मा गांधींनी जी दांडी यात्रा केली त्याचे पडसाद संपूर्ण देशात उमटलेत. त्यांनी दांडी येथे आंदोलन करताच संपूर्ण देशभर कायदेभंगाच्या आंदोलनाला फार मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. गांधीजींनी वर्धा येथील प्रसिद्ध व्यापारी 'सेठ जमनालाल बजाज' यांना मुंबईचे पहिले 'काँग्रेस सर्वाधिकारी' म्हणून नियुक्त केले. मुंबईतील विलेपार्ले येथे समुद्रातून पाणी आणून मीठ बनविणचा प्रयत्न करीत असतांना सरकारने जमनालाल बजाज, किशोरीलाल मश्रुवाला, दास्ताने यांना अटक केली. जमनालाल बजाज यांचेनंतर काँग्रेसच्या सर्वाधिकारी कमलादेवी सोनावाला व नंतर जानकीदेवी बजाज सर्वाधिकारी बनल्यात. हा निश्चितच 'वर्धा, जिल्ह्याकरिता बहुमान होता. जानकीदेवी बजाज यांनी महात्मा गांधींच्या सुचनेनुसार अनेक स्त्रियांना चळवळीत सामील होण्यास प्रेरित केले.

या चळवळीत स्वतः झोकून कार्यप्रवृत्त होणाऱ्या जमनालाल बजाज यांना अटक करण्यात आली. त्यांना २०० रु. दंड व २ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा फर्माविण्यात आली. त्यांना अटक झाली याची वार्ता वाऱ्यासारखी वर्धा जिल्ह्यात पसरताच शहरात हरताळ पाळण्यात येवून 'मीठाचा सत्याग्रह' करण्यासंबंधी सर्वत्र जाहीर सभा घेण्यात आल्यात. या सत्याग्रहात सर्वांनी सहभागी व्हावे, याकरिता लोकांना आवाहन करण्यात आले. ''वर्धा

२. बैस डॉ. वीरेंद्र- वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. ४७

जिल्ह्यातील कायदेभंगाचे नेतृत्व स्थानिक पुढाऱ्यांकडे देण्यात आले. त्यामध्ये रामभाऊ श्रोती, घटवाई, थत्ते, तेजराम गहलोत, कन्हैय्यालाल, आडकोबा पाटील, निळकंठराव देशमुख, अंबादास देशपांडे, बळीराम जळीत, केशव भुसारी, वल लभदास जाजू, नारायणराव वाघ, शिवराज चुडीवाले, काशीनाथ दलाल, साळवे वकील, बॅ. गोविंदराव देशमुख, चिरंजीलाल, मोतीलाल बाबू, श्रीकृष्णदास जाजू, डॉ. आपटे, नानाजी कदम, गुलाबराव वाघ, दीनदयाळ गुप्त, मश्रुवाला, गोपाळराव राठी अशी कित्येकांची नावे उल्लेखनीय आहेत. ''[३] ही नामावळी अपुरी असून केवळ प्रतिकात्मक स्वरुपाची आहे. (गॅझेटिअर संदर्भ पृ. ७५) वर्धा जिल्ह्यामध्ये सत्याग्रहाकरिता जी युद्धमंडळे स्थापन करण्यात आली होती त्यांनी अतुलनीय कामगिरी बजावली. वर्धा जिल्ह्यातील शेकडो काँग्रेस कार्यकर्ते अकोला जिल्ह्यातील दहीहांडा येथे सत्याग्रह करण्यास गेली.

## दहीहांडा सत्याग्रह :-

विदर्भामध्ये समुद्रकिनारा उपलब्ध नसल्याने मिठाचा सत्याग्रह कसा करावा हा प्रश्न होता. म्हणून विदर्भात ज्या ठिकाणी खाऱ्या पाण्याच्या विहीरी आहेत त्या विहीरीतील पाणी काढून मिठाचा सत्याग्रह करायचा असे ठरले. जेथे खारे पाणी उपलब्ध आहे तेथून पाण्याचे डबे भरून आणायचे व सभास्थळी एका कढईत टाकून ते पाणी आटवायचे आणि तयार झालेले मीठ विकायचे, असा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. मुळशी सत्याग्रहातील नेते 'बापुसाहेब सहस्त्रबुद्धे' यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींचे पथक 'दहीहांडा' येथे पोहचले व त्यांनी विहीरीचे खारे पाणी काढून मीठ तयार करुन मिठाचा कायदा मोडला. ''या सत्याग्रहात डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली अमरावती येथून श्री. कृष्णराव गारडगावकर यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा येथून, तर श्री. बच्चू महाराज यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ येथून सत्याग्रहींचे पथक दहीहांडा येथे गेले. तर श्रीमती दुर्गाताई जोशी यांच्या नेतृत्वाखाली महिला सत्याग्रहीचे पथक सत्याग्रहास आले.'' [४]

---

३. चौधरी, किं. का. (संपादक)- वर्धा जिल्हा गॅझेटिअर, पृ. ७५

४. कोलारकर, डॉ. शं.गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. १२५-१२६

## वर्धा जिल्हयातील मीठाचा सत्याग्रह :-

सर्व सत्याग्रहींना दहीहांडा येथे जाणे शक्य नसल्याने दहीहांडा येथून मीठाच्या पुड्या बनविण्यात येवून त्या गावोगावी पाठविण्यात येई. वर्धा येथेही या पुड्या विक्रीला आल्यात.

वर्धा जिल्ह्यामध्ये स्थानिक लोकांना नेत्यांनी सत्याग्रहाकरिता सज्ज केले. १३ एप्रिल १९३० ला आर्वी, हिंगणघाट येथे व २७ एप्रिल १९३० रोजी वर्धा येथे सत्याग्रह झाला. वर्धा, हिंगणघाट, आर्वी या तालुक्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह झाला. या सत्याग्रहामध्ये स्त्रियाही अतिशय उत्साहाने सहभागी झाल्यात. दि. १३ एप्रिल १९३० रोजी हिंगणघाट येथे कमलाताई दातार यांनी स्त्रियांना कायदेभंगाबाबत आवाहन केले. त्यावेळी उपस्थित स्त्रियांपैकी जवळपास तीस स्त्रियांनी कायदेभंगाची प्रतिज्ञा केली. हिंगणघाट येथे नि.मु. घटवाई यांच्या अध्यक्षतेखाली दहीहांडा येथून आणलेल्या खाऱ्या पाण्यापासून मीठ बनविण्यात येवून त्या मीठाच्या पुड्या बांधून त्या विकण्यात आल्या.. ''विनोबा भावे यांनी गैरकायदा मीठाच्या ७० पुड्या विकल्या. तालुक्यामध्ये नि.मु. घटवाई व बाबासाहेब देशमुख यांनी तरोड , वडनेर, पोहणा, अल्लीपूर येथे मिठाच्या पुड्या विकल्यात. ''[५]

हिंगणघाटप्रमाणेच आर्वी येथे श्री. रामभाऊ श्रोती, वानखेडे, श्री. बळीराम जळीत, वल्लभदास जाजू, बाबुराव देशपांडे, तुकाराम चव्हाण, चंपतराव पानबुडे, रामभाऊ गायकवाड, नारायणराव वाघ, केशवराव भुसारी, जनार्दनपंत देशमुख यांनी खाऱ्या पाण्यापासून मीठ तयार करुन त्याची गैरकायदा विक्री केली. पुलगाव येथेही मीठ विक्री करण्यात आली.

परंतु विहीरीच्या पाण्यापासून मीठ बनविण्याच्या कार्यात भरपूर मर्यादा होत्या ते लक्षात घेऊनच सविनय कादेभंग कार्यक्रमातील जंगल सत्याग्रह, विदेशी कापडावर बहिष्कार, दारू पिकेटिंग अशा उपक्रमांवर भर देण्यात आला.

## वर्धा जिल्ह्यातील कायदेभंग सत्याग्रहातील युद्धमंडळाची भूमिका :-

सविनय कायदेभंगाला सुरुवात झाली त्यावेळी चळवळीकरिता प्रांतिय युद्धमंडळांची स्थापना करण्यात आली. या युद्धमंडळाने मीठाच्या सत्याग्रहाचे लोण प्रांतातील

---

५. कानेटकर, मा. ज. - नागपूर प्रांताचा इतिहास, पृ. ४५

खेड्यापाड्यापर्यंत पोहचविले. सत्याग्रहींकरिता सत्याग्रहींची नोंदणी केली. प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष जमनालाल बजाज, उपाध्यक्ष भगवानदिन यांनी वर्धा जिल्ह्याचा दौरा करून लोकांना सत्याग्रहाकरिता तयार केले. प्रांतिय युद्धमंडळाचे अध्यक्ष पुनमचंद रांका यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ व २६ जून १९३० ला आर्वी येथे तालुका 'काँग्रेस स्वयंसेवक संमेलन' भरले . त्यात चळवळीच्या ध्येय प्रणालीला सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता 'काँग्रेस बुलेटिन' सुरु करावे असे निश्चित झाले. या संमेलनाला श्री. अत्रे, श्री. खरे, ढवळे वकील, बाबाराव देशमुख, कर्मवीर पाठक, धर्माधिकारी उपस्थित होते. या संमेलनात ठरल्याप्रमाणे काँग्रेस बुलेटिन काढण्यात आले. प्रकाशनाचे कार्य बाबासाहेब देशमुख पाहत असत. या काँग्रेस बुलेटिनने फार मोठी जनजागृती लोकांमध्ये घडवून आणली.

**जंगल सत्याग्रह :-**

विदर्भापासून समुद्रकिनारा ५०० मैलांवर होता. त्यामुळे मिठाचा सत्याग्रह वेगळया प्रकारे झाला असूनही तो फारसा परिणामकारक ठरला असे म्हणता येणार नाही. कारण प्रांतिक युद्धमंडळाने बेकायदेशीर मिठाच्या पुड्या विकल्यात परंतु सरकारने कोणतीही कारवाई केली नाही. म्हणून सत्याग्रहींची निराशा झाली पण तरीही विदर्भातील शेकडो लोकांनी दहीहांडा येथील मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला आणि बेकायदेशीर मीठ लोकांनी विकत घेतले व विकले. या कायदेभंगाला जनतेच्या खालच्या स्तरावर कसे पोहचविता येईल त्याकरिता आणखी काय करता येईल याचाही विचार करून विदर्भातील यवतमाळ येथील बापुजी अणे यांनी जंगल सत्याग्रहाची आवश्यकता प्रतिपादन केली. तसेच महाराष्ट्र नागरिक कायदेभंग कमिटीने सरकारच्या जंगल कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताला धोका निर्माण होतो. म्हणून जंगल कायद्या विरोधात सत्याग्रह करण्याचे ठरविले. हा कायदा नष्ट होण्यासाठी 'जंगल सत्याग्रह' करण्याचा पहिला निर्णय 'यवतमाळ' जिल्हा परिषदेने घेतला.

देशाची साधनसंपदा म्हणजे जंगल. या जंगलावर सरकारने अनेक जाचक निर्बंध प्रस्थापित केले. वास्तविक पाहता सरकारने १८८४ मध्ये एक वटहुकुम काढून जंगल

कायद्यांची अंमलबजावणी करतांना नेहमीच शेतकऱ्यांचे हित जोपासण्यात येईल, असे स्पष्ट केले होते. परंतु सरकारने या वटहुकुमाची अंमलबजावणी केली नाही. उलट जाचक स्परुपाची वनविषयक कायदे केलेत. ठेका पद्धतीने जंगल विकून राजस्व प्राप्त करणे सुरु केले. तेव्हा हे जंगलाचे कायदे रद्द करण्याकरिता बापूजी अणे यांनीही जंगल सत्याग्रहाची आवश्यकता प्रतिपादन करुन आपली कल्पना काँग्रेसच्या प्रांतिक युद्धमंडळाकडे पाठविली. ''यवतमाळच्या डिस्ट्रिक्ट असोसिएशनने दि. २६ एप्रिल १९३० रोजी असा ठराव केला की, सरकारच्या जंगल कायद्यामुळे अन्याय होत आहे आणि तो अन्याय दूर करण्याकरिता जंगल सत्याग्रहाला आम्ही प्रारंभ करीत आहोत. बापुजी अणे यांच्या प्रेरणेने घेण्यात आलेल्या या निर्णयास काँग्रेसच्या प्रांतिक युद्धमंळाने संमती दिली.'' [६]

जंगलातील गवत कापणे, वनोत्पादन हस्तगत करणे व त्याद्वारे सरकारने केलेल्या अन्यायकारी जंगल कायद्याचा भंग करणे, असे जंगल सत्याग्रहाचे स्वरूप ठरविण्यात आले. जमीन आपली परंतु त्या जमीनीवरील झाडांवर व पानांवर आपला अधिकार नाही ही बाब निश्चितच अयोग्य व अन्यायकारी होती.

पुसद जवळील 'महुली' या गावी सर्वप्रथम जंगल सत्याग्रह 'बापूजी अणे' यांच्या नेतृत्वाखाली झाला. १० जुलै १९३० रोजी सकाळी 'पूस' नदीच्या वाळवंटात अंदाजे पाच हजारांच्या जनसमुदायाला अणे यांनी 'हा सत्याग्रह का ?' या विषयावर संबोधित केले. त्यावेळी अणेंना चांदीचा कोयता व चांदीचा परशू देण्यात आला. त्यांनी त्याच कोयत्याने गवत कापले व स्वयंसेवकांना गवत कापण्यास सांगितले. त्यावेळी सरकारने सत्याग्रहींची धरपकड केली. बापुजी अणेंना अटक करण्यात आली. त्यांचे कार्य पुढे त्यांच्या अनुयायांनी केले.

यवतमाळ प्रमाणेच अमरावती जिल्ह्यातील वडाळी, यावली, डवरगांव, चिंचखेड येथेही जगल सत्याग्रह पुकारण्यात आला. बुलढाणा जिल्यामध्ये जिगाव, म्हैसवाडी,

---

६ कोलारकर, डॉ. शं.गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. १३३

मलकापूर, राजूर, कडनेर, तालसवाडी, अंबाडा, अकोला जिल्ह्यामध्ये लोणी, भंडारा जिल्हयातील चिंचोली, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये लोहारा येथे जंगल सत्याग्रह झाले.

**वर्धा जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह :-**

नागपूर प्रांतिक युद्धमंडळाने जंगल सत्याग्रहासाठी प्रांतिक केंद्र म्हणून कोणत्या भागाची निवड करावी, यासाठी डॉ. खरे, श्री. बाबासाहेब देशमुख, श्री. आप्पासाहेब ढवळे यांची एक समिती नेमली. या समितीने वर्धा, आर्वी, तळेगांव, कोंढाळी, काटोल, उमरेड या भागाचा दौरा करून त्यात 'तळेगांव' येथे सत्याग्रह शिबीर घेण्याचे ठरले . १७ जुलै १९२० ला या सत्याग्रह शिबीरात प्रांतीय युद्धमंडळाने ध्वजारोहण केले परंतु या सर्व सत्याग्रह शिबीरात समाविष्ट असणाऱ्या व नेतृत्व करणाऱ्या सत्याग्रहींना सरकारने तात्काळ अटक केली. पूनमचंद रांका यांच्यानंतर श्री. गणपतराव टिकेकर युद्धमंडळाचे प्रमुख बनले. टिकेकरांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींची एक तुकडी गौंडखैरी, बाजारगाव, कोंढाळी, ठाणेगांव, कारंजा, कारंजा, सारवाडी येथून तळेगांवकडे आली. मार्गामध्ये लोकांनी ठिकठिकाणी सत्याग्रहींचे स्वयंस्फूर्तीने स्वागत केले. दि. २४ जुलैला नागपुरवरून निघालेली सत्याग्रहींची ही तुकडी दि. १ ऑगस्ट रोजी तळेगांवला येवून पोहचली. तळेगांवच्या जंगलात सत्याग्रह पुकारण्यात आला. सुमारे ३०,००० लोक या सत्याग्रहात समाविष्ट झालेत. तळेगांवच्या सत्याग्रहामध्ये कॉंग्रेस व्यतिरिक्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, दलित युद्धमंडळ व अनाथ विद्यार्थी गृह या संघटनांनीही आपले स्वयंसेवक पाठविलेत. राजकीय आंदोलकांशिवाय माडखोलकर यांच्यासारख्या साहित्यिकानेही या सत्याग्रहात भाग घेतला.''[७]

वर्धा जिल्ह्यातील तळेगांवच्या जंगल सत्याग्रहाने उग्र रुप धारण केले. स्वयंसेवक लोकांना झाडे तोडण्यास सांगत व लोक त्यांच्या आदेशाचे तंतोतंत पालक करीत. त्यामुळे सरकारने सत्याग्रहीबाबत दमनतंत्राचा वापर केला. जंगल सत्याग्रहाचे स्वरुप जरी गवत कापून आणणे, वनोत्पादन हस्तगत करणे इतके होते तरी या सत्याग्रहाची दिवसेंदिवस वाढलेली व्याप्ती व लोकसहभाग हा सरकारच्या चिंतेचा विषय बनला.

---

७. चौधरी, किं. का. (संपादक) - वर्धा जिल्हा गॅझेटिअर, पृ. ७७

तळेगांव जवळील 'आर्वी' हे तर राष्ट्रवादी विचारसरणीचे माहेरघरच होते. सत्याग्रहींनी आर्वी परिसरात शासनाची स्थिती डळमळीत केली. ती इतकी की आर्वीतील या परिस्थितीबद्दल पोलीस अधीक्षकाने गृह मंत्र्याच्या बैठकीत आर्वी तहसिलमध्ये खऱ्या अर्थाने शासन अस्तित्वातच नाही. मध्यप्रांताचा गव्हर्नर मॉंटेग्यू बटलर याने दिवसेंदिवस उग्र रुप धारण केलेल्या जंगल सत्याग्रहाबद्दल भीती व्यक्त करीत असतांना परिस्थितीला जर नियंत्रणाखाली आणावयाचे असेल तर सत्याग्रहींवर गोळीबार करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. यावरून जंगलविषयक कायद्याचे उल्लंघन करण्यात कॉंग्रेसने जे यश मिळविले याचा तीव्र प्रत्यय येतो. या गंभीर स्थितीला नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने अध्यादेशांचे अधिराज्य निर्माण केले. व शेकडो सत्याग्रहींना तुरुंगात डांबले. पण त्याची तीव्रता थोडीही कमी झाली नाही.

३ ते १० ऑगस्ट हा बहिष्कार सप्ताह आखलेला होता. या सप्ताहात झेंडा दिन, बहिष्कार दिन, पिकेटिंग दिन, महिलांचा दिवस, गढवाल दिन व राजबंदी दिन साजरे करण्यात आले. ऑगस्ट १९३० हा सत्याग्रहाचा परमोच्च बिंदू होता. जंगल सत्याग्रह करणाऱ्यास फटक्यांची शिक्षा होईल असा धाक पोलिसांनी दिला. अनेकांना दंड केले, कित्येकांकडून जबरदस्तीने दंड वसूल केले. ते वसुल करतांना अत्याचारही केलेत पण सत्याग्रहींना कशाचीच तमा नव्हती. जंगल सत्याग्रह चिरडून टाकण्यासाठी मध्यप्रांतातील सरकारने अमानुष उपाययोजना केली व सत्याग्रहींना फटके मारण्याची शिक्षा ठोठावली. सरकारने अन्यायपूर्वक केलेल्या वनविषयक कायद्याचा भंग करण्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक व मध्यप्रांत या जंगलव्याप्त लोकांनी सत्याग्रह पुकारलेत. या सत्याग्रहात स्त्रियाही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्यात. गांधीजींनी पुरस्कृत केलेल्या कायदेभंग चळवळीला सत्याग्रहींनी 'जंगल सत्याग्रहा'द्वारे अधिकच परिणामकारक ठरविले.

पुढे प्रांतिक युद्धमंडळाने तळेगांव हेच जंगल सत्याग्रहाचे केंद्र राहणार नसून वर्धा जिल्ह्यातील अनेक ठिकाणी सत्याग्रह करण्यात येईल असे जनतेला आवाहन केले.

तळेगांवला होणाऱ्या प्रांतिक जंगल सत्याग्रहासाठी आर्थिक जबाबदारी आर्वी तालुका काँग्रेस कमिटीने स्वतः स्वीकारली. त्यानुसार तळेगांव, वर्धमनेरी, कारंजा, पिंपळखुटा या गावातील लोकांनी सत्याग्रहात उत्स्फूर्तपणे भाग घेतला. त्यानुसार अनेक ठिकाणी सत्याग्रह झालेत. दि. १७-७-१९३० रोजी गोपालदास राठी यांनी मिळवून दिलेल्या जागेवर 'राष्ट्रीय ध्वज' उभारून 'झेंडा उंचा रहे हमारा' हे गीत गाऊन जंगल सत्याग्रह केला. यावेळी बाबासाहेब देशमुख यांनी परिसरातील तरुण, वृद्ध, पुरुष, स्त्रिया यांनी अहिंसामय पद्धतीने कार्य करावे, असा संदेश दिला.

वर्धा जिल्ह्यातील 'आर्वी' येथे 'जंगल सत्याग्रहा'साठी मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवकांची नोंदणी करण्याकरिता आर्वी तालुक्याच्या युद्धमंडळाचे अध्यक्ष बळीरामपंत जळीत व तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बाबासाहेब देशमुख यांनी तालुक्यातील विविध गावांमध्ये व्याख्याने देवून सत्याग्रहासाठी लोकांना प्रेरित केले. त्याचप्रमाणे खरांगणा युद्धमंडळाचे अध्यक्ष नारायण वाघ, कारंजा युद्ध मंडळाचे अध्यक्ष केशवराव भुसारी यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखली डॉ. वानखेडे, सरदार देशपांडे, तुकाराम चव्हाण, वल्लभदास जाजू, चंपतराव पानबुडे, गोपालदास राठी यांनी स्वयंसेवकांची नोंदणी केली. खुबगांव येथील नवनीतलाल भट्ट, शामराव यांनी नांदपूर, वाठोडा, खुबगांव, शिरपूर, अहिरवाडा, देउरवाडा, सर्कसपूर, बोरगांव, नेरी, अंतरडोह या गावामध्ये प्रभातफेरी ,झेंडावंदन व व्याख्याने देवून लोकजागृती घडवून आणली.

जंगल सत्याग्रहाला घराघरात नेवून पोहचविण्यासाठी डॉ. वानखेडे यांनी मराठी, हिंदी या भाषेतून एक बुलेटिन काढले. तर वल्लभदास जाजू यांनी जंगल सत्याग्रहाला प्रेरीत करण्यासाठी 'क्रांती गजले' नावाचे पुस्तक काढले. या पुस्तकातून त्यांनी चेतावणी दिली.

'' ये नोकरशाही कुत्तो, समय है तु जग जाओ ।
अंग्रेजोको मार भगानेमें, जनतासे मील जाओ ॥

याद रखो ये नमक हरामो, यदी न समयपर चेतोगे ।

नष्ट भ्रष्ट अरू वंश रहीत, हो बुरी मौत मर जाओगे ॥''

या 'क्रांती गजले' पुस्तकाची छपाई महाजनी छापखान्याचे प्रोप्रायटर श्री. पुनमचंदजी यांनी केली. त्याच्या त्यांनी पाच हजार प्रती छापल्या. त्यातील क्रांतीकारी विचारांमुळे जागे होवून सरकारने वल्लभदास जाजूंच्या घरातील छापखान्याची झडती घेतली व प्रती जप्त करुन त्या जाळल्या.''[८]

तळेगांव येथील सत्याग्रहाप्रमाणेच वर्धा-नागपूर रस्त्यावरील 'केळझर' येथे श्री. काशीनाथ महाकाळकर यांचे नेतृत्वाखाली फार मोठा सत्याग्रह करण्यात आला.

प्रांतिक युद्धमंडळाच्या आदेशानुसार 'केळझर' येथे काशीनाथ महाकाळकर यांचे नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहात अमृतराव देशमुख, नागोराव पोटदुखे, नरके, धोंगडी, तात्याजी उपदेव इत्यादिंनी सत्याग्रहात भाग घेतला. सकाळी ८-०० वाजता राष्ट्रीय झेंड्याला वंदन करून स्वयंसेवकांनी केळझरच्या जंगलाकडे प्रस्थान केले. याप्रसंगी उपस्थित जनसमुदायाला एका सभेत सत्याग्रहासंबंधीच्या सूचना देण्यात आल्यात व दुपारी १-०० वाजता जंगलातील गवत कापून जंगलाच्या कायद्याचा भंग करण्यात आला. त्यावेळी सरकारने काशिनाथ महाकाळकर यांचेसोबत सत्याग्रहात समाविष्ट असणाऱ्या स्वयंसेवकांना अटक केली. केळझरप्रमाणेच सालई येथे जंगल सत्याग्रह झाला. वर्धा जिल्ह्यात झालेल्या या सत्याग्रहाने विराट रुप धारण केले. या सत्याग्रहाचे स्वरुप गवत कापून आणणे, वनउत्पादन हस्तगत करणे इतके मर्यादित असले तरी त्यामुळे सरकारच्या विरोधातील या कृतीचा प्रभाव सरकारवर पडला. वर्धा जिल्ह्यातील या सत्याग्रहात विविध स्तरातील लोकांनी आपला मोलाचा सहभाग नोंदविला.

तळेगाव, केळझर, खरांगणा, सालई या व्यतिरिक्त जिल्ह्यात अनेक लहान मोठे सत्याग्रह झालेत. यास सत्याग्रहांनी सरकार समोर प्रचंड आव्हान उभे राहिले म्हणून सरकारने सत्याग्रहींची धरपकड करून चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला.

---

८. बैस डॉ. वीरेंद्र- वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. ६९-७०

## जप्त साहित्य सत्याग्रह :-

मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह या प्रमाणेच एका आगळावेगळा सत्याग्रह पुकारण्यात आला. आणि तो म्हणजे 'जप्त साहित्य सत्याग्रह'. भारतीय राष्ट्रवादाला खतपाणी घालणाऱ्या साहित्यावर बंदी घातली व ते साहित्य जप्त केले. म्हणून असा जप्त साहित्याचे वाचन सार्वजनिक सभांमधून करण्याचे ठरले. निरनिराळया सभांमधून 'भारत में अंग्रेजी राज', 'काकोरी के शहीद' मॅझिनी या पुस्तकातील उतारे वाचण्यात आले. जप्त साहित्यातील उताऱ्याच्या सायक्लोस्टाईल कॉपी तयार करायच्या व त्या प्रती तयार करून सर्वत्र पाठवून कायद्याचा भंग करण्यात आला. २१ मे १९३० ला नागपूरमध्ये साधारणतः १३ सभांमधून जप्त साहित्याचे वाचन करण्यात आले.

वर्धा जिल्ह्यामध्येही जप्त साहित्याचे सार्वजनिक सभांमधून वाचन करण्यात आले. ''वर्धा, आर्वी, हिंगणघाट येथे मोठ्या प्रमाणावर जप्त साहित्य सत्याग्रह झाला. चंपतराव पानबुडे, थत्ते वकील, रामभाऊ श्रोती, गहलोद, शिवराज चुडीवाले, नारायणराव वाघ, नि. घटवाई, केशवराव भुसारी, कृष्णराव भोसले, मारोतराव जळीत, चिरंजीलाल बडजाते, शंकरलाल आचार्य, महादेवराव रानोडकर यांनी जप्त साहित्याची प्राप्ती करून त्याचे जाहीर सभेत वाचन करण्याचे कार्य केले.'' व कायद्याचा भंग केला. परंतु वऱ्हाडच्या सत्याग्रहींवर मॉंटेग्यू व बटलर यांनी कोणतीही कारवाई केली नाही.

मिठाचा सत्याग्रह, दारुबंदी सत्याग्रह, विदेशी कापड बहिष्कार सत्याग्रह, जप्त साहित्य सत्याग्रह, जंगल सत्याग्रह याबरोबरच वर्धा जिल्ह्यातील लोकांनी सविनय कायदेभंग करतांना केलेला महत्वाचा सत्याग्रह म्हणजे निवडणुकांवरील बहिष्कार सत्याग्रह अतिशय नाट्यमय ठरला. या आंदोलनात सहभागी असलेल्या नेत्यांना व सत्याग्रहींना सरकारने अटक केली. तसेच कॉंग्रेस व इतर सहकारी संघटनांना सरकारनेअटक केली. तसेच कॉंग्रेस व इतर सहकारी संघटनांना बेकायदेशीर ठरविले . वर्धा येथील जमनालाल बजाज यांना सरकारने अटक केली. त्या काळात त्यांचेवर ५०० रु. दंड व एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. त्यांचा बंगला, मालकीच्या इतर इमारती, बाग, तिजोऱ्या व गायी जप्त करण्यात आल्या.

सविनय कायदेभंग चळवळीत वर्धा येथील सत्याग्रह आश्रमानेही महत्वाची भूमिका बजावली. गावोगावी जाऊन स्वयंसेवकांना संघटीत करणे व जनजागृती घडवून आणणे हे कार्य सत्याग्रह आश्रम करीत होता. युद्धमंडळे स्थापन करुन या आश्रमातील सत्याग्रहींनी नागपूर येथील झेंडा सत्याग्रहातही मोलाचे योगदान दिले होते. विनोबा भावे, गोपाळराव काळे, भाऊ पानसे, द्वारकाप्रसाद हरकरे, वाळुंजकर, द स्ताने यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. या सत्याग्रह आश्रमाकडे सरकारची वक्रदृष्टी वळली. पुरुष सत्याग्रही प्रमाणेच वर्धा येथील महिला आश्रमातील स्त्रियाही या आंदोलनात सहभागी झाल्यात. आश्रमातील स्त्री-पुरुष सत्याग्रहींना सरकारने अटक केली. जानकीदेवी बजाज, गंगाबाई देशमुख, सरस्वतीबाई, गजराबाई, भिमाबाई, गंगुबाई दुर्गे, जानकीबाई मोरे, सखुबाई भिसे यांना सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.

वर्धा जिल्ह्यामध्ये कायदेभंग चळवळीला जोम चढला. यात सामान्य लोकांचा सहभाग वाढत गेला. ''वर्धा तहसिलमध्ये सरासरी ५०० सत्याग्रहींना अटक झाली. त्यात ७५ स्त्रिया तुरुंगात गेल्या. त्यापैकी चाळीस वर्धा शहरातील असून ३५ तालुक्यातील होत्या.'' [९] या चळवळीत जिल्ह्यातील स्त्रियांनी अद्वितीय कार्य केले. त्यांच्या सहभागाबाबत ब्रिटीश निरीक्षक लिहून ठेवतात की, सविनय कायदेभंगाच्या चळवळीने दुसरे काही श्रेय मिळविले असो वा नसो भारतीय महिलांच्या सामाजिक उद्धाराला फार मोठा हातभार लागला.

वर्धा येथील सत्याग्रह आश्रम सरकारने जप्त केला. पुढे सरकारने डिसेंबर १९३५ ला जप्ती आदेश मागे घेतला. या चळवळीने लोकांमध्ये 'राष्ट्रवाद' निर्माण केला. एप्रिल १९३४ मध्ये काँग्रेसने सविनय कायदेभंग आंदोलन मागे घेतले. या आंदोलनाची फलनिष्पत्ती म्हणजे अधिकाधिक जनता राष्ट्रीय प्रवाहात आली. आतापर्यंत जे स्वातंत्र्य आंदोलन सुशिक्षीतांपुरते मर्यादित होते त्यात आता बहुजन समाजही सामील झाला. ''विशेष म्हणजे स्वातंत्र्य सैनिकांच्या लोकसंख्येतील प्रमाणात सरहद्द प्रांतानंतर वर्धा तालुक्याचा भारतात दुसरा क्रमांक होता.'' [१०]

यावरुनच या चळवळीत वर्धा जिल्ह्याने चळवळीत बजावलेली भूमिका व योगदान आपल्या लक्षात येते.

---

९. कित्ता - पृ. ६४

१०. चौधरी किं.का. (संपादक) वर्धा जिल्हा गॅझेटिअर, पृ. ८१

## वैयक्तिक सत्याग्रह व वर्धा जिल्हा :-

१९४० मध्ये पुकारण्यात आलेला 'वैयक्तिक सत्याग्रह' हा तात्कालिन जागतिक परिस्थितीचा परिणाम होता. १ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने पोलंडवर आक्रमण केले, त्यावेळी पोलंडच्या रक्षणार्थ इंग्लंड - फ्रान्सने युद्धात उडी घेतली व आपल्या वर्चस्वाखालील भारत या वसाहतीला भारतीयांचे मत विचारात न घेता युद्धात सहभागी करून घेतले. त्यामुळे भारतीयांमध्ये 'असंतोष' निर्माण झाला. मार्च १९४० मध्ये मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली 'रायगढ' येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सरकारने भारतीय सैनिकांची केलेली जबरदस्तीची सैन्यभरती, सरकारचे जुलमी धोरण, युद्धखर्चाकरिता भारतीयांकडून सक्तीची आर्थिक वसुली या बाबींचा निषेध केल्या गेला. तर एप्रिल १९४० ला 'वर्धा' येथे काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभेत सरकारने हिंदुस्थानच्या भविष्याबाबतचा स्पष्टपणे खुलासा करावा, अशी मागणी करावी असे ठरले. ती मागणी समोर येताच 'व्हॉईसरॉय लिनथिनगो' यांनी 'ऑगस्ट ऑफर' घोषित केली. पण त्याने भारतीय नेत्यांचा भ्रमनिरास झाला. पण तरीही ब्रिटीशांचा 'नाझी व फॅसिस्ट' सत्तेविरुद्ध चालणारा संघर्ष महात्मा गांधींना क्षीण होवू द्यायचा नव्हता. अशा वेळी सरकारविरुद्ध नैतिक निषेध व्यक्त करण्याकरिता त्यांनी 'वैयक्तिक सत्याग्रहाचा' निर्णय घेतला.

आतापर्यंत वैयक्तिक सत्याग्रह हा सामूहिक सत्याग्रह नव्हता व त्याचे स्वरुपही झालेल्या देशव्यापी चळवळीप्रमाणे नव्हते. कारण सुरुवातीला महायुद्ध काळात काँग्रेस देशव्यापी आंदोलन करण्यास तयार नव्हती. वैयक्तिक सत्याग्रहाच्या या कल्पनेस अनेकांनी पाठिंबा दर्शविला तर अनेकांना ही कल्पना हास्यास्पद वाटली. कारण वैयक्तिक सत्याग्रह एका व्यक्तीने करावयाचा सत्याग्रह होता. त्यावेळी गांधीजींनी ''सत्याग्रह एक माणूस करतो की अनेक माणसे करतात हा प्रश्न क्षुल्लक आहे.'' असे वक्तव्य करुन लोकांना 'वैयक्तिक सत्याग्रहा'करिता सिद्ध केले.

## वर्धा जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह :-

वर्धा जिल्हयातील लोकांनी महात्मा गांधींनी पुकारलेल्या असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आंदोलन व नागपूरचा झेंडा सत्याग्रह यात वैशिष्टयपूर्ण कामगिरी बजावली. वैयक्तिक सत्याग्रहासाठी महात्मा गांधींनी 'वर्धा' येथील 'विनोबा भावे' की ज्यांचा उल्लेख ते

'आश्रमातील मोती' असे करायचे. त्यांचा 'पहिला सत्याग्रही' म्हणून निवड केली. ''पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे, दुसरे जवाहरलाल नेहरू व तिसरे ब्रह्मदत्त यांची निवड झाली.'' [११] त्याचबरोबर वर्धा येथूनच त्यांनी काँग्रेस कमिटीचा केंद्रीय, प्रांतीक व जिल्हा सदस्यांनाही वैयक्तिक सत्याग्रह करण्याचे आदेश दिले.

१) युद्ध विरोधी प्रचार करणे.

२) युद्धकार्यात सहभाग न घेणे.

३) सरकारने दाखविलेल्या प्रलोभनांना बळी न पडता स्वतंत्रपणे सत्याग्रह करणे.

असे वैयक्तिक सत्याग्रहाचे स्वरुप ठरविण्यात आले. ''महात्मा गांधींनी निवडलेला सत्याग्रही युद्धविरोधी प्रचार करेल व जोपर्यंत त्याला अटक होत नाही तोपर्यंत दिल्लीच्या दिशेने पायी चालत राहील. सुटका झाल्यानंतर तो त्याच पद्धतीने सत्याग्रह करेल व स्वतःला अटक करून घेईल असे ठरले.'' [१२]

## वैयक्तिक सत्याग्रहाची सिद्धता (सुरुवात) :-

वर्धेपासून ७-८ कि.मी. अंतरावरील 'पवनार' हे स्थळ सत्याग्रहाकरिता निवडण्यात आले. १७ ऑक्टोंबर १९४० रोजी विनोबांनी पवनार येथे पहिले युद्धविरोधी भाषण दिले व त्यात त्यांनी उपस्थित जनसमुदायाला आपणास सत्याग्रह का करावा लागत आहे, याविषयी संबोधित केले. पवनार येथील भाषणानंतर १८, १९ व २० ऑक्टोंबरला अनुक्रमे सुरगांव, सेलू व देवळी येथे विनोबा भावेंनी युद्धविरोधी भाषणे केली. वरील चारही ठिकाणी त्यांनी दिलेल्या भाषणांची टिपणं इन्स्पेक्टर चावजी यांनी घेतली आणि २१ ऑक्टोंबरला त्यांना अटक केली. वर्धा येथील मॅजिस्ट्रेट कुंटे यांनी सुरगांव, सेलू व देवळी येथे झालेल्या भाषणांमुळे लष्करभरती व युद्धसहाय्य मिळविण्याच्या प्रयत्नात अडथळा निर्माण झाला. असा निकाल देवून विनोबा भावे यांना तीन महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यांची रवानगी नागपूर कारागृहात करण्यात आली.

वैयक्तिक सत्याग्रहाचे 'दुसरे' सत्याग्रही 'जवाहरलाल नेहरू' यांनी 'सेवाग्राम' येथे येवून सत्याग्रहाकरिता गांधीजींचे आशीर्वाद घेतले. सेवाग्राम येथून अलाहाबादला परत येत असतांना पोलीसांनी त्यांना अटक केली व गोरखपूरच्या मॅजिस्ट्रेटने त्यांना ४ महिन्यांची शिक्षा केली. त्यानंतर मूळ दिल्ली येथील परंतु 'सेवाग्राम' आश्रमातील ब्रम्हदत्त हे 'तिसरे'

---

११. चौधरी कि.का. (संपादक) वर्धा जिल्हा गॅझेटिअर, पृ. ८४

१२. कोलारकर डॉ. श. गो. - आधुनिक विदर्भाचा इतिहास, पृ. १८३

सत्याग्रही यांनी सत्याग्रह सुरू केला. सरकारविरोधी घोषणा देत असतांनाच 'वर्धा' येथे त्यांना पोलीसांनी पकडले व त्यांना सहा महिन्यांची शिक्षा ठोठावली. आता सत्याग्रहासाठी इच्छूक असणाऱ्या कार्यकर्त्यांची नोंदणी करावी, असे आदेश दिले. त्यामुळे लोकांमध्ये उत्साह संचारला. वर्धा जिल्ह्यातील आर्वी, आष्टी, हिंगणघाट, देवळी या परिसरातील लहान लहान खेड्यांतून सत्याग्रहींची नोंदणी झाली.

वर्धा जिल्हयातील सेठ जमनालाल बजाज यांचे चिरंजीव रामकृष्ण बजाज, तसेच शरयुताई धोत्रे, दमयंतीबाई धर्माधिकारी, ताराबेन मश्रुवाला या स्त्रियांनीही सहभाग घेतला. निळकंठ घटवाई, डॉ. महोदय, माधवराव ठाकरे, मोहनलाल छाजेड (पुलगांव), विनायकराव चौधरी, लतीफभाई पानवाला, गुलाबराव गावंडे, गोपाळराव काळे, भिकूलाल चांडक, दलपतराव कोहळे, महादेवराव बंड, गोपाळरावजी वाघ, निळकंठराव इंगळे, गुलाबराव काकडे, भाऊ राव शेंडे, बापुरावजी देशमुख इत्यादिंनी 'वैयक्तिक आंदोलनात' महत्वपूर्ण भूमिका बजावली. या सत्याग्रहाचे 'सर्वात लहान' सत्याग्रही 'रामकृष्ण बजाज' हे होते. वैयक्तिक सत्याग्रहाच्या ज्या विविध चार अवस्था होत्या त्यात सर्वांमध्ये 'वर्धा जिल्हया'ने वैशिष्टयपूर्ण कामगिरी बजावली.

पहिली अवस्था :- ज्यांनी इच्छा व्यक्त केली त्यांनी केलेला सत्याग्रह .

दुसरी अवस्था :- काँग्रेस कार्यकारिणीच्या प्रतिनिधींनी केलेला सत्याग्रह.

तिसरी अवस्था:- ज्यांनी इच्छा व्यक्त केली त्यांनी केलेला सत्याग्रह. यात साडेचार ते पाच हजार सत्याग्रहींना पकडण्यात आले.

चौथी अवस्था :- युद्धविरोधी प्रचाराबरोबर 'चलो दिल्ली' यासारख्या घोषणा देण्यात येवून सत्याग्रह करण्यात आला. यावेळी अनेक लोकांना अटक करण्यात आली.

ऑक्टोंबर १९४० ते डिसेंबर १९४१ च्या अखेरपर्यंत या आंदोलनातील २५००० ते २६००० लोकांना अटक करण्यात आली. अनेकांनी युद्धविरोधी प्रचार करण्यासाठी 'भाषण बंदीचा कायदा' मोडून अटक करवून घेतली. सेवाग्राम व पवनार येथील आश्रमातील कार्यकर्त्यांनी या अभिनव स्वरुपाच्या सत्याग्रहात भाग घेतला. या सत्याग्रहाने लवकरच विशाल स्वरुप धारण केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर युद्धाचे स्वरुप निकरावर आले होते. त्यामुळे ब्रिटीशांनी स्थितीचा अंदाज घेवून सत्याग्रहींची तुरुंगातून मुक्तता केली. वैयक्तिक सत्याग्रह मागे घेण्यात आला. या सत्याग्रहात जिल्हयाने महत्वपूर्ण भूमिका बजावली असे दिसून येते.

## प्रकरण – ४
# भारत छोडो आंदोलनातील सहभाग

**पार्श्वभूमी :**

महात्मा गांधींनी विहीत केलेल्या प्रणालीनुसार सरकारविरोधी आंदोलनाच्या लाटेतील एक अत्यंत अभिनव स्वरुपाचे व तितकेच परिणामकारक आंदोलन म्हणजे 'वैयक्तिक सत्याग्रह' होय. सत्याग्रहाचा मार्ग हा स्फटिकाप्रमाणे स्वच्छ आहे. या मार्गाने गेल्यास एकदा वा दोनदा अपयश येईल पण एक ना एक दिवस विजय मिळणारच, असे गांधीजी म्हणत. १९४० मध्ये याच सिद्धांताची कास धरुन ब्रिटीश सत्तेविरुद्ध वैयक्तिक सत्याग्रह पुकारण्यात आला. याचे स्वरुप सामूहिक न ठेवता वैयक्तिक ठेवले. हा सत्याग्रह एकेका व्यक्तीने करावयाचा होता- विनोबा भावे, पं. जवाहरलाल नेहरु, ब्रह्मदत्त, रविशंकर शुक्ल, डी.पी. मिश्रा, सेठ गोविंददास, ब्रिजलाल बियाणी, सी.जे. भारुका, वर्धा येथील सेठ जमनालाल बजाज, रामकृष्ण बजाज यांनी वैयक्तिक सत्याग्रहात मोलाची भूमिका बजावली.

या सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही 'विनोबा भावे' हे होते. या सत्याग्रहात सहभागी झालेल्या सत्याग्रहींना सरकारने अटक केली. वैयक्तिक सत्याग्रहाचे अपयश, क्रिप्स योजनेने निर्माण केलेली निराशा यामुळे देशात संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्यात. अशा वेळी या नैराश्यातून भारतीय जनतेला बाहेर काढण्यासाठी देशव्यापी आंदोलनाची काल्पना महात्मा गांधींनी मांडली. १३ ते १५ जानेवारी १९४० रोजी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे अधिवेशन 'वर्धा' येथे आयोजित करण्यात आले. तेव्हापासून वर्धा येथे चळवळीचे वातावरण निर्माण झाले. या अधिवेशनापूर्वी ८ जानेवारी रोजी महाराष्ट्र या साप्ताहिकाने 'वर्धेचे सभास्थळ रणांगण बनणार' या मथळयाखाली बातमी प्रकाशित केली. यावेळी गांधीजींचा निवास 'सेवाग्राम' येथे होता. त्यांनी सेवाग्राम येथेच आपले निकटवर्ती व व्यक्तिगत अनुयायी मीरा बेन, खुर्शिद बेन नौरोजी, राम मनोहर लोहिया, राजकुमारी अमृत कौर यांच्याजवळ गांधीजींनी आपली संकल्पना मांडून त्यांना ओरिसा, बंगाल, आसाम व बिहारच्या दौऱ्यावर पाठविले व त्यांच्याकडून

प्राप्त झालेल्या देशाच्या स्थितीबद्दलच्या वस्तुनिष्ठ अहवालानुसार इंग्रजांना भारत सोडून जाण्याबद्दल निर्वाणीचा इशारा करण्याची हीच योग्य वेळ आहे याची त्यांना साक्ष पटली.

त्यांनी २७ एप्रिल ते १ मे १९४२ या काळात 'अलाहाबाद' येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत देशव्यापी आंदोलनाची आवश्यकता प्रतिपादन केली. 'छोडो भारत' ठरावाचा मसुदा घेवून ज्यावेळी मीराबेन यास अलाहाबाद येथे कार्यकारिणीच्या बैठकीत उपस्थित झाल्यात त्यावेळी काँग्रेसमधील एका गटाला ही बाब मान्य नव्हती. परंतु महात्मा गांधींच्या निर्धारापुढे सर्वांनी नमते घेतले. परंतु राजगोपालाचारी, भुलाभाई देसाई यासारख्या नेत्यांना तो मान्य नसल्यामुळे त्यांनी काँग्रेसचा राजीनामा दिला.

## काँग्रेस वर्किंग कमिटीची सभा व वर्धा ठराव :-

१९४२ च्या छोडो भारत आंदोलनात 'वर्धा जिल्ह्याची' भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. कारण या आंदोलनाची वास्तविक संकल्पना महात्मा गांधींनी 'वर्धा' येथेच मांडली. अलाहाबाद येथील काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभेनंतर ६ ते १४ जुलै या काळात आंदोलनाच्या मुद्यावर वर्धा येथील बैठकीत प्रदीर्घ चर्चा झाली. या चर्चेअंती जो निर्णय घेण्यात आला त्यास 'वर्धा ठराव' असे म्हणतात. वर्धा ठराव हा काँग्रेसच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासामध्ये एक क्रांतीकारी पाऊ ल होते. सेवाग्राम आश्रमात ८, ९ व १० ला काँग्रेस कमिटीची बैठक झाली. या बैठकीला काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना आझाद, सरोजिनी नायडू, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, गोविंद वल्लभ पंत, आसफ अली, मोहम्मद अली, खान अब्दुल गफार खान, पट्टाभिसितारामय्या, जे.बी. कृपलानी, जैरमदास दौलतराम, नरेंद्र देव व महात्मा गांधी उपस्थित होते.

या बैठकीत तत्कालीन 'भारतातील असंतोषजनक' परिस्थिती आणि महात्मा गांधींची 'देशव्यापी आंदोलनाची संकल्पना' यावर बरीच चर्चा झाली. ही चर्चा होत असतांना वर्धा- सेवाग्रामभोवती सरकारची नजर भिरभिरत होती. १४ जुलै १९४२ च्या वर्धा ठरावावर काँग्रेस कार्यकारिणीने पुनर्विचार केला. कमिटीने ७०० शब्दांचा ठराव प्रसिद्ध केला. यातील काही महत्वपूर्ण ठराव असे.

" १. काँग्रेसने दोस्त राष्ट्रांशी असे धोरण निश्तिच करावे की जे हिंदुस्थानच्या हितासाठीच नव्हे तर जगाच्या सुरक्षिततेसाठी नाझीशाही, फॅसिस्टवाद, लष्करशाही, साम्राज्यशाही यांचा अंत करण्यासाठी हिंदुस्थान स्वतंत्र करणे आवश्यक आहे.

२. हिंदुस्थानचे स्वराज्य व राजकीय हक्काच्या प्राप्तीसाठी हिंदुस्थानला आपले अनत्याचारी व अहिंसात्मक सामर्थ्य एकवटून लढावे लागेल.

३. लढ्यामुळे निर्माण झालेले प्रश्न हिंदुस्थानच्या व संयुक्त राष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचे असल्यामुळे त्यांच्या विचारार्थ अखेरचा निर्णयासाठी मुंबई येथे ७ ऑगस्ट रोजी सभा घेण्यात येईल."[१]

या वर्धा ठरावाबद्दल 'Transfar of Power in India' या ग्रंथात नमूद आहे की, "Resolution demanded that British rule in India must and immediately" यावरुन वर्धा ठरवाची महनीयता लक्षात येते.

## ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे मुंबई अधिवेशन :-

१४ जुलै १९४२ रोजी एकमताने संमत झालेल्या वर्धा ठरावानंतर वर्धा हे स्वातंत्र्य आंदोलनाच्या दृष्टीने फार मोठे केंद्र बनले. वर्धा ठराव व ७, ८ ऑगस्ट रोजी मुंबईत भरलेले अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन या दरम्यानच्या काळात वर्धेस फार मोठ्या हालचाली झाल्यात. देशातुन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस समितीचे सभासद व शेकडो कार्यकर्ते यांचा प्रवाह वर्धा येथे येवू लागला. वर्धा येथील 'सेवाग्राम आश्रम' हा तर देशस्तरावर अतिशय प्रसिद्ध झाला. यावेळी गांधीजींना येथे येणाऱ्या प्रत्येकास नियोजित आंदोलनाचे असणारे महत्व व त्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन केले. सेवाग्राम आश्रमवासीयांना त्यांनी "संकल्पीत आंदोलन प्रत्यक्षात आल्यास आश्रमाचे अन्नपाणी देखील सरकारकडून बंद होण्याची शक्यता आहे, म्हणून जे कार्यकर्ते अपुऱ्या अन्नपाण्याशिवाय येथे राहू शकतील त्यांनीच आश्रमात राहावे अन्यथा त्यांनी आपल्या घरी परतावे, विशेष म्हणजे

१. बैस डॉ. वीरेंद्र- वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. ९७

कोणीच आश्रमवासी  आश्रम सोडून गेला नाही.'' यावरुन 'सेवाग्राम आश्रम' हा 'राष्ट्रवादी विचारसरणी'चे केंद्रस्थान होता, हे लक्षात येते.

५ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, महादेवभाई देसाई यांच्यासमवेत मुंबईसाठी रवाना झाले. त्यावेळी  किशोरीलाल मश्रुवाला यांनी त्यांना 'आपण मुंबईला जाऊ नका' अशी विनवणी केली, परंतु गांधीजींनी सेवाग्राम येथे राहण्यास नकार दिला. मुंबई येथे अखिल भारतीय कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत वर्धा ठरावावर पुनर्विचार केला. व अशा प्रकारे अंतिम स्वरुपात 'भारत छोडो ठराव' तयार झाला. यासंबंधी भाष्य करतांना महात्मा गांधी म्हणाले, 'भारत छोडो' ही घोषणा शाब्दिक नसून लक्षावधी लोकांच्या आर्त हृदयातून निघालेली आहे. या भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव जनताजनार्दनासमोर ठेवण्यासाठी ७ ऑगस्ट १९४२ रोजी दुपारी २-३० वाजता कॉंग्रेसाध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई' येथे 'गोवालिया टॅंक' मैदानावर सभा झाली. याप्रसंगी कॉंग्रेसचे जवळपास वीस हजार प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते. या सभेस मार्गदर्शन करतांना ते म्हणाले यापुढे सरकारने दिलेल्या आश्वासनावर विसंबून राहणे चुकीचे आहे. हिंदुस्थानला राजकीय स्वातंत्र्य देण्यात यावे, तर महात्मा गांधींनी जनसमुदायास उद्देशून उद्गार काढलेत की, ''आम्हाला आंदोलनातून स्वातंत्र्य प्राप्त होवू शकते. स्वातंत्र्य आकाशातून पडणार नाही. जेव्हा आम्ही शहीद झालो असेल, आपल्या शक्तीचे प्रदर्शन केले असेल तेव्हा सरकारला स्वातंत्र्य प्रदान करावेच लागेल. स्वातंत्र्याकरिता प्रयत्न करीत असतांना आपल्यावर जी संकटे ओढवतील ती संकटे आणि हालअपेष्टा आपण धैर्याने आणि सहनशक्तीने सहन कराव्यात.''

याच सभेत पंडित जवाहरलाल नेहरुंनी ' भारत छोडो' चा प्रस्ताव मांडला तर सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यास दुजोरा दिला. याप्रसंगी महात्मा गांधींना 'भारत छोडो' असा नारा कोरलेले धनुष्य भेट देण्यात आले.चळवळीकरिता 'भारत छोडो' हे घोषवाक्य युसुफ मेहेरअलीद्वारे सुचित करण्यात आले.

८ ऑगस्ट १९४२ च्या सभेला संबोधित करतांना महात्मा गांधी म्हणाले ''मी तुमचा सेनानी म्हणून नव्हे तर राष्ट्राचा नम्र सेवक म्हणून तुमचे नेतृत्व स्वीकारीत आहे.

स्वातंत्र्याचा लढा आता कोणत्याही कारणाने थांबू शकत नाही. मैने काँग्रेसको बाजीपर लगा दिया है, वह करेंगी या मरेंगी.'' त्यांच्या या चैतन्यदायी भाषणामुळे जनसमुदाय अतिशय प्रेरीत झाला. याप्रसंगी ''फाईट टू दि फिनीश, दी लास्ट फाईट'' ''करेंगे या मरेंगे '' या घोषणा देण्यात आल्यात.''[२] व अशा प्रकारे भारत छोडो आंदोलनाची सिद्धता झाली.

१. सरकारी कार्यालयावर अधिकार करुन तिरंगा झेंडा फडकविणे.

२. सरकारी गणवेश व रेकॉर्ड जाळणे

३. सरकारी नोकरीचे राजीनामे देणे.

वरील प्रमाणे आंदोलनाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला.

## सरकारचे दडपशाहीचे सत्र :-

भारत छोडो आंदोलनापूर्वीच प्रांतिक सरकारने वर्ध्याभोवती गुप्त वार्ताहरांचे जाळे पसरविले होते. नागपूरच्या एका रोड ऑफिसरला वर्धा जिल्ह्यासाठी विशेष पोलीस अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. कारण वर्धा जिल्हा या आंदोलनाच्या ज्वालांनी इतका पेटलेला होता की, नागपुरच्या सेंट्रल इंटलिजन्स ऑफीसरच्या २० ऑगस्टच्या अहवालानुसार वर्धा जिल्ह्यातील वर्धा, आष्टी, देवळी, खरांगणा व आर्वी ही गावे अक्षरशः आंदोलनात पेटलेली होती'' असे नमुद आहे.

९ ऑगस्ट पासून ज्यावेळी आंदोलनाला सुरुवात झाली त्यावेळी महात्मा गांधींना सरकारने बिर्ला भवनात अटक केली. त्यांचेसोबत प्यारेलाल, डॉ. सुशीला नायर, कस्तुरबा गांधी यांनाही अटक केली. अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमिती, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती बेकायदेशीर ठरविल्यात. दूरध्वनी तारा तोडण्यात येवून संपर्कयंत्रणा उद्ध्वस्त केली. यामुळे संदेशवहनात फार मोठ्या अडचणी निर्माण झाल्यात. संपूर्ण देशभर ब्रिटीशांनी दमनचक्र सुरू केले. या आंदोलनाचा प्रचार वर्धा जिल्ह्यात फार मोठ्या प्रमाणावर झाला. यात जिल्ह्यातील लोकांनी फार मोठी कामगिरी बजावली.

---

२. दै. महाराष्ट्र ता. १३ ऑगस्ट १९४२

## भारत छोडो आंदोलन व वर्धा जिल्हा :-

भारत छोडो आंदोलनामध्ये वर्धा जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी बजावली. ९ ऑगस्ट रोजी प्रांतिक सरकारने विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमिटी, नगर, तालुका, जिल्हा स्तरावरील सर्व कमिटी बेकायदेशीर ठरविल्यात त्यामुळे सहाजिकच वर्धा, सेवाग्राम आश्रमातील सर्व संस्था बेकायदेशीर ठरविण्यात आल्या. गांधीवादी संस्थांवर सरकारची वक्रदृष्टी फिरली. आश्रमातील आश्रमवासियांप्रमाणेच अखिल भारतीय चरखा संघ, आणि अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळ अशा संस्थांच्या कार्यकर्त्यांनाही शिक्षा ठोठावण्यात आल्या. महात्मा गांधींनी सरकारने अटक केल्याच्या निषेधार्थ श्रीमन्नारायण अग्रवाल, ठाकूरदास बंग आणि महादेव मोघे यांनी वर्धा येथे सभा घेतली.

विनोबा भावे, गोपाळराव काळे, राधाकृष्ण बजाज, डॉ. महोदय, श्रीकृष्णदास जाजू, श्रीमन्नारायण अग्रवाल यांना सरकारने अटक केली. महात्मा गांधींना अटक केल्याच्या निषेधार्थ वर्धा वाणिज्य महाविद्यालयाचे 'ठाकुरदास बंग' यांनी 'प्राध्यापक' पदाचा राजीनामा देवून चळवळीत स्वतःला झोकून दिले. एकीकडे सरकारची दमननीती तर दुसरीकडे सरकारविरुद्ध निषेधसभा असे वातावरण वर्धा जिल्ह्यात निर्माण झाले.

वर्धा जिल्ह्यामध्ये राष्ट्रभक्ती व स्वातंत्र्यप्रेमाची ज्योत सतत तेवत ठेवण्याचे कार्य प्रसारमाध्यमांनी केले. किशोरलाल मश्रुवाला यांनी 'हरिजन' पत्रकाद्वारे छोडो भारत कार्यक्रमाची कल्पना लोकांपर्यत पोहचविली. याच हरिजनची मराठी आवृत्ती गोपाळराव काळे यांनी काढली. 'आकाशवाणी' नावाचे छापील पत्रक घरोघरी वितरित करण्याचे कार्य विद्यार्थी करीत. महिलाश्रम येथूनही क्रांतीला पोषक असे वृत्त प्रसिद्ध करणारे बुलेटिन निघत होते. वर्धा जिल्हा मुस्लीम लीगचे अध्यक्ष अब्दूल हमीद अंसार वकील यांच्या पत्नी जाकीया बेगम अंसारी बुलेटिनकरिता लिखाणकाम करीत.

अशा बुलेटिनवर सरकारने बंदी घातली. शिक्षा मंडळाचे श्रीकृष्ण मुद्रणालय जप्त केले. ठिकठिकाणी रेडिओ संचही जप्त करण्यात आले. ४ फेब्रुवारी१९४३ च्या 'महाराष्ट्र' मध्ये संदर्भ मिळतो की, ''वर्ध्यातील एका दरोग्याने जमनालाल बजाज यांच्या स्नुषा सावित्रीबाई

बजाज त्या जबलपूरच्या तुरुंगात कैदेत असताना वर्धा येथील त्यांच्या खोलीचे दार तोडून रेडिओ जप्त केला.'' वृत्तपत्रावर कठोर बंधने लादण्यात येत असतांना सुद्धा अहमदाबाद व मुंबईहून पाठविलेली प्रचारपत्रके वर्ध्यास नियमितपणे येत. त्याची वितरण व्यवस्था दत्तात्रय दास्ताने करीत असत.

**जंगलू ढोरे शहीद :-**

दि. १० ऑगस्ट १९४२ रोजी वर्धा जिल्हा म्युनिसिपल कमेटीचे अध्यक्ष शिवराज चुडवाल यांचे अध्यक्षतेखाली निषेधसभा गांधी चौकात संपन्न झाली. तर दि. ११ ऑगस्ट रोजी याच स्थळी वर्धा वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सभा झाली. या सभेत दिनदयालजी चुडीवाले यांनी मुंबईवरुन महात्मा गांधींनी जो संदेश दिला, त्या पत्रकाचे वाचन केले. याप्रसंगी मॅजिस्ट्रेट पेंढारकर, जिल्हाधिकारी मोने, सर्कल इन्स्पेक्टर शालीग्राम सिंह, डी.एस.पी. भारुचा यांनी हरकत घेतली. परंतु दिनदयाल चुडीवाले यांनी मी संदेश पत्रकाचे वाचन करणार हे स्पष्टपणे सांगितले. त्यावेळी ''सर्कल इन्स्पेक्टर शालीग्रामसिंह यांनी गोळीबार केला. त्यावेळी झालेल्या गोळीबारात जंगलू धोंडबाजी ढोरे' यास गोळी लागली. तो १९४२ च्या आंदोलनातील वर्धा जिल्ह्यातील पहिला हुतात्मा ठरला.''[३] जंगलुच्या मृत्यूमुळे जनता संतप्त झाली. सरकारने आरंभलेल्या पाशवी बळाला त्याच पद्धतीने प्रतिकार करावा, या उद्देशाने लोकांनी आंदोलनाची सिद्धता केली. पण सरकारने डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स आणि इमर्जन्सी व्हिपींग ॲक्ट अंमलात आणून शिवराज चुडीवाले, दीनदयाल चुडीवाले, गावंडे वकील, राधाकृष्ण, तेजराम, गहलोद, दुर्गे वकील, श्रीधर थत्ते, देवचंद रोडे यांना अटक केली.

जंगलू ढोरे यांचे प्रेत आमच्या स्वाधीन करा अशी विनंती मॅजिस्ट्रेट पेंढारकर यांचेकडे कली असता त्यांनी वारंवार नकार दर्शविला. पण बऱ्याच प्रयत्नानंतर जंगलूचे प्रेत जनतेला सोपविले. त्यांच्या प्रेतयात्रेत हजारोंच्या संख्येत जनसमुदाय उपस्थित होता. या आंदोलनाच्या पार्श्वभूमी इतकी तेजस्वी व स्वयंस्फूर्त होती की, पोटच्या मुलाला गोळी लागून

---

३. चौधरी किं.का. (संपादक) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, वर्धा जिल्हा पृ. ८९

मृत्यू आला तरी जंगलू ढोरेची आई जनसमुदायाला उद्देशून म्हणाली, ''माझा मुलगा मरण पावला. काहीही हरकत नाही. तो देशासाठी शहीद झाला. अशा वैभवाची प्रेतयात्रा माझ्या मुलासाठी भविष्यात लाभली नसती.'' [४] अशा माता ज्या देशात असतील त्या देशाचे वर्णन काय करावे ? त्या वीर मातेचे वरील उद्‌गार अतिशय भावोत्कट आहेत.

**आंदोलनातील विद्यार्थ्यांचा सहभाग :-**

नागपूर येथे स्वातंत्र्य आंदोलकांनी केलेल्या बंडाच्या बातम्या वर्धा येथे पोहचल्या. त्याचे पडसाद तरुण विद्यार्थ्यांवर पडलेत. अशातच ११ ऑगस्ट १९४२ मध्ये ब्रिजलाल बियाणी यांच्या मातृभूमी अंकात महात्मा गांधींचा संदेश प्रसिद्ध झाला. ''विद्यमान लढा एका विशिष्ट पक्षाचा किंवा धर्मियांकरिता पुरता मर्यादित नसून अखिल भारतीयांचा आहे.'' हेच सूत्र पकडून बियाणींनी संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवितांना आवाहन केले की, ''या अंतिम लढ्यात त्यांनी व्यक्तिगत भवितव्याचा विचार न करता आत्मसमर्पणाच्या भावनेने उडी घ्यावी. कारण राष्ट्राच्या जीवनातच व्यक्तीचे जीवन समाविष्ट असते. आता विचार करीत बसण्यास वेळ नाही. विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन आंदोलनाच्या यज्ञात आपले जीवित साफल्य शोधावे.'' [५]

बियाणींनी प्रसुत केलेला 'आत्मसमर्पण व देशभक्तीचा संदेश' ज्यावेळी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचला त्यावेळी कशाचीही तमा न बाळगता तरुणांनी तीव्र आंदोलन उभारले. भूमीगत राहून ठिकठिकाणी आंदोलनाचा प्रचार व प्रसार विद्यार्थ्यांनी केला. किशोरीलाल मश्रुवाला यांनी 'हरिजन' या पत्रकाद्वारे 'छोडो भारत' कार्यक्रमाची कल्पना स्पष्ट केली. ''वर्धा येथील शाळा, महाविद्यालये, वसतीगृहे सरकारने आपल्या ताब्यात घेतली. विद्यार्थ्यांनी उभारलेले आंदोलन चिरडून टाकण्याकरिता नवभारत विद्यालय ६ आठवडे बंद होते तर कॉमर्स कॉलेज ४-५ महिने बंद राहिले. कॉलेजमधील २०० पैकी ५० विद्यार्थ्यांना व १२ प्राध्यापकांपैकी प्राचार्यासह ६ प्राध्यापकांना तुरुंगवास घडला.'' [६] परंतु या घटनेचा राष्ट्रीय वृत्तीने भारावलेल्या

---

४. बैस डॉ. वीरेंद्र २००५ - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. १०५

५ कोलारकर, डॉ. शं.गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. २३५

६. कित्ता , पृ. २३५

विद्यार्थ्यांवर यत्किंचितही परिणाम झाला नाही. संपूर्ण ऑगस्ट महिन्यात विद्यार्थी सरकारविरुद्ध प्राणपणाने लढले. या आंदोलनाची एक समर्थ बाजू युवा विद्यार्थी पेलत आहे. म्हणून सरकारने विद्यार्थ्यांना आंदोजनातून वगळण्याकरिता कडक उपाययोजना केल्यात. जे विद्यार्थी वर्गात नियमितपणे उपस्थित राहणार नाहीत, त्यांची शिष्यवृत्ती व इतर सवलती रद्द करण्यात येईल अशी घोषणा केली परंतु विद्यार्थ्यांचा निग्रह कायम होता. विद्यार्थ्यांना देण्यात येत असणारी शिष्यवृत्ती व इतर सवलती रद्दबादल करण्याच्या घोषणेला व सरकारच्या शिक्षात्मक उपाययोजनांना विद्यार्थ्यांनी भीक न घालता नेत्रदिपक कामगिरी बजावली. हे या चळवळीचे यशस्वी द्योतक होय. ९ सप्टेंबर १९४२ ला छोडो भारतचा मासिक वर्धापन दिन मिरवणुका व हरताळ स्वरुपात संपन्न झाला. त्यात विद्यार्थी आघाडीवर होते. त्यांनी या आंदोलनात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## वर्धा जिल्ह्यातील भारत छोडो आंदोलन व महिलांची कामगिरी :-

वर्धा जिल्ह्यातील भारत छोडो आंदोलनात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांनी स्वतःस झोकून दिले. व नेत्रदिपक कामगिरी बजावली. सरकारने पुरुष सत्याग्रहींची धरपकड केली अशा वेळी महिलांनी आंदोलनात निर्माण झालेली पोकळी महात्मा गांधींनी केलेल्या आवाहनानुसार भरून काढली. महिलाश्रमातील महिलांनी वय, समाज, लिंग आणि जुने रितीरीवाज याबद्दल कोणताही विचार न करता स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला झोकून दिले. वर्धा शहरातून रोज सकाळी प्रभातफेरी काढून जनजागृती करण्याचे कार्य स्त्रियांनी केले व चळवळीचे वातावरण सतत तेवत ठेवले. 'नही रखनी यह जालीम सरकार नही रखनी', 'वंदे मातरम्' या घोषणा प्रभातफेरीच्या माध्यमातून महिला देत.

१४४ कलम शहरात लागू असतांना कशाचीही तमा न बाळगता लोकांना झोपेतून उठवून चळवळीचे लोण महिलांनी लोकांपर्यंत पोहचविले. त्यामुळे महिलाश्रमाकडे सरकारची वक्रदृष्टी वळली. महिलाश्रमातील विद्यार्थिनी व त्यांच्या शिक्षिका तसेच आश्रमातील स्त्रिया प्रभातफेरी मधून 'अंग्रेज भारत छोडो', जुलमी सल्तनत नही रहेगी', 'आझादी के लिए

शहीद होंगे' यासारख्या घोषवाक्याद्वारे स्वातंत्र्यआंदोलनाचा प्रसार व प्रचारकार्य करीत . त्यामुळे सरकारने महिलाश्रम ताब्यात घेतला. यावेळी या महिला बजाजवाडीत स्थलांतरित झाल्या. ''शहरामध्ये १४४ कलम लागू असतांना लोकांना झोपेतून जागे करण्याचे व लोकांपर्यंत स्वातंत्र्य आंदोलनाचा विचार पोहचविण्याचे कार्य या महिला करीत. हे पाहून मॅजिस्ट्रेट पेंढारकर यांनी पकडवॉरंट काढून अनेक महिलांना अटक केली व त्यांची रवानगी नागपूर, जबलपूर येथील तुरुंगात केली.''[७] यामध्ये वर्धा शहरातीलच नव्हे तर परिसरातील, खेड्यातील महिला समाविष्ट होत्या. महिलाश्रमातील महिला या सतत स्त्रियांमध्ये प्रेरणा व स्फूर्ती निर्माण करीत. या काळात अनेक महिलांनी भूमिगत राहून सरकारविरोधी कार्य केले. ९ सप्टेंबर १९४२ ला ज्यावेळी छोडो भारतचा 'मासिक वर्धापन दिन' झाला त्यावेळी मिरवणुकांद्वारे महिलांनी फार मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली.

महिलांबरोबरच महात्मा गांधींनी स्थापन केलेल्या सत्याग्रह आश्रमही स्वातंत्र्यआंदोलकांची कर्मभूमी होती. या आश्रमात किशोरीलाल मश्रूवाला यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यातील अनेक लोक या शिबीरात दाखल झाले होते. या सेवाग्राम आश्रमातील सत्याग्रही शिबीरांमध्ये महिलाही होत्या. सेवाग्राम आश्रमातील सत्याग्रहींचा पहिला जत्था वर्धा येथे सभा, मोर्चा काढण्यावर प्रतिबंध असतांना गेला. या जत्थ्यातील शकरीबहन, कंचनबहन, कांताबहन, जोहराबहन, मनु गांधी यांना सरकारने अटक केली. तर बापुराव देशमुख, महादेवराव कोल्हे, व्यंकटराव कार्डेकर, चंद्रभान घोडे, गोपाळराव शिनगारे, दादा मुरकुटे, व्यंकटराव गोडे, सखाराम साबळे या तरुण कार्यकर्त्यांना अटक केली.

## नई तालीम संघ व भारत छोडो आंदोलन :-

आर्यनायकम व आशादेवी आर्यनायकम हे दोघेही गांधी तत्वज्ञानाने प्रेरित झाले होते. आर्यनायकम हे नई तालीमचे प्रमुख कार्यवाह होते. नई तालीमचे विद्यार्थी आजुबाजूच्या खेड्यात जाऊन प्रभातफेरीच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती घडवून आणीत. नई तालीम संघाचे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'क्रांतीगीत' शिकवून सतत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती जागृत

---

७. बैस डॉ. वीरेंद्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. १०९

करण्याचे कार्य केले. नई तालीमचे विद्यार्थी आत्माराम ताकसांडे, गोपालसिंह बैस व शंकरराव ढोले यांची डॉ. वीरेन्द्र बैस यांनी घेतलेली मुलीखतीतून संदर्भ मिळतो की, ''आशादेवी आर्यनायकम व विद्यार्थी वर्धा शहरात फिरत व वंदेमातरम, भारत माता की जय, महात्मा गांधी की जय, 'अंग्रेज चले जाव' अशा घोषणा देऊन इंग्रज अधिकाऱ्याचे लक्ष स्वतःकडे केंद्रीत करीत. पोलीसांनी आशादेवीला अटक करुन, विद्यार्थ्यांना तुरुंगाचा, बंदुकीचा धाक दाखवून हाकलून द्यायचे किंवा अटक करुन जंगलात अंधारात एखाद्या पहाडावर सोडून देत असत.

सेवाग्राम आश्रमातील आश्रमवासीयांप्रमाणेच पवनार, नालवाडी आश्रमातील आश्रमवासीयांनीही महत्वाची भूमिका बजावली. नालवाडी आश्रमाचे व्यवस्थापक राधाकृष्ण बजाज यांचेवर सरकारचा डोळा होता. परंतु पुरावा न सापडल्याने या आश्रमातील अन्य लोकांवर खटला उभारला. त्यात मनोहर दीवाण, भाऊ पानसे, गोपाळराव वाळुंजकर यांचा समावेश होता. परंतु गोपाळराव वाळुंजकर भूमीगत झाले. सरकारने नालवाडी आश्रम बेकायदेशीर ठरवून १४ आश्रमवासीयांवर खटले उभारलेत. स्पेशल क्रिमिनल कोर्टस ऑर्डिनन्सखाली विशेष न्यायाधीशांपुढे हा खटला चालला. पुरेसे पुरावे नसल्याने कोर्टाने बरेचदा सरकारला खटला मागे घेण्यास सुचविले. परंतु प्रत्येक वेळी सरकारने खोटे पुरावे सादर करुन कोर्टाला खटल्याचा निकाल राखून ठेवण्यास बाध्य केले.

पुढे ''इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्टच्या कलम १६ खाली हे दोन्ही आश्रम पोलीसांनी हस्तगत केले. पुढे खोटे साक्षीदार उपस्थित करून तसेच हा खटला प्रांतिक शासनाने साध्या कोर्टात उपस्थित केला. या कोर्टाने तीन आरोपींना व्यक्तिगत अपराधासाठी शिक्षा देवून उर्वरित आरोपींना निर्दोष सोडले. त्या तीन आरोपींमध्ये सदाशिव शंकर गद्रे, भिमराव देशमुख, दौलत विठोबा यांचा समावेश होता. त्यांनी सरकारवर दोषारोप कला. की, सरकार अकारण त्रास देते तेव्हा ज्यांना जी.आर. वर्मा यांच्या कोर्टात उभे केले व ज्यांना क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट ९/१९३२ आणि ९८(१) नुसार भारतीय संविधान कायद्याअंतर्गत गुन्हा समजून त्यांना शिक्षा केली.'' [८]

८. क्रिमिनल केस रजिस्टर, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

**पवनार उत्पात खटला (१९४२) :-**

१९४२ चे छोडो भारत आंदोलन ऐन भरात येवून जसजसे तीव्र होत गेले तशी सरकारला धास्ती वाटू लागली, आणि म्हणून सरकारने ज्याप्रमाणे 'नालवाडी' आश्रमवासीयांवर खटले उभारलेत त्याचप्रमाणे 'पवनार' आश्रमवासीयांना बदनाम करण्याच्या हेतूने हालचाली सुरू केल्यात. ''दिल्ली येथून व्हॉईसरॉयच्या कार्यालयातून प्रांतीय शासनाला पत्र आले. त्यात असा उल्लेख होता की, महात्मा गांधी व त्यांचे सहकारी स्वतःला अहिंसक समजतात परंतु त्यांच्या आश्रमातील लोक घातपातीचा प्रकार करुन हिंसा करतात. महात्मा गांधी हे अहिंसेचे प्रणेते नसून हिंसेचे आहे हे जनतेला दाखविण्यासाठी सरकारने पवनार उत्पात खटला तयार केला त्यावेळी पवनार आश्रम वायियांनी हा खटला लढण्याचे ठरविले. चिरंजीलाल बडजाते यांनी खटल्याच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी स्वीकारली..''[९]

नालवाडी व पवनार उत्पात खटल्यात शासनाने घातपात करणारी १४ व्यक्तींची एक टोळी तयार केली. राधाकृष्ण बजाज (वर्धा) वल्लभस्वामी, ईश्वरसिंह (बरबडी) ढेव्या जानुजी भोई (पवनार), हंसराज भाटीया (बरबडी), मारोती वाघमारे (पवनार), माराती सिताराम जोगे (पवनार), नामदेव धनकर, गोपाळ सोमाजी नंदघरे (वर्धा), शंकर सातपुते (पवनार), महादेव भोसले (पवनार), अण्णा भाऊजी पिसोडे (सेवाग्राम), विठोबा बांगडे (पवनार), भाऊ पानसे अशा १४ व्यक्तींना अटक करण्यात आली. यावेळी सरकार तर्फे ॲड ठाकूर यांनी तर १४ लोकांच्या मदतीकरिता मुंबई येथून ॲड मुन्शी, नागपूर येथील ॲड. पी.एम.नायडू, व वर्धा येथील ॲड काकडे, ॲड. मनोहर पंत देशपांडे, ॲड. परांजपे, ॲड. चरडे, ॲड पांडे, ॲड दुर्गे इ. अनेक वकीलांनी कार्य पाहिले. सरकारला आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी पुरावे मिळू शकले नाहीत. म्हणून कोर्टाने सरकारला खटला मागे घेण्यास अनेकदा बजावले. परंतु तरीही सरकारने खटला मागे न घेता नवीन पुरावे आणण्याचा खटाटोप सुरुच ठेवला. शंकर सातपुरे, ढेब्याभोई यांना सरकारने बेदम मारहाण करून माफीचा साक्षीदार बनविले. परंतु त्यांनी साक्ष घेतली त्यावेळी या दोघांनीही सरकारी पोलीसांविरोधी साक्ष दिली.

९. बैस डॉ. वीरेंद्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. १६७

त्यामुळे पवनार उत्पात खटल्यातून सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. परंतु कोर्टातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा आरोपिंना सरकारने अटक करण्याचा निर्णय घेतला. यावेळी अनेकांनी भूमीगत राहून कार्य केले.

सरकारने प्रयत्नांची शर्थ करून प्रसंगी खोटे पुरावे कोर्टामध्ये सादर करून पवनार खटला चालविला. महात्मा गांधी अहिंसावादी नसून हिंसावादी आहेत हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला, परंतु शेवटी शासनाला अपयश आले. हा खटला चालविण्याकरिता बच्छराज फॅक्टरीतून व जमनालाल बजाज यांचे पेटीतून ३० ते ४० हजार रुपये खर्च झाला.

**आष्टीचा स्वातंत्र्यसंग्राम :-**

१९४२ च्या आंदोलनातील एक 'तेजस्वी क्रांतीपर्व' म्हणजे आष्टीचा स्वातंत्र्यसंग्राम. गोपाळराव वाघ व लक्ष्मणराव मुकदम हे आष्टी येथील दोन तरुण मुंबई अधिवेशनाला उपस्थित होते. या अधिवेशनात दिलेला 'करेंगे वा मरेंगे' हा संदेश समस्त देशवासीयांना दिला. गोपाळराव वाघ मुंबई अधिवेशनातून आष्टीला येण्यापूर्वीच तुकडोजी महाराजांनी आष्टीच्या लोकांना मार्गदर्शन केले. आपल्या चैतन्यपूर्ण भजनांद्वारे महाराजांनी आष्टीतील लोकांची मने क्रांतिकरिता जागृत केली. ८ ऑगस्ट १९४२ ला त्यांनी आष्टीच्या कार्यकर्त्यांशी गुप्त बैठक व मसलत केली. त्यांनी त्यावेळी गायीलेली क्रांतीगीत म्हणजे भावी क्रांतीची दिशा व पाशवी इंग्रजी सत्तेला दिलेला अंतिम इशाराच होता. हे गीतच आष्टीच्या व परिसरात झालेल्या आंदोलनाचे ब्रीद ठरले ते म्हणाले ,

''अब काहे को धूम मचाते हो
दुखवाकर भारत सारे
आते है नाथ हमारे
अब तक पाप भरा न पशु तो
करलो मौज भरारे ...
झाड झडूले शस्त्र बनेंगे
भक्त बनेगी सेना

पत्थर सारे बाम्ब बनेंगे

नाव लगेगी किनारे ''

या भजनाद्वारे इंग्रजी सत्तेला त्यांनी दिलेला खणखणीत इशारा क्रांतीकार्याकरिता निश्चितच प्रेरक ठरला. महाराजांच्या प्रेरणेतून आष्टी येथील तरुण शामराव मुकदम यांनी जे आरती मंडळ स्थापन केले होते. या आरती मंडळाच्या माध्यमातून क्रांतीसाठी सज्ज झालेल्या हजारो निष्ठवंत तरुणांनी स्वातंत्र्य आंदोलनात फार मोठी भूमिका बजावली. ग्रामस्वच्छता, गोरक्षण, ग्रामोद्योग, साक्षरता प्रचार, व्यायाम हे कार्य आरती मंडळाद्वारा होत असे. हे जरी असले तरी या आरती मंडळाच्या माध्यमातून श्यामराव मुकद्दम, नागोराव मोरे, लक्ष्मणराव वाघ, रामचंद्र कोडापे, मोतीराम होले, कृष्णा नंदनवार, रामचंद्र जवळे या तरुणांनी तुकडोजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचा क्रातिकार्याकरिता योग्य तो वापर करुन घेतला.

आरती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गुप्त संदेश यंत्रणेद्वारे गांधीजींनी दिलेला संदेश लोकांपर्यंत वेळोवेळी पोहचविण्याचे कार्य केले. गोपाळराव वाघ यांनी मुंबईवरुन आणलेले पत्रक यावर १४ ऑगस्ट रोजी आष्टी येथे कार्यकर्त्यांनी विचार विनिमय केला. वामनराव देशमुख, मोतीराम होले, पांडुरंगजी सव्वालाखे, लक्ष्मणराव वाघ, मारोतराव होले, मल्लिकार्जुन आप्पा गंजीवाले, डॉ. गोविंदराव मालपे, नामदेव कासुलकर, कृष्णराव अगस्ती या आष्टी परिसरातील निवडक कार्यकर्त्यांची बैठक भरली व भावी क्रांतीची दिशा ठरविण्यात आली. आष्टीच्या पोलीस ठाण्यावर १७ ऑगस्टला सत्याग्रह करण्याचे ठरले. पोलीस ठाण्यावर राष्ट्रीय ध्वज फडकविणे, कागदपत्रे नष्ट करणे इ. कार्यक्रम निश्चित करण्यात आले. ह्याकरिता गावात तशी प्रचारपत्रके वाटण्यात आली. आष्टी, अंतोरा, सिरसोली, वडाळा, किन्हाळा, परसोडा, सत्तारपूर, नरसापूर, खंबीत, किन्हाळा, वाघोली यंथे गावपातळीवरील सरकारी दप्तरांचा ताबा घेवून धमकीचं शस्त्र वापरुन सत्याग्रहींनी सरकारी दप्तरांची जाळपोळ केली, तसेच शाळा, पोस्ट ऑफीसवर तिरंगा झेंडाही फडकाविण्याचे काम या कार्यकर्त्यांनी केले. किन्हाळा येथून रंगराव पाटील, पंजाबराव मानकर यांच्या नेतृत्वाखाली ५० सत्याग्रहींचे पथक परसोडा येथून श्यामराव

पाचघरे, गंगाराम मोरे, जानराव तिरवे, नामदेव खारकर, मोतीराम लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली 'आरती मंडळाची वानरसेना, वडाळा येथून रामभाऊ लोहे यांच्या नेतृत्वाखाली ४२ सत्याग्रहींचे पथक की, ज्या पथकात आतापर्यंत वेगवेगळया सत्याग्रहात शिक्षा झालेल्यांची निवड करण्यात आली होती. वडाळयाहून निघालेल्या शूर पथकामध्ये सत्तरपूरचे व इतर गावाचे सत्याग्रही येथून मिळाले. वेगवेगळया गावावरुन सत्याग्रही जत्थे येत आहे याची माहिती आष्टी स्थित कार्यकर्त्यांना देण्यात आली. रामभाऊ लोहे यांच्या नेतृत्वाखाली १७ ऑगस्ट रोजी ठरलेला सत्याग्रह १६ ऑगस्टलाच करायचा निर्णय होवून सत्याग्रही कदम से 'कदम मिलाते चलो' हे क्रांती गीत गात 'गांधी चौकात' जमले. याच ठिकाणी १७ मार्च १९२१ रोजी गांधीजींनी प्रेरणादायी भाषण केले होते. त्याची स्मृती म्हणून हा सत्याग्रह गांधी चौकातून करावयाचे ठरले.

**आष्टी : क्रांतीलढा :-**

१६ ऑगस्ट १९४२ च्या सकाळी ३००० (तीन हजार)सत्याग्रही गांधी चौकातून पोलीस ठाण्याकडे मिरवणुकीने निघाले. याची भनक ज्यावेळी आष्टी पोलीस मुख्यायातील इन्स्पेक्टर रामनाथ मिश्रा याला लागली. क्रांतीवीरांचे जत्था हातात झेंडे घेऊन 'इन्कलाब जिंदाबाद', 'महात्मा गांधी की जय', 'भारत माता की जय' 'तुकडोजी महाराज की जय' अशा घोषणा व 'नही चलेगी, नही चलेगी, जालीम सरकार नही चलेगी' अशा गर्जना करीत ज्यावेळी पोलीस स्टेशनच्या मुख्यद्वाराजवळ येवून धडकला. त्यावेळी इन्स्पेक्टर रामनाथ मिश्रा व सत्याग्रहींचे पुढारी लोहे, सव्वालाखे व होले यांच्यातील संवाद -

रामनाथ मिश्रा : ''अपने साथ ये सेना लाये क्या ?

सव्वालाखे : जी हाँ ये सेना ही तो है। लेकिन हमारे पास कोई हत्यार नही है। हम हमारी देशकी इमारतपर अपनेही देश का झेंडा लगाना चाहते है। मेहेरबानी करके आप झंडा लगाने दो।

रामनाथ मिश्रा : अरे बाबा, हम भी अपने देश से प्यार करते है। लेकिन पेट के लिए

नोकरी करते है। हमारे हाथ बंधे हुए है। हम भी तो महात्माजी को चाहते है।

होले : तो फिर हमारे साथ महात्मा गांधी की जय बोलो'' [१०]

या संवादावरुन सत्याग्रहींच्या क्रांतीकार्याची दिशा स्पष्ट होते. सत्याग्रहींनी निर्धाराने पोलीस इन्स्पेक्टरला आपला उद्देश सांगून खादी पोषाख, व टोपी परिधान करावा असा आग्रह धरला. प्रसंगावधान पाहून रामनाथ मिश्राने ती सूचना मान्य केली परंतु सरकारी कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत नष्ट होवू देणार नाही. पोलीस ठाण्याच्या इमारतीवर झेंडा फडकवू देणार नाही, असा निर्धार सत्याग्रहींसमोर व्यक्त केला. अशावेळी शांत असणारा जमाव प्रक्षुब्ध झाला. सव्वालाखे, होले, मालपे यांनी जमावास शांत करून इन्स्पेक्टरला घेराव घातला. तोपर्यंत जत्थ्यातील काही लोकांनी पोलीस ठाण्याच्या मागच्या बाजूने दारे खिडक्या तोडून इमारतीच्या आत प्रवेश केला व रेकॉर्ड रुममध्ये प्रवेश करून सरकारी दस्तऐवजांची फाडाफाउ व फेकाफेक केली. रामकृष्ण जोमदे, श्रावण कोलनकर, डॉ. गोविंद मालपे या सत्याग्रहींचा यात समावेश होता. सत्याग्रही नियंत्रणाबाहेर जात आहे हे लक्षात येताच इन्स्पेक्टरने हेडकॉन्स्टेबल लालसिंग, कॉन्स्टेबल संमद व विनायक यांना सत्याग्रहींवर गोळीबार करण्याचा आदेश दिला. पोलीस कॉन्स्टेबल संमद गोळीबार करण्याच्या पावित्र्यातच होता. त्याने डॉ. गोविंदराव मालपे, रशीदखाँ, पंची गोंड, झापुजी पोटे, केशवराव ढोंगे, उदेभान कुबडे यांना संमदखॉने टिपले ते खाली कोसळले. त्यापैकी काहींना डॉ. कामत यांच्या दवाखान्यात आणले. रामभाऊ लोहे यांच्यावरही संमदने गोळी झाडली. यावेळी गोळीबारात अनेक लोक गंभीर जखमी झाले. ''यावेळी गोळयांचा वर्षाव होवून सात स्वातंत्र्यवीर हुतात्मा झाले.'' [११] याचवेळी परिस्थितीला नियंत्रणात आणण्याकरिता आर्वी येथून मिश्राने जास्तीची पोलीस कुमक बोलविली. अशाप्रमारे अहिंसेच्या मार्गाने सुरू करण्यात आलेले आंदोलन रक्तरंजित झाले. छोडो भारतची

---

१०. गुप्ता, रमेश - आष्टीचा स्वातंत्र्यसंग्राम- बंडखोर खेड्याची गोष्ट, पृ. ७७

११. कोलारकर, डॉ. शं. गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. २२६.

मूळ संकल्पना हिंसात्मक नव्हती तथापि सरकारने हिंसाचारी अत्याचार केल्यामुळे हिंसक वळण लागले. आष्टीची मुलींचे शाळा व अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल बरेच दिवस बंद होते.

क्रांतीयुद्धाचे दुसरे पर्वात खडकी, सिरसोली, परसोडा, पिंपळा, नांदोरा, टेकोडा, भारसवाडा, एरंडवाडी येथील सत्याग्रहींनी भूमि बजावली. या सत्याग्रहींमध्ये स्त्रियांचाही समावेश होता. ज्यावेळी हे सर्व सत्याग्रही पोलीस ठाण्यावर हिंसेचा बदला हिंसेने घेण्याच्या तयारीने पोलीस ठाण्यावर चालून गेला त्यावेळी पोलीस इन्स्पेक्टरने गोळीबार करून एका तरुणाला ठार केले म्हणून जमाव अधिकच प्रक्षुब्ध झाला. ''सरकारी गुप्त अहवालानुसार असे दिसते की, आंदोलकांनी पोलीसांना खादी कपडे घालून मिरवणुकीत तिरंगी झेंडा हातात घ्यावयाला भाग पाडले. पोलीस ठाण्यावर तिरंगा फडकावला. ठाणे जाळून खाक केले, शासकीय विश्रामगृह, शाळा आणि महसूल कार्यालय तसेच डाकघर लुटून जाळून टाकण्यात आले. एकूण सात पोलीसांपैकी पाच हवालदारांची व इन्स्पेक्टरची हत्या करण्यात आली.'' [१२] मात्र समकालीन स्वातंत्र्यआंदोलकांच्या आठवणीनुसार कुणालाही जिवंत जाळण्यात आले नव्हते.

आष्टी प्रकरणाबाबत सरकारने आंदोलकांवर खटला उभारला. आष्टीच्या घटनेने सरकारचा क्रोध अनावर झाला. आष्टीमध्ये धरपकडीचे सत्र सुरु झाले. गावातील पुरुषांना अटक करण्यात आली. ''आष्टी व १० मैलाच्या परिसरातील गावांवर एकूण ५०००० रुपयांचा सामुहिक दंड बसविण्यात आला. दंडाची रक्कम वसुल करतांना घरातील म्हातारे व स्त्रियांवर अत्याचार करण्यात आले.'' [१३]

खेदाची बाब ही की पोलीसांनी असहाय्य स्त्रियांवर पाशवी बलात्कार केले त्यातून गर्भवती स्त्रियाही सुटल्या नाहीत. या सरकारने केलेल्या कृत्याच्या निषेधार्थ प्रा. भंसाळी यांनी उपोषण केले तर वर्ध्याच्या दोन वकीलांनी आपल्या पदाचे राजीनामे दिलेत. प्रा. भंसाळी यांनी केलेले ६२ दिवसांचे उपोषण हे वर्धा चंद्रपूरच्या स्वातंत्र्य आंदोलनातील महत्वाचे पर्व होय.

---

१२. चौधरी किं.का. (संपादक) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, वर्धा जिल्हा पृ. ९३

१३. कित्ता पृ. ९४

आष्टीचा स्वातंत्र्यलढा जरी ब्रिटीश सरकारने चिरडून टाकला तरी या लढ्याने लोकांमध्ये राष्ट्रजागृतीची ज्योत ज्वलंत ठेवली. वर्धा जिल्ह्याचे वैशिष्ट् म्हणजे स्वातंत्र्य चळवळीत वर्धा जिल्ह्यातील स्त्रियांनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. ''आष्टी प्रकरणात दहा स्वातंत्र्यसैनिकांना फाशीची शिक्षा दिली. त्यावेळी फाशी निवारक समितीच्या प्रयत्नांनी १५ एप्रिल १९४४ रोजी ४ सेनानींची फाशीची शिक्षा रद्द करण्यात आली. तर सहाशे सेवाभावी संस्था व दोन लाख लोकांच्या दयेचा अर्ज म्हणजेच लोकाग्रहामुळे १९ जानेवारी १९४५ रोजी गव्हर्नरने चौघांची फाशीची शिक्षा रद्द केली. तर उर्वरीत दोघांसाठी श्रीमती अनुसयाबाई काळे, डॉ. खरे, डॉ. राजेंद्रप्रसाद व गांधीजींनी केलेल्या प्रयत्नांना यश येऊन १६ ऑगस्ट १९४५ रोजी व्हॉईसरॉयने फाशीची शिक्षा रद्द केली.'' [१४]

## देवळीचा स्वातंत्र्यलढा :-

आष्टीप्रमाणेच देवळी येथेही आंदोलनाच्या ज्वाला पसरल्यात. महात्मा गांधींच्या तत्वज्ञानाने देवळीतील भाऊसाहेब शेंडे, महादेवराव ठाकरे, शंकरराव सहदेवे, मोतीलाल कपूर, गोपाळराव काळे हे प्रेरीत झाले होते. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभा ज्यावेळी वर्धा, सेवाग्राम येथे होत त्या सभांना या व्यक्तींची नेहमीच उपस्थिती राहत असे. त्यामुळे ते भारत छोडो चळवळकडे आकर्षित झालेत. मुंबई येथील कॉंग्रेस अधिवेशनाला देवळीचे गोपाळराव काळे (प्रांतीय कॉंग्रेस समितीचे सदस्य) उपस्थित होते. मुंबईहून परत आल्यानंतर त्यांनी देवळी येथे बाजार चौकात सभा घेतली व लोकांना 'भारत छोडो' चळवळीत सामील होण्याचे आवाहन केले. लोकांनी या आवाहनाला भरघोस प्रतिसाद दिला. देवळीतील तरुणांनी छोडो भारतच्या प्रचारार्थ गावोगावी जाऊन छोडा भारतचा संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहचविला.

१३ ऑगस्ट १९४२ पासून देवळीचे वातावरण तापू लागले. त्यामुळे सरकारची वक्रदृष्टी आता देवळीकडे वळली. १३ ऑगस्ट १९४२ ला भाऊ साहेब शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली भोसलेवाड्यात गुप्त सभा झाली. या सभेला अनेक कॉंग्रेस पुढारी उपस्थित

१४. कोलारकर, डॉ. शं. गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. २४३.

होते. या गुप्त सभेची वार्ता ज्यावेळी पोलीसांना कळली त्यावेळी पोलीसांनी सरकारी आदेशानुसार भाऊसाहेब शेंडे यांना अटक केली. त्यामुळे जनसमुदाय अधिक प्रक्षुब्ध झाला. व देवळीच्या स्वातंत्र्य लढ्याला सुरुवात झाली. देवळी नगर परिषदेने आपले स्वातंत्र्य याचवेळी घोषीत केले. म्हणून शासनाने देवळी नगर परिषद बरखास्त केली.

**पोलीस ठाणे भस्मसात :-**

सरकारने भाऊसाहेब शेंडे यांना अटक केली. त्याच्या निषेधार्थ देवळीतील स्वातंत्र्य आंदोलकांनी 'भाऊसाहेब को छोड दो' अशा घोषणा देत पोस्ट ऑफीसकडे मोर्चा वळविला. ज्यावेळी पोस्ट ऑफीससमोर मोर्चा आला त्यावेळी पोस्टमास्टर रामास्वामी यांनी आंदोलकांना अडवले. परंतु कशाचीही तमा न बाळगता स्वातंत्र्यसैनिक पोस्ट ऑफीसमध्ये शिरले पण त्यांच्यातील विवेक पूर्णपणे जागृत होता. संदर्भ मिळतो की, ''रामास्वामी यांची पत्नी फारच आजारी होती. त्यांना व तिच्या लहान मुलाला खाटीवर झोपवून नगर परिषदेच्या शाळेतील प्रयोगशाळेत सुखरुप पोचविले. त्यांचे धान्य व संसारोपयोगी साहित्य बाहेर काढले व त्यानंतर पोस्ट ऑफीसमधील कागदपत्रांची होळी केली.''[१५] त्यानंतर पोस्ट ऑफीसची तोडफोड करुन ते आगीच्या भक्षस्थानी दिले. विशेष म्हणजे यावेळी कर्तव्यावर असणारा जमादार अल्ताब हुसैन याने एखाद्या कौतुक सोहळा बघावा अशा पद्धतीने हे सर्व बघत होता.

**पोलीस स्टेशनवर हल्ला व जाळपोळ :-**

देवळी स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्वाची घटना म्हणजे स्वातंत्र्यसैनिकांनी पोलीस स्टेशनवर केलेला हल्ला होय. त्यावेळी देवळी पोलीस स्टेशन येथे उपनिरिक्षक पिल्ले हे कर्तव्यावर होते. त्यांच्या समोर सुरुवातीला लोकांनी काही मागण्या ठेवल्यात.

१. भाऊसाहेब शेंडे यांची सुटका करावी.

२. पोलीस स्टेशनमधील सरकारी दस्तऐवज आमच्या स्वाधीन करावा.

३. पोलीस स्टेशनवर काँग्रेसचा ध्वज फडकवू द्यावा.

---

१५. बैस डॉ. वीरेंद्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. १५६

परंतु लोकांनी केलेल्या या मागण्या पिल्ले यांनी नाकारल्यात व जमादार अल्ताब हुसेन व संभुचरण जमादार यांना स्वातंत्र्यसैनिकांवर गोळीबार व लाठीमार करण्याचा आदेश दिला. परंतु संभुचरण याने गोळीबार व लाठीमार करण्यास स्पष्ट शब्दात नकार देतांना, '' हम चोर, डाकू के लिए है। आजादी मांगनेवाले के उपर लाठी और गोली नही चलायेंगे '' असे वक्तव्य केले. संभुचरणच्या या वक्तव्यामुळे पिल्ले घाबरला. हीच संधी साधून स्वातंत्र्यसैनिकांनी पोलीस मुख्यालयावर मातीचे तेल ओतून त्यास आगीच्यास भक्षस्थानी दिले. यावेळी सरकारी कागपपत्र, खुर्च्या व टेबल जाळण्यात आले.

देवळी स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी असणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना पकडण्यात आले. महादेवराव ठाकरे, कन्हैय्यालाल कपूर, मोतीलाल कपूर, नारायण नंदनवार यांना भारत संरक्षण कायदा अंतर्गत अटक करण्यात आली. तर अनेक स्वातंत्र्यसैनिक भूमीगत झाले. या भूमीगत सत्याग्रहींना गावातील अनेक लोकांनी आश्रय देवून चळवळीकरिता अप्रत्यक्षपणे सहकार्य केले. पोलीस व लष्कराने ओळख परेड घेवून अनेक लोकांना अटक केली. ३३ लोकांवर पोस्ट ऑफीस व पोलीस स्टेशनला आग लावणे असा आरोप करण्यात येवून न्या. एस.ए. पांडे 'स्पेशल न्यायाधीश' यांच्या कोर्टात वर्धा येथे खटला उभारण्यात आला. अशा या ३३ लोकांची नावे वर्धा जिल्हा गॅझेटिअर (संपादित) किं.का. चौधरी या संदर्भग्रंथामध्ये नमूद आहेत. वर्धा न्यायालयातून हा खटला नागपूर हायकोर्टात गेला. नागपूर हायकोर्टाने बऱ्याच स्वातंत्र्य सैनिकांची सुटका केली.

**खरांगणा (मोरांगणा) स्वातंत्र्यलढा :-**

आष्टी व देवळीप्रमाणेच खरांगणा येथे आंदोलनाला वेग आला. दि. १३ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधीचे निकटचे सहकारी महादेव अनंत मोघे यांनी खरांगणा येथे भेट देवून तेथील जनतेनी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन केले. त्यानुसार खरांगणा येथील काँग्रेस नेते भाऊराव उमक यांनी १५ ऑगस्ट १९४२ ला 'झेंडा वंदनाचा' कार्यक्रम घेतला व सरकारला बंड करण्याची धमकी दिली. भाऊराव उमकांच्या या घोषणेने खरांगणा पेटून उठले.

१० ऑगस्ट १९४२ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आष्टी येथून चिमूरकडे जात असतांना वाटेत खरांगणा येथे थांबून सेठ कन्हैयालाल यांचे घरी मुक्काम केले व त्यांनी आपल्या 'प्रखर देशभक्तीपर भजनांनी' लोकांमधील राष्ट्रभावना उद्दिपीत केली. दि. १५ ऑगस्ट १९४२ रोजी दु. ११ वाजता गुलाबराव काळबांडे यांच्या नेतृत्वाखाली प्रभातफेरी काढण्यात आली. राष्ट्रीय वृत्तीने भारावलेल्या आंदोलकांवर पोलीस उपनिरिक्षक गुप्ता यांनी हवालदारांना आंदोलकांवर लाठीमार करण्याचा आदेश दिला. पोलीसांचा आंदोलकांवर सुरु असणाऱ्या लाठीमारामुळे लोक जखमी झाले व आंदोलकांचा जमाव अधिकच प्रक्षुब्ध झाला व त्यांनी दगडांचा वापर शस्त्र म्हणून पोलीसांविरुद्ध केला. त्यामुळे पोलीसांचे अवसान गळाले. त्यांनी तेथून पळ काढला. खरांगणा येथील बंडाळी मोडून काढण्याकरिता अतिरिक्त पोलीस दल बोलावले. परंतु या पोलीस दलाला लोकांनी हैराण करून सोडले. आंदोलनात समाविष्ट असणाऱ्या झामाजी महल्ले, नारायणराव महल्ले, बाबाजी मोघे, शंकरराव चौधरी, चंपतराव गावंडे, मारोतराव भुजाडे, शंकरराव माकनवार यापैकी अनेकांना पकडून अटक करण्यात आली. त्यावेळी लोकांच्या संयमाचा बांध फुटला व त्यांनी धाम नदीच्या पात्रातून गोटे आणून त्याचा प्रयोग पोलीसांवर केला.

खरांगणा येथील क्रांतीयुद्धाच्या ज्वाला सर्वत्र पसरल्यात. पोलीसांनी केलेल्या दडपशाहीला आंदोलकांनी गोटमार करून प्रत्युत्तर दिले. यात गोविंद नावाचा जमादार गंभीर जखमी झाला. यावेळी ''मॅजिस्ट्रेट कुंटे यांनी फुक्के आवाज करण्याचा आदेश दिला. परंतु पोलीसांनी सरळ गोळीबार केला. या गोळीबारामध्ये 'केशव बळीराम बोंगीरवार' हा १८ वर्षीय युवक धारातीर्थी पडला. या आंदोलनात समाविष्ट असणाऱ्या सत्याग्रहींवर मॅजिस्ट्रेट पेंढारकर यांच्या कोर्टात खटला उभारण्यात आला. नारायणराव महल्ले, भाऊराव उमक, नामदेवराव मराठा, माधवराव गोमासे यांना अटक करण्यात आली. नारायणराव महल्ले यांना १ वर्षाची सक्तमजूरी व १५० रु. दंड आकारण्यात आला. तर इतर दोघांना २ वर्षांची शिक्षा झाली. इतरांची आधीच सुटका करण्यात आली होती. नारायणरावांनी दंडाची रक्कम न भरल्यामुळे त्यांच्या घरची नऊ जनावरे जप्त करण्यात आली.

अशाप्रकारे खरांगण्यामध्येही आंदोलनाच्या ज्वाला पेटलेल्या होत्या. नागपूर येथील सेंट्रल इंटेलिजन्स अधिकाऱ्यानुसार ''वर्धा जिल्हयातील स्थिती भयानक होती. वर्धा, आष्टी, देवळी, आर्वी प्रमाणेच खरांगणा परिसर इंग्रजी सरकार विरोधी पेटला होता.''

केशवराव बोंगीरवार यांच्या मृत्यूने खरांगणा अधिकच पेटून उठले. खरांगण्याचे सरपंच शंकरराव माकनवार व नारायण पटेवार, महादेव पटेवार, बापुराव उमक, विश्वनाथ चौधरी, बळीराम पोटदुखे, मारोती कापसे, गंगाधर आणि इतर कार्यकर्ते यांनी पोलीस ठाणे पेटविण्याचा निर्धार केला. परंतु पोलीसांच्या प्रसंगावधानाने ही अघटित घटना होण्याचे टळले. ज्या स्वातंत्र्यसैनिकांना पकडण्यात आले त्यांना वर्धा कारागृहात जागा नसल्याने तहसिल कचेरी वर्धाजवळ उभारण्यात आलेल्या कारागृहात ठेवण्यात आले. तेथे त्यांना जनावरासारखी वागणूक देण्यात आली. म्हणून स्वातंत्र्यसैनिकांनी अन्न सत्याग्रह केला.

खरांगण्यासारख्या छोट्याशा गावात स्वातंत्र्य प्राप्तीकरिता स्वप्राणाची आहुती देवून अनेक कार्यकर्त्यांनी अपार कष्ट व यातना सहन केल्यात. यावरुन या ठिकाणी चाललेल्या 'स्वातंत्र्य चळवळी'चे महत्व लक्षात येते.

## वर्धा जिल्ह्यातील भूमिगत आंदोलन :-

१९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनाची प्रचंड धास्ती सरकारने घेतली व नेत्यांची धरपकड केली. महात्मा गांधींव्यतिरिक्त अनेक नेत्यांना अटक केली. वर्धा जिल्हयामध्ये या आंदोलनाचा विशेष जोर होता. वर्धेसह जिल्हयातील खेडी तसेच हिंगणघाट, आष्टी, आर्वी, खरांगणा पेटून उठले होते. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी, आश्रमवासी तसेच अनेक स्वातंत्र्यप्रेमी कार्यकर्ते यांनी ब्रिटीश नोकरशाहीशी प्राणपणाने झुंज दिली. सरकारने अन्याय, अत्याचार व दड पशाही करुन या आंदोलनाची राष्ट्रीय चेतना खुडण्याचा प्रयत्न केला. पोलीस अधिकाऱ्यांना दडपशाही यशस्वी केल्यास बक्षीसे दिली जातील अशी अमिषे दाखविली. अशा अधिकाऱ्यांना वेळोवेळी बक्षीसे देवून सन्मानीत केले. अशा वेळी खुल्या आंदोलनाचे प्रमाण कमी करुन हे आंदोलन भूमीगत सुरू करण्याचे ठरले. तसा निर्णय विभिन्न प्रांतातील कार्यकर्त्यांच्या मुंबई येथे सरदार पटेल सभागृहात झालेल्या सभेमध्ये झाला होता.या सभेमध्ये

अरुणा आसफअली, अच्युतराव पटवर्धन, मेहरअली आणि जयप्रकाश नारायण यांनी हा निर्णय घेतला. हा घेतलेला निर्णय ज्यावेळी वर्धा जिल्हयात प्रसारित झाला, त्यावेळी भूमी गत आंदोलनामध्ये अनेक 'तरुणांनी' उत्स्फूर्तपणे भाग घेतला. या आंदोलनामध्ये समाविष्ट असणाऱ्या लोकांनी निरनिराळया तंत्राचा वापर केला.

काहींनी तारा तोडणे, रूळ उखडणे, टेलिफोनचे खांब उखडणे इत्यादि तर काहींनी सरकारविरोधी शस्त्र स्पर्धा करून तर काहींनी वेष बदलवून, नाव बदलवून आपल्या किंवा इतर राज्यात जाऊन सरकारी यंत्रणेविरुद्ध कटकारस्थान करणे इ. मार्गाने भूमिगतांनी ब्रिटीश सरकारची आंदोलन काळात झोप उडविली.

भूमीगत आंदोलनाचा 'वर्धा जिल्हयात' खऱ्या अर्थाने प्रचार व प्रसार करण्याचे कार्य हिंगणघाट येथील 'निळकंठ घटवाई' यांनी केले. वर्धा जिल्हयातच नव्हे तर ''भिकाऱ्याच्या वेशात चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, तुमसर या ठिकाणी त्यांनी भूमीगत आंदोलनाला गती दिली. वर्धा- नागपूर रेल्वेलाईनजवळ पोलीसांनी त्यांना पकडले. याच प्रकरणात पुढे त्यांना १ वर्षे सक्तमजूरीची शिक्षा ठोठावली.'' [१६]

सी.पी. अँड बेरार शासनाने ऑक्टोंबरच्या पाक्षिक गोपनीय अहवालात दावा करण्यात आला होता की, काँग्रेस चळवळ मृतवत झाली आहे. परंतु तसे नव्हते. तर उघडपणे आंदोलन करुन तुरुंगाचा रस्ता पत्करण्यापेक्षा तसेच चळवळीच्या कार्यात शिथीलता येवू नये याकरिता लोक भूमिगत राहून आंदोलन चालविणाऱ्या लोकांचे सहकार्य लाभत असे. ''जनमानसात आंदोलनाच्या प्रेरणा इतक्या रूजल्या होत्या की, गुप्तचर अधिकाऱ्यांना गुन्हा अन्वेषणात खेडूतांचे सहकार्य लाभत नसे. त्यामुळे पोलिसांना अडचणी येत. ऑक्टोंबर १९४२ मधील सनसनाटी घटना म्हणजे वर्धा - बल्लारशा लोहमार्गावर आगगाडीस उध्वस्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला.'' [१७]

---

१६. महाराष्ट्र साप्ताहिक ता. १४ डिसेंबर १९४४, पृ. ५५

१७. फोर्टनाईटली रिपोर्ट, ऑक्टोंबर १९४२

आष्टीच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात दाजीबाजी म्हळसणे, लालजी कोकाटे, व्यंकटराव ठाकरे, भाऊरावजी तांबसकर, लक्ष्मणराव वाघ, संभाजी जवळेकर, मोतीराम होले या सर्वांनी भूमिगत राहून कार्य केले. आष्टी, यावली, चिमूर, खरांगणा, तळेगांव या ठिकाणी आंदोलनाचा अग्नी आपल्या भजनांनी प्रदीप्त करण्याचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले. त्यांनीही बराच काळ भूमीगत राहून कार्य केले. सरकारने त्यांना अटक करून वर्धा, चांदा जिल्हयात प्रवेश करण्यात प्रतिबंध केला.

वर्धा येथील महिलाश्रमातील महिलांनी भूमीगत राहून कार्य केले. आचार्य कमलाताई लेले यांचेसह ३०-४० महिलाश्रमातील मुलींना पोलीसांनी पकडले. त्यावेळी कमलाताई लेले तेरा महिने स्थानबद्ध होत्या. वास्तविक पाहता छोडो भारतची मूळ संकल्पना घातपाती स्वरुपाची नव्हती. परंतु सरकारच्या अत्याचारी दडपशाहीमुळे खुल्या आंदोलनाचे प्रमाण कमी होवून भूमिगत राहून स्वयंसेवक प्रसंगी घातपाती कारवाया करू लागले.

''लोहमार्ग व दूरसंचरण व्यवस्था विस्थापित करण्याचे प्रयत्न करण्यात आले. या घातपाती प्रयत्नांचा सूड म्हणून लोहमार्गाच्या बाजूच्या गावांवर शासनाने सामूहिक दंड ठोठावला. खेडूतांना फटके मारण्याच्या शिक्षा देण्यात आल्या. लोहमार्ग व दूरसंचरण व्यवस्थेच्या संरक्षणासाठी सरकारने ग्रामप्रमुखांना जबाबदार धरले. सरकारी मालमत्तेच्या संरक्षणासाठी खेडूतांना मानधन तत्वावर नियुक्त केले व सेनादलाच्या कडक नजरेखाली गावकरी गस्त पथके उभारण्यात आली. पण तरीही या भूमिगत आंदोलनाचा जोर कायम राहिला.''[१८]

भूमीगत आंदोलनामध्ये आपला सक्रिय सहभाग देवून ज्यांनी सशस्त्र क्रांतिकारी घटना घडवून आणल्या त्याला भारतीय लोक किंवा काँग्रेसचे अनुयायी जबाबदार नसून सरकारची क्रूर दडपशाही आहे, असे महात्मा गांधींनी म्हटले. यावरून या भूमीगत आंदोलनाचे स्वरुप व महत्व स्पष्ट होते. नागपूर येथील आर. एस. रुईकर हे फॉरवर्ड ब्लॉकचे निष्ठावंत अनुयायी होते. वर्धा येथील सत्यनारायण बजाज हे रुईकरांच्या कार्याने प्रभावित झालेले नेते होते. हिंदुस्थानी लालसेना व फॉरवर्ड ब्लॉक चे अनुयायी घातपाती कृत्यात सामील होते.

---

१८. कित्ता, ऑक्टोंबर १९४२ , पृ. ५५

ऑक्टोबर १९४२ च्या फोर्टनाईटली रिपोटनुसार "१९ ऑक्टोंबर १९४२ ला वर्धा स्थानकापासून तीन किलोमिटर अंतरावर अडीच फूट लांबीचा लोहमार्ग कापण्यात आला होता. यावेळी वर्ध्यातील पाच फॉरवर्ड ब्लॉक स्वयंसेवकांना संशयित म्हणून पकडले आणि नजीकच्या गावावर सामुहिक दंड ठोठावण्यात आला."

छोडो भारत आंदोलनात रेड आर्मी व फॉरवर्ड ब्लॉकचे कार्यकर्ते काँग्रेसच्या खांद्याला खांदा लावून प्राणपणाने लढले. "हिंदुस्थान रेड आर्मीचे पुढारी मगनलाल बागडींच्या शिरावर सरकारने मोठे पारितोषिकच घोषीत केले होते. त्यांना व त्यांच्या पाच सहकाऱ्यांना सरकारने मुंबईत अटक केली." [१९]

## छोडो भारत आंदोलनास औद्योगिक कामगारांचा प्रतिसाद :-

नागपूर येथील फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे आर.एस. रुईकर हे कामगार वर्गाचे पुढारी होते. त्यांचा वर्धा जिल्हयातील गिरणी कामगारांवर प्रभाव होता. हिंगणघाटला रायसाहेब मोहता मिल व रायबहादूर बंसिलाल अबिरचंद मिल तर पुलगावला पुलगांव कॉटन मिल होती. या गिरण्यांमध्ये कामगारांचे संप घडवून आणून गिरणी मालकांचीही या संपास सहानुभुती मिळवून सरकारच्या कार्यात अडथळे उत्पन्न करणे हे ध्येय रुईकरांना नजरेसमोर ठेवून छोडो भारत आंदोलनाच्या काळात या गिरण्यांमध्ये संप घडवून आणले. या संपांना गिरणी मालकांचा पाठिंबा मिळविला. कोळशाच्या पुरवठ्यात खंड पाडण्यासाठी गिरणी मालक व कामगार सतत प्रयत्नशील असत. रुईकरांनी वेळोवेळी कामगारांना संघटीत करून 'ब्रेडपेक्षा स्वातंत्र्य अधिक महत्वाचे आहे' असा विचार कामगारांचया गळी उतरविला. १९४२ च्या आंदोलनापूर्वी अनेकदा त्यांनी कामगारांचे संप घडवून आणले. परंतु त्यावेळी रुईकरांना ब्रिटीश सरकारने पकडले नाही, कारण युद्धकाळात सरकारला औद्योगिक क्षेत्रात शांतता हवी होती. परंतु १९४२ च्या आंदोलनकाळात त्यांनी जो गिरणी कामगारांचा संप घडवून आणला त्यावेळी सरकारने त्यांना अटक केली व त्यांची रवानगी शिवनी कारागृहात केली. त्यावेळी त्यांनी कारागृहात केलेल्या उपोषणास नागपूर - वर्धा येथील कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

---

१९. कित्ता, ऑक्टोंबर १९४२ , पृ. ५५

वैयक्तिक सत्याग्रहाचे अपयश क्रिप्स योजनेची विफलता यानंतर भारतीयांच्या नैराश्याच्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी देशव्यापी अशा 'छोडो भारत आंदोलना'ची संकल्पना महात्मा गांधींनी वर्धा-सेवाग्राम येथूनच कॉंग्रेसपुढे मांडली. त्यामुळे वर्धा जिल्हयात शेवटपर्यंत छोडे भारत चळवळीचा विशेष जोर होता. गांधीप्रणित इतर चळवळींप्रमाणेच बृहत बजाज परिवार या चळवळीत अग्रेसर होता. महात्मा गांधींच्या वर्धा- सेवाग्राम वास्तव्यापासून अखिल भारतीय पातळीवर विधायक कार्य करणाऱ्या अनेक गांधीवादी संस्था वर्धा येथे उदयास आल्या. सत्याग्रह आश्रम, महिला आश्रम, अखिल भारतीय चरखा संघ, नालवाडी येथील ग्रामसेवा मंडळ, अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळ, दत्तपूर येथील महारोगी सेवा मंडळ, गोसेवा संघ, नालवाडी, पवनार येथील परमधाम आश्रम, सेवाग्राम आश्रम या सर्व रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्थाच नव्हत्या तर स्वातंत्र्य आंदोलकांच्या कार्याचे प्रेरणास्थान होत्या. उपरोक्त सर्वच संस्थांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आंदोलनात हिरीरीने महत्वाची भूमिका बजावली. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी, स्त्रिया, आश्रमवासी, जिल्हयातील नोकरशाहीशी प्राणपणाने झुंजली. गांधीवादी संस्थांच्या कार्यकर्त्यांनाही शिक्षा करण्यात आली. ''अखिल भारतीय चरखा संघाचे सचिव जे.सी. कुमाराप्पा यांनी ग्राम उद्योग पत्रिकेत 'A stone for bread' हा लेख लिहिला. या लेखातून त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की, ''लोक भाकरीची मागणी करीत असतांना सरकार त्यांना दगड मारत असल्याकारणाने शेतकऱ्यांनी कागदी नोटांच्या बदल्यात अन्नधान्य विकू नये.'' म्हणून सरकारने त्यांच्यावर खटला उभारला व दोन वर्षे सक्तमजूरीची शिक्षा ठोठावली.''[२०]

भारत छोडो आंदोलनाचा तीव्र गतीने प्रसार होत होता. हे आंदोलन दडपून टाकण्याकरिता सरकारने दडपशाहीचे धोरण अवलंबले. त्याचा सर्व स्तरातून लोकांनी निषेध केला. ब्रिटीशांच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी आर. के. पाटील यांनी आय.सी.एस. चा राजीनामा देवून स्वातंत्र्यसैनिक, शेतकरी यांच्या करिता निधी गोळा करण्याचे कार्य केले. सरकारच्या या दडपशाहीने व्यथित होवून महात्मा गांधींनी १० फेब्रुवारी १९४३ पासून उपोषण

२०. कोलारकर, डॉ- श. गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. २४१

सुरू केले. त्यामुळे वर्धा जिल्हयात असंतोष निर्माण झाला. वर्धा येथील गांधीवादी संस्थांनी सामूहिक प्रार्थना व सुतकताई आयोजित केली. अनेकांनी गांधीजींच्या उपोषणकाळात अन्नसत्याग्रह केला. नागपूर, जबलपूर व बुलढाणा कारागृहात असणाऱ्या वर्धा येथील बंदीवानांनी अन्न सत्याग्रह केला. वर्धा येथील रामकृष्ण बजाज व किशोरीलाल मश्रुवाला यांनी महात्मा गांधींच्या सान्निध्यात पुणे कारागृहात आपली रवानगी करण्यात यावी, याकरिता सरकारजवळ विनंती आर्जवे केली पण सरकारने अमान्य केली.

उपोषणानंतर महात्मा गांधींचे आजारपण, १९४२-१९४३ चा प्रतिकूल शेती हंगाम फेब्रुवारी-मार्च १९४४ मध्ये पडलेला जोरदार पाऊस व गारांचा वर्षाव यामुळे पिकांची झालेली हानी व त्या कारणाने आंदोलनात निर्माण झालेला व्यत्यय, सेवाग्राम आश्रमातील गांधीजींचे अनुयायी महादेवभाई देसाई यांचे निधन, कस्तुरबा गांधींचे पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये झालेले निधन या घटनांनी वर्धा जिल्हा पूर्णतः हेलावून गेला. देशपातळीवरही आंदोलनाची तीव्रता कमी झाली याचे पडसाद वर्धा जिल्हयावरही उमटलेत.

वर्धेतील १९४२ ची भारत छोडो चळवळ अतिशय उग्र रुपाने चालली. या चळवळीत १७ हुतात्मे झालेत. वर्धा १, सेवाग्राम २, वडाळा ६, खडकी २, तरसापूर १, आष्टी ४, मोरांगणा १, असे ते १७ हुतात्मे होत. तर वर्धा तहसिलीत २९५, सेलू तहसिलीत २६, देवळी तहसिलीत ९९, हिंगणघाट तहसिलीत ५७, आर्वी तहसिलीत ५६, कारंजा तहसिलीत ४, आष्टी तहसिलीत ८० स्वातंत्र्यसैनिकांना तुरुंगवास भोगावा लागला.''

१९४२ च्या आंदोलनाचे वैशिष्टय असे की, सरकारच्या दडपशाहीच्या धोरणाला भारतीय लोकांनी प्रत्यक्ष कृती करून तोंड दिले. हे आंदोलन सरकारने आपल्या बलाढय यंत्रणेद्वारे चिरडून टाकले तरी लाकांमध्ये निर्माण झालेली 'स्वातंत्र्याची उर्मी' सरकार दडपू शकले नाही. याच उर्मीच्या बळावर पुढे भारतीयांनी बलीष्ठ अशा ब्रिटीश साम्राज्यशाहीला गुडघे टेकण्यास बाध्य केले. ही या चळवळीची 'अप्रत्यक्ष फलश्रुतीच' म्हणावी लागेल.

## प्रकरण – ५

# रचनात्मक कार्याची प्रयोगभूमी – वर्धा जिल्हा

### पार्श्वभूमी :-

'वर्धा जिल्हयाचे राष्ट्रीय आंदोलनातील योगदान' यासंदर्भात अध्ययन करीत असतांनाच या जिल्ह्याचे 'रचनात्मक कार्य' आपल्या दृष्टीपुढे येते. स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग हा रचनात्मक कार्यातून जातो हे ओळखून महात्मा गांधींनी रचनात्मक कार्याला अतिशय महत्व दिले. स्वराज्याच्या पूर्वतयारीला रचनात्मक कार्याची अभिनव जोड देवून त्यांनी सूत्रबद्ध रीतीने जनमानसांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये रचनात्मक कार्याकरिता उत्साह निर्माण केला. स्वराज्यप्राप्तीचे ध्येय गाठण्याकरिता निश्चितच त्यांनी निर्माण केलेला उत्साह अत्यंत कमालीचा होता. ''मेरा रचनात्मक कार्यक्रम अगर सारा राष्ट्र पुरी तरह से सफल कर दे तो सत्याग्रह के बिनाही मै आपको स्वराज्य ला दुंगा।'' असे महात्मा गांधींनी अनेक वेळा सार्वजनिक सभेत वक्तव्य केले. आणि म्हणूनच १९२४ च्या बेळगांव अधिवेशनात काँग्रेसने रचनात्मक कार्य करावे असा ठराव पारीत केला.

'' रचनात्मक कार्यक्रम हा राष्ट्रीय चळवळीचा सुरुवातीपासूनच एक महत्वाचा भाग होता. १९२१ च्या अहमदाबाद येथील काँग्रेस अधिवेशनात असहकार मान्य नसणाऱ्यांसाठी दारुबंदी, खादीचा प्रचार इत्यादी कार्यक्रम सुचविले गेलेत.तर १९२३ च्या कोकोनाडा व १९२४ च्या बेळगांव अधिवेशनात विधायक कार्यावर भर देणे आवश्यक आहे असे ठरले होते. ''[१] रचनात्मक कार्य हा कोणत्याही चळवळीचा आत्माच असतो. हा गांधीजींचा विचार आत्मसात करुन संपूर्ण देशातील विविध प्रांतांमध्ये कार्यतत्पर अशा अनुयायांनी कार्य केले. गांधीजींनी जे राष्ट्रोन्नती व पर्यायाने ग्रामोन्नतीचे सुंदर स्वप्न पाहिले, त्याकरिता या अनुयायांनी सर्वतोपरी कार्य करून ते स्वप्न पूर्ण केले. असहकार चळवळीनंतर महात्मा गांधींनी स्वतःला विधायक

---

१. बैस डॉ. वीरेंद्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास, पृ. १७२

कार्याला वाहून घेतले. १९२७ हे वर्ष त्यांनी 'मौन वर्ष' म्हणून पाळले. आठवड्याला प्रत्येक सोमवारी ते मौनव्रत धारण करीत त्यावेळी ते लोकांसमोर आलेत की आपला उजवा हात वर करीत आणि बोटांच्या इशाऱ्यावर सांगत असे. पहिले बोट अस्पृश्योद्धारासाठी , दुसरे बोट कताई करिता, तिसरे बोट मद्यपान निषेध, चौथे बोट सामाजिक व धार्मिक एकता, पाचवे बोट महिलांना समानता इ.

गांधीजींनी वेळोवेळी स्वातंत्र्य आंदोलन काळात उत्पन्न परिस्थितीला सांभाळण्याकरिता रचनात्मक कार्याची आवश्यकता प्रतिपादन केली. ते म्हणत, ''जब क्रियात्मक संघर्ष ना हो, जब राजनैतिक दबाव अथवा थकावट के कारण राष्ट्र कुछ समय के विश्रांती चाहता है। ऐसे समय के लिए रचनात्मक प्रवृत्ती के लाभदायक कार्यक्रम को प्रस्तुत करने की आवश्यकता अनुभव होती है, अन्यथा संघर्ष करने वाली पंक्ति छिन्न-भिन्न हो जाएगी, असंघठित हो जाएगी और नैतिकता की दृष्टि से उसका ऱ्हास हो जाएगा।''[२] देशाच्या स्वातंत्र्याकरिता ज्या चळवळी राबविल्यात त्यावेळी त्यांनी रचनात्मक कार्याकरिता लोकांना आवाहन केले. ते म्हणाले, ''यदी किसीको सत्याग्रह करने की इच्छा होगी तो उसके लिए मार्ग खुले है। यदी कोई असमर्थ है तो वे रचनात्मक कार्य करे।'' १९२० मध्ये भारतात ज्यावेळी सविनय कायदेभंग चळवळ सुरु झाली त्यावेळी 'रचनात्मक कार्यक्रम' सुरू झाला. महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्याने अनेक लोक प्रभावित झाले होते. त्यात वर्धा जिल्ह्यातील लोकांचा विशेष सहभाग होता.

**रचनात्मक कार्यक्रम आणि वर्धा जिल्हा :-**

वर्धा जिल्हा ही 'रचनात्मक कार्या'ची प्रयोगशाळा हाती. १९३३ मध्ये महात्मा गांधी वर्धेला आलेत व वर्धा येथे राहू लागलेत. पुढे १९३६ ला ते सेवाग्राम येथे स्थायिक झालेत. तेव्हापासून रचनात्मक कार्य करणाऱ्या अनेक संस्था वर्धा सेवाग्राम येथे स्थापन झाल्या व रचनात्मक कार्याचे 'प्रमुख केंद्र' वर्धा बनले. हे खरे असले तरी सुरुवातीपासूनच वर्धा जिल्ह्यात रचनात्मक कार्यक्रम सुरू होते. महात्मा गांधींच्या वर्धा येथे आगमनापूर्वीच

---

२. वालिया ममता - महात्मा गांधी और जीवन कौशल शिक्षा, पृ. १३

जमनालाल बजाज यांनी वर्धा येथे रचनात्मक कार्याचा श्रीगणेशा केला होता. महात्मा गांधींच्या रचनात्मक चळवळीत त्यांनी भरभरून योगदान दिले असले तरी गांधीजींनी त्यांच्या मनात रचनात्मक कार्याविषयी रूची निर्माण केली असे पूर्णतः म्हणणेही चुकीचे ठरेल. जमनालालजींना रचनात्मक कार्यासाठी प्रारंभी खऱ्या अर्थाने प्रोत्साहित केले ते श्रीकृष्णदास जाजूंनी. त्यांचेबरोबर जमनालाल १९०६ ला कलकत्ता अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी गेले. जमनालालजींना ब्रिटिश सरकारकडून 'रायबहादूर' ही पदवी मिळाली होती. त्यांना सरकार दरबारी मानसन्मान होता. त्यावेळी जाजूंनी त्यांना "राजनिति अच्छे अच्छो को फिसलाने वाली सीढी है। लेकिन राजनीति में अगर रचनात्मक कार्योद्वारा प्राण फूंका जाए तो राजनीति काम की है।" असा उपदेश केला आणि म्हणूनच सरकारी राजकारणात व काँग्रेसमध्ये मोठमोठी पदं भूषविणाऱ्या जमनालालजींचा ओढा रचनात्मक कार्याकडेच होता. त्यांची सुरुवात त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील रचनात्मक कार्यातून केली. मारवाडी विद्यालय वर्धा १९१०, मुंबई १९१५, मारवाडी विद्यार्थी गृह,(१९१२) कन्याश्रम (१९२१) गोविंदराम सेक्सरिया वाणिज्य महाविद्यालय यांची त्यांनी स्थापना केली. मात्र त्यांच्या रचनात्मक कार्याप्रती असणाऱ्या वृत्तीला एका अभिनव तंत्राच्या मुशीत घडविण्याचे कार्य गांधीजींनी केले.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या रचनात्मक कार्यात वर्धा येथील सेठ जमनालाल बजाज यांचा फार मोठा वाटा होता. त्यासंबंधात ब्रिजलाल बियाणी लिहितात, "काँग्रेस के रचनात्मक आंदोलन के सेठ जमनालालजी प्राण थे गांधीजी जो योजना बनाते जमनालालजी उसे क्रियात्मक रुप देते"[३] महात्मा गांधींनीही वेळोवेळी ही बाब मान्य केली. ते म्हणत, "मेरी प्रत्येक प्रवृत्तियों के साथ जमनालालजी जितना एकरूप हो गये थे उतना कोई नही हो सका। फिर चाहे वो राजनैतिक प्रवृत्तिया हो अथवा रचनात्मक कार्य। मेरी वास्तविक राजनीति है रचनात्मक कार्यक्रम पर जोर देना उनकी भी राजनीति यही है।"

रचनात्मक कार्य करणाऱ्या अनेक संस्था वर्धा सेवाग्राम येथे स्थापन झाल्या आणि लवकरच वर्धा हे रचनात्मक कार्याचे प्रमुख केंद्र बनले.

---

३. शर्मा विश्वम्भर प्रसाद - राष्ट्रनिर्माता- स्व. सेठ जमनालालजी बजाज, पृ. २

## १) वर्धा, पवनार, सेवाग्राम येथील सत्याग्रहाश्रम :-

### वर्धा येथील सत्याग्रहाश्रम (१९२१) :-

अहमदाबाद येथील कोचरब तसेच साबरमती येथे महात्मा गांधींनी आश्रम स्थापन केलेत. या आश्रमात आश्रमवासीयांना नैतिक, व्यावहारिक, आध्यात्मिक तसेच राष्ट्रीय शिक्षणाचे शिक्षण देणारे शक्तीपीठ होते. शिस्त, स्वावलंबनाचे बाळकडूही या आश्रमातून दिले जाई. कोचरब आणि साबरमती आश्रमाप्रमाणेच वर्धा येथे आश्रम असावा अशी इच्छा जमनालाल बजाज यांनी १९२० च्या नागपूर अधिवेशनप्रसंगी गांधीजीजवळ प्रदर्शित केली. त्यावेळी महात्मा गांधींनी सत्याग्रहाश्रमाची एक शाखा वर्धा येथे काढण्यास जमनालालजींना परवानगी दिली. १९२१ च्या सुरवातीस वर्धा येथे सत्याग्रहाश्रम स्थापन झाला. या सत्याग्रहाश्रमाने अस्पृश्यता निवारण, ग्रामसफाई, अंधश्रद्धा निर्मूलन, सूतकताई, कापड विणणे, गोसेवा, राष्ट्रीय शिक्षण यांसारखे परिणामकारक कार्यक्रम राबविलेत. सत्याग्रहाश्रमाच्या स्थापनेमध्ये जमनालाल बजाज यांनी पुढाकार घेतला. या आश्रमासाठी लागणारी जागा, त्यासाठी लागणारे वित्तबळ व कार्यकर्ते यांचा पूर्ण प्रबंध त्यांनी केला. तर या आश्रमाचा कार्यभार चालविण्याकरिता महात्मा गांधींनी साबरमती आश्रमातील रमणिकलाल मोदी, मगनलाल गांधी यांना पाठविले. वर्धेच्या पूर्वेस असणाऱ्या आपल्या मालकीचा विस्तीर्ण बगीचा जमनालाल बजाज यांनी आश्रमाकरिता दिला. त्या बगीच्यातील इमारतीत आश्रम स्थापन करण्यात आला. पुढे आवश्यकतेनुसार सत्याग्रहाश्रमाची जागा बदलण्यात येवून तो वर्धा सिव्हिल लाईन, चर्चजवळील एका भव्य बंगल्यात नेण्यात आला. त्याला 'घास बंगला' तसेच 'भूत बंगला' आणि कोणी 'जपानी बंगला' असेही म्हणत. पुढे तेथून हा आश्रम मारवाडी विद्यालयाच्या पलीकडील एका शेतात नेण्यात आला.

सत्याग्रहाश्रमाची तीन वेळा जागा बदलली पण कार्यात व उद्दिष्टात किंचीतही फरक पडला नाही. उलट सत्याग्रहाश्रमाच्या प्रत्येक रचनात्मक कार्यामुळे ती प्रत्येक जागा पवित्र झाली. याबद्दल शिवाजीराव भावे लिहितात, '' साबरमतीच्या आश्रमाचे मूळ बीज, जमनालालजींच्या बगीच्यात त्याला नवीन पान फुटले. त्याचे दुसरे पान म्हणजे घास बंगल्यातले

वास्तव्य. नवीन आश्रमातले वास्तव्य या आश्रमरुपी सेवावृक्षाचे मोठे मजबूत खोड बनले पुढे हा सेवावृक्ष फोफावत गेला. महापुरुष एकेका स्थानाला स्पर्श करतो त्याचे परिवर्तन करतो लगेच पुन्हा दुसऱ्या स्थानाला पावन करण्यासाठी पुढे जातो. प्रथम जमनालालजींच्या खाजगी बगिच्यात आश्रम होता. पुढे ते स्थान खाजगी राहिले नाही. जमनाललाजींनी ती सार्वजनिक संस्था केली त्यानंतर घास बंगल्यात आश्रम गेला त्याचेही शेवटी अतिथी शाळेत रुपांतर केले. यानंतर या नवीन आश्रमात हा महापुरुष दहा वर्षे राहिला. यानंतर हा आश्रमही महिला मंडळाच्या सार्वजनिक संस्थेच्या हातात गेला.'' [४]

पुढे रमणिकलाल मोदीनंतर सत्याग्रहाश्रमाच्या प्रबंधाकरिता महात्मा गांधींनी विनोबा भावे यांना पाठविले. त्यांच्यासोबत रघुनाथ धोत्रे, द्वारकानाथ हरकरे, वल्लभस्वामी, कृष्णदास गांधी, केशव गांधी, शिवाजी भावे ही मंडळीही साबरमती आश्रमातून वर्धेस आलीत. त्याचप्रमाणे राधाकृष्ण बजाज, गोपाळराव वाळुंजकर, गोपाल झाडे, बाबाजी मोघे, दीपकदत्त चौधरी, घाणेकर या सर्वांनी या आश्रमात विधायक स्वरुपाचे रचनात्मक कार्यक्रम राबविलेत.

श्रमसंस्कृतीचे तत्व लोकांवर बिंबविणे व त्यांच्यात देशप्रेम जागविणे हे सत्याग्रहाश्रमाचे उद्दिष्ट होते. विनोबांचे नैतिक सदाचरण, शिस्तप्रिय व स्वावलंबी जीवन, त्यांचे गीता उपनिषदांवरील ज्ञान यामुळे कार्यकर्ते त्यांच्याकडे आकृष्ट होत. त्यामुळे आश्रमवासींची संख्या वाढली. आश्रमात नवनवीन प्रयोगही सुरू झालेत. तसतसा वर्धा आश्रमाचा व्यापही वाढत गेला. तशी जागाही तीन वेळा बदलावी लागली. याच आश्रमातून विनोबांनी मौलिक ग्रंथलेखन केले. भंगीकाम केले. तकली उपासनाही केली. या आश्रमात ग्रामसंघटनेचे कार्य, सूत कातणे, पिंजणे, विणणे, आत्मसमर्पणाची भावना, देशभक्तीची शिकवण दिली जात असे. पुढे नालवाडी येथे आश्रम नेण्यात आला. तथे ''राधाकृष्ण बजाज यांच्याकडे खादी व गोसेवा, वल्लभस्वामी सर्व सेवा संघ, मनोहर दिवाण महारोग निवारण्याचे कार्य करीत होते.''[५] आश्रमाने रचनात्मक कार्याबरोबरच राष्ट्रीय चळवळीतही मौलिक योगदान

४. विनोबा जीवनदर्शन , पृ. ३०७

५. श्रीमन्नारायण - विनोबा : हिज लाईफ अँड वर्क , पृ. ५४

दिले. असहकार आंदोलनातही सत्याग्रहींनी सहभाग दिला. या आश्रमवासीयांचा पहिला मोठा सत्याग्रह म्हणजे नागपूरचा 'झेंडा सत्याग्रह' होय. हा आश्रम प्रत्येक विधायक कार्याचे प्रतिक होता. आश्रमाच्या प्रत्येक विधायक कृतीला सर्वतोपरी मदत करण्याचे कार्य जमनालाल बजाज यांनी केले.

## सेवाग्राम आश्रम :-

वर्धेपासून ८ कि.मी. अंतरावरील सेगांव (सेवाग्राम) ही महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्याची जिवंत प्रयोगशाळा बनली. सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाची सुरुवात महात्मा गांधींनी मिठाच्या सत्याग्रहापासून केली. ज्यावेळी त्यांनी मिठाच्या सत्याग्रहाकरिता साबरमती आश्रमातून दांडीकरिता प्रयाण केले. त्यावेळी दृढनिश्चय केला की संपूर्ण स्वराज्य प्राप्त केल्याशिवाय साबरमतीला परत येणार नाही. मिठाचा सत्याग्रह यशस्वी झाला परंतु कायदेभंगाची मोहीम पूर्णतः यशस्वी झाली नाही. स्वराज्य मिळाले नाही. त्यांना आंदोलनकाळात तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांनी रचनात्मक कार्य करण्याचा निर्धार केला व त्यांचे 'पाचवे पूत्र' जमनालाल बजाज यांच्या आग्रहास्तव ते २९ ऑक्टोंबर १९३४ ला वर्धा येथे आले. वर्धा येथूनच प्रथमतः त्यांनी कन्याश्रम, मगनवाडी येथून रचनात्मक कार्य केले. परंतु ग्रामोद्योगाचे ध्येय स्वतःसमोर असल्याने या कार्याची उभारणी शहराऐवजी ग्रामातून खऱ्या अर्थाने परिपूर्ण होईल. त्याकरिता जमनालाल बजाज यांच्या मालगुजारी हक्काचे गाव सेगांव निवडण्यात आले. सेगांव येथे एक आश्रम असावा की जेथून रचनात्मक कार्य योग्य रीतीने करता येईल, असे गांधीजींना वाटत होते. ''In early 1936, Gandhiji expressed his wish to make his residence in a villege. He had been talking with sardar Patel and Jamnalalji about moving on the Segaon village. At least on the 30th April, 1936 Gandhiji Shifted his residence from Wardha to Segaon village.''[६]

---

६. Sevagram Ashram Pratishthan. पृ. २

पारंपारिक दृष्टीने सेवाग्राम हे ऐतिहासिक किंवा प्रेक्षणीय स्थळ नव्हते. परंतु गांधीजींच्या वास्तव्यानंतर या गावास विशेष महत्व प्राप्त झाले. रुढार्थाने म्हणावा तसा हा 'आश्रम' नव्हता तर गांधीजींच्या सुराज्याच्या विधायक कार्याची ती 'प्रयोगशाळा' होती. सेवाग्राम आश्रमवासीयांसमोर गांधीजींनी १८ प्रकारचे रचनात्मक कार्यक्रम ठेवलेत. त्यात सामाजिक एकता, अस्पृश्यता निवारण, खादी निर्माण व खादीप्रसार, ग्रामस्वच्छता, राष्ट्रभाषा प्रचार, मुलाद्योगी शिक्षण, आरोग्य शिक्षण, आर्थिक एकता, महिला सुधार अंधश्रद्धा निवारण, ग्रामसुधार, देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, स्वावलंबन व शिस्तप्रियता, शारिरीक परिश्रम इत्यादि कार्यक्रमांचा त्यात अंतर्भाव होता. आश्रमाच्या स्थापनेमागील भूमिका ही विधायक स्वरुपाची होती.

शारिरीक परिश्रमाची प्रतिष्ठा निर्माण करण्याचे, 'चरखा', सामाजिक विषमता नष्ट करण्याचे, 'झाडू', व लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची व विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करण्यासाठी 'सामुदायिक प्रार्थना' ही परिवर्तनाच्या व रचनात्मक कार्याच्या क्रांतीची प्रतिके व विधायक कार्याची प्रभावशाली माध्यमे होती असे न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी म्हणतात. ते सर्वतोपरी सत्य आहे. सेवाग्राम आश्रमातून चालणाऱ्या कार्यक्रमांची जर यशस्वीपणे अंमलबजावणी झाली तर त्याचे पर्यवसान आपणाला हव्या असणाऱ्या स्वराज्यात होईल आणि विशेष म्हणजे हा दृढसंकल्प सिद्धीस नेण्यासाठी त्यांनी वर्धा ही भूमी निवडली. त्यातही विशेष बाब ही की त्यांच्या या विधायक स्वरुपाच्या रचनात्मक कार्याला मोलाची साथ देणारे सहकारी त्यांना जमनालाल बजाज, मगनलाल गांधी, विनोबा भावे, किशोरीलाल मश्रुवाला, मनोहर दिवाण, गोपाळराव वाळुंजकर, गोपाळराव काळे, जे.सी. कुमाराप्पा, काका कालेलकर, कृष्णदास गांधी, शांता नारुळकर, कार्यनायकम, डॉ. सुशीला नायर, मीरा बहन यांच्या रुपाने मिळालेत. गांधीजींनी ज्या रचनात्मक कार्याची सांगड स्वातंत्र्य आंदोलनाशी घातली त्याकरिता जमनालालजींनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. 'हरिजन' या मुखपत्रात गांधीजी लिहितात, ''जनतेच्या कल्याणाचे दृष्टीने श्रीमंत माणसांनी आपल्या संपत्तीचे विश्वस्त असले पाहिजे. ही कल्पना मी जेव्हा मांडतो त्यावेळी माझ्या मनात जमनालाल बजाज यांचे जीवनचरित्र

समोर येथे. आपल्या संपत्तीचा विनियोग त्यांनी असा केला की त्यांनी बांधलेले प्रत्येक घर धर्मशाळा बनले.''[७]

सेवाग्राम आश्रमात आदीनिवास, बापुकुटी, बाकुटी, आखरी निवास, परचुरे कुटी, महादेव कुटी उभारण्यात आल्या. त्यातून भरघोस प्रमाणात गांधीजींनी विहीत केलेले रचनात्मक कार्य चालत असे. याबाबत श्रीमन्नारायण लिहितात, ''अप्रैल १९३६ में जब गांधीजी सेवाग्राम आए थे तब वहा एक भी कुटियाँ नही थी । तिन वर्षो के भीतर ही यह एक ऐसी ग्रामीण बस्ती हो गयी जिसमें सडके, डाकघर, टेलिफोन, टेलिग्राम और अस्पताल आदि सारी सुविधाए प्राप्त थी । ''[८]

सेवाग्राम आश्रमातील बापुकुटीत (खादी मंदीर) स्थापन करण्यात आले. येथे आश्रमवासीयांना सूतकताईचे शिक्षण दिले जाई. आदिनिवासाच्या व्हरांड्यात सूत कातणे, कापूस धुनणे, साफ करणे इत्यादि विषयांचे ज्ञान लोकांना दिल्या जात. गावातील मुले याठिकाणी सुत कातण्याचे शिक्षण घेत असे. मीरा बहन, बलवंतसिंह, मुन्नालालभाई, अमृतलाल नानावटी ही मंडळी सुतकताई व बुनाईचे शिक्षण युवकांना देत असे. हे सर्व कार्य सेवाग्राम आश्रमातील चरखा कुटीत चालत असे. ही कुटी म्हणजे बापू कुटी होय. आश्रमातील ''चरखा संघातर्फे गावामध्ये सहकारी दुकान उघडण्यात आले होते. सुतकताईच्या मोबदल्यात लोकांना ज्वारी दिली जात होती. सहकारी दुकानात सुताच्या गुंड्या दिल्यावर कापड (धोतर व लुगडे) किंवा किराणा मिळत होता. या दुकानाचे प्रमुख सुखाभाऊ चौधरी होते. जेथे हे कार्य सुरु होते आज ती वास्तु 'शांतीभवन' या नावाने प्रसिद्ध आहे.'' सेवाग्राम आश्रमात विविध स्वरुपाचे रचनात्मक कार्य चालत असे. त्याचा स्वतंत्र परामर्श पुढे घेतलेलाच आहे.

**परमधाम आश्रम :-**

वर्धा जिल्ह्यातील पवनार (प्रवरापूर) हे एकेकाळी वाकाटकांच्या राजधानीचे स्थळ होते. ऐतिहासिकदृष्टया प्रसिद्ध असणाऱ्या पवनार येथे विनोबा भावेंनी १९३७ मध्ये

---

७. कोलारकर, डॉ. शं. गो. - विदर्भाचा आधुनिक इतिहास, पृ. ३७८-३७९

८. श्रीमन्नाराणय (अनु. भवानीप्रसाद मिश्र) आधुनिक भारत के निर्माता - जमनालाल बजाज पृ. १२७

परमधाम आश्रमाची स्थापना केली. धाम नदीच्या किनाऱ्यावर स्थित असणाऱ्या जमनालाल बजाज यांच्या मालकीच्या बंगल्यात हा आश्रम होता. हा आश्रम लवकरच रचनात्मक कार्याचे केंद्र बनला. या आश्रमातून अस्पृश्यता निवारण, सामाजिक एकता, महिला सुधार, अंधश्रद्धा निवारण यांचे पाठ दिले जाई. विनोबांनी भूदान व ग्रामदानाची येथूनच भारतीयांना प्रेरणा दिली. महिलांना आध्यात्मिक साधना करणे सुलभ होण्यासाठी त्यांनी १३ मार्च १९५९ रोजी ब्रम्हविद्या मंदिराची स्थापना केली.

## अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ :-

महात्मा गांधींनी ग्रामोद्योगाचे विकेंद्रीत उद्योगाचे जे ध्येय समोर ठेवलेले होते त्यांची प्रेरणा त्यांना रस्किन, टॉलस्टॉय यांच्या तत्वज्ञानातून मिळाली होती. श्रम आणि आश्रम संस्कृती जोपासत त्यांनी ज्या आश्रमांची स्थापना केली ते त्यांचेच द्योतक आहे. त्यांनी विदेशात फिनीक्स आश्रम १९०४, टॉलस्टॉय आश्रम १९१० यांची स्थापना केली. तर भारतात साबरमती (१९१५), सत्याग्रह आश्रम (१९२१) , सेवाग्राम आश्रम (१९३६) यांची स्थापना केली. ग्रामोद्योगाशिवाय खेड्याचे पुनर्निर्माण होणे अशक्य आहे, असे त्यांचे मत होते. आणि म्हणूनच खादी व ग्रामोद्योगाचे कार्य त्यांनी वर्धा येथील जमनालाल बजाज यांच्या बगीच्यातून सुरू केले. या स्थळाला गांधीजी 'मगनवाडी' असे संबोधत. मगनवाडीमधून खादी कार्याव्यतिरिक्त हाताने दळणे, कांडणे, साबण, कागद, तेलघाण्या, ताडगुळ, मातीची भांडी, इत्यादिंचे उत्पादन करून ग्रामाला स्वावलंबी व आत्मनिर्भर करण्यात यावे व त्यांच्यात स्वदेशी वस्तुंबद्दल स्वाभीमान निर्माण करण्यात यावा, हे त्यांच्या विचारांचे सूत्र होते. 'ग्रामोद्योग' हा रचनात्मक कार्यक्रम आहे या त्यांच्या विचारांना लक्षात घेवून मुंबई येथील २६ ऑक्टोंबर १९३४ च्या काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींच्या नेतृत्वात अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ स्थापन करण्याबाबत ठराव पास झाला व त्यानुसार वर्धा येथे मगनवाडीत 'अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ' स्थापन करण्यात आला. अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाच्या स्थापनेमागील उद्देश म्हणजे खेड्यांचे संघटन व पुनर्रचना करून ग्रामोद्योगांना पुनर्जिवीत करणे, उत्तेजित करणे त्यात सुधारणा करणे आणि ग्रामीण जनतेची नैतिक, शारिरीक व आर्थिक प्रगती करणे

होय.  ग्रामोद्योग संघाचे अध्यक्ष महात्मा गांधी होते तर जे.सी. कुमारआप्पा प्रमुख संघटक व सचिव होते. कुमाराप्पा यांचे धाकटे बंधू डॉ. भारतन कुमाराप्पा यांनी ग्रामोद्योगाच्या प्रचार प्रसारासाकरिता मोलाची मदत केली. ''अखिल भारतीय ग्रामोद्योग संघासाठी एक सल्लागार समिती गठीत करण्यात आली. ज्यात रविंद्रनाथा टागोर, सर जे.सी. बोस, सर पी.सी. रे., सी.वी. रमण, प्रा. सॅक हिम्मियम, बॉथम, सर रॉबर्ट गेकरिसन, डॉ. पुरुषोत्तम पटेल. व्ही. पटेल, डॉ. बी.सी. रॉय, डॉ. सुब्बाराव, डॉ. एम. ए. अन्सारी, डॉ. रजब अली- डॉ. जीवराज मेहता, श्री. जी.डी. बिर्ला, जनाब मोहम्मद साहिब, रामदास पंतुलू, श्री. पोचखानवाला इ.''[९]

ग्रामोद्योगाच्या कार्याबरोबर मगनवाडीत कुटीर उद्योग कार्यालाही प्रारंभ झाला. त्यासाठी तेथेच 'उद्योग भवन' स्थापन करण्यात आले. उद्योग भवनच्या प्रवेशद्धारावर शेतकरी व त्यांची पत्नी' कमानीच्या वर बैलाची प्रतिकृती दर्शविली आहे. ग्रामोद्योग भवन चार भागात विभाजित केल्या गेले.

१. अन्न - हाथकुटाई, पिसाई, तेलघाणी, ताडगुळ, मधुमक्षिकापालन

२. वस्त्र - काताई, बुनाई

३. आवास - कुंभारकाम

४. इतर गरजा - साबण, हाथकागद बनविणे, इ.

या सर्व ग्रामोद्योगाचे  शिक्षण घेण्यासाठी देशातील विद्यार्थी येथे येत असत. ग्रामोद्योग भवनामध्ये ग्रामीण तंत्रशास्त्र संग्रहालय (१९३८) ला स्थापन करण्यात आले. या संग्रहालयात वैविध्यपूर्ण व हाताने बनविलेल्या वस्तु ठेवण्यात आल्यात,  की जेणे करून लोकांना ते पाहून, ग्रामोद्योगाच्या कार्याची प्रेरणा मिळावी. गांधीजी म्हणत, ''इस संग्रहालय को खेलखिलौनो का आजायब घर न मानकर इसे खुद की तालीम की एक जिंदा तस्वीर एवं खुली किताब माने।''

पुढे महात्मा  गांधी यांनी  वर्धा प्रमाणेच सेवाग्राम आश्रमातून ग्रामोद्योगाचे कार्य सुरू केले. त्यामध्ये ताडगुड उद्योग, मधुमक्षिका पालन, कताई, बुनाई कार्य, कुंभार काम, हातकुटाई, तांदूळ, गोसेवा इत्यादि.

---

९.  बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास, पृ. १८४, १८५

## १. ताडगुळ उद्योग :-

ताड, शिंदी या झाडांचे जंगले सेवाग्राम परिसरात होते. ताडाच्या झाडापासून परिसरातील लोक ताडी बनवित. लोकांना ताडीच्या व्यसनापासून मुक्त करण्याकरिता महात्मा गांधींनी सरकारकडून विशेष परवानगी घेवून ताडाच्या व शिंदीच्या झाडापासून नीरा (या दोन्ही झाडापासून निर्माण होणारा रस) काढण्यास सुरुवात केली. हा रस अत्यंत मधूर व शरीराकरिता पोषक असतो. हा रस लोकांना विकत घेणे सुलभ व्हावे, म्हणून दोन पैशाला अर्धा रत्तल गोड व ताजी नीरा विकण्यात येई. ऑक्टोंबर ते मार्च या नीरा उद्योगाच्या काळात ४२९६ शेर नीरा काढली जाई. त्याचप्रमाणे ताडाच्या झाडापासून चटया, पंखे आणि झाडणी बनविण्यात येई तसेच ताडापासून गुळ बनविण्याचे कार्य सुरु झाले. ताडाचे झाड हे गाईप्रमाणे विविध उपयोगी आहे. हा विचार बिंबविला.

शिंदीच्या झाडापासून गोड नीरा व नीरेपासून ताडगुळ बनविण्याचा उपक्रम वर्धा परिसरात सुरु झाला. नीरेपासून गुळाचे नवनवे नमुने बनविले जात. ''वर्धा-सेवाग्राम परिसरात कुटिरोद्योगांना पोषक असे मुलभूत संशोधन व प्रयोग करण्यात आले. त्याचा लाभ वर्धा जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता अखिल भारतास झाला.''[१०] किशोरीलाल मश्रुवाला हे 'ग्रामउद्योग' नामक पत्रिकेद्वारे ग्रामोद्योग मंडळाने विकसित केलेले तंत्र व यंत्र यांची माहिती प्रसारित करत असत.

## कुंभार उद्योग :-

मातीची भांडी, विटा व कौले तयार करणे हा कुंभाराचा परंपरागत व्यवसाय आहे. वर्धा येथील मगनवाडीत 'कुंभारकाम' हा ग्रामोद्योग सुरु करण्यात आला. मातीपासून बनविण्यात येणाऱ्या भांड्यांमध्ये विविध प्रकारच्या सुधारणा कशा करता येईल या करिता कुंभाराचे मेळावे आश्रमवासीयांनी आयोजित केलेत. याकरिता डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी १२०० रुपयांची थैली त्या काळात अर्पण केली होती, असा उल्लेख आहे. परिसरातील मांडगांव,

---

१०. चौधरी डॉ. किं. का. - वर्धा जिल्हा गॅझेटियर - पृ. २३९

वाघोली येथील कुंभारकाम करणाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येई. त्यामुळे अशा प्रशिक्षित कुंभारांकडून या व्यवसायात वाढ झाली व कुंभारकाम या ग्रामोद्योगाची भरभराट झाली.

**मधुमक्षिका पालन :-**

कुंभारकाम या ग्रामोद्योगाचे ज्याप्रमाणे नवीन तंत्र मगनवाडी येथे विकसित झाले त्याचप्रमाणे सेवाग्राम येथे मधुमक्षिका पालनाचा व्यवसाय सुरु करण्यात आला. मधमाशी ही फुलातील एक एक थेंब रस गोळा करुन पौष्टिक खाद्य तयार करतात, त्यामुळे त्याची व्यवस्था करणे महत्वाचे आहे. असे गांधीजी म्हणत. सेवाग्राम आश्रमातील पेरुच्या बगीच्यात या उद्योगाला सुरुवात झाली. हा बगीचा पुढे 'मधुशाला' नावाने ओळखला जाई. मधुमक्षिकेचे पोळ पकडणे, लाकडी पेटीत ठेवणे व सहद तयार करणे व नंतर ते विकणे असा कार्यक्रम सुरु होता. त्यामुळे अर्थप्राप्तीचा स्त्रोत मिळाला. परंतु या ग्रामोद्योगाला गावकऱ्यांचे म्हणावे तसे सहकार्य न लाभल्यामुळे हा प्रयोग विशेष प्रसारित झाला नाही. तो फक्त आश्रमापुरता मर्यादित राहीला.

**कताई व बुनाई :-**

ग्रामोद्योगामध्ये कताई व बुनाई कार्य समाविष्ट करण्यात आले. ''कताई कार्यापासून पुरुषांना ६ पैसे व स्त्रियांना ३ पैसे मजूरी मिळत असे. गांधीजींनी आश्रमातील लोकांना १४४ चरखे मोफत वाटलेत.''[११] कताई कार्याद्वारे त्यांच्यात स्वावलंबनवृत्ती व स्वदेशी बद्दल आदर त्यांनी निर्माण केला व आपोआपच लोकांवर 'श्रमप्रतिष्ठेचा संस्कार' बिंबला.

याशिवाय हाताने धान कांडून त्यापासून तांदूळ बनविणे, हात चक्कीचा उपयोग करुन गव्हाचे पीठ तयार करणे, लाकडी बांबूपासून कागद तयार करणे, चामड्यापासून पादत्राणे तयार करणे (याकरिता खास नालवाडी येथे चर्मालयाची स्थापना करण्यात आली) अशा प्रकारचे छोटे ग्रामोद्योग अस्तित्वात आले.

---

११. बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास, पृ. १८७

## गांधी सेवा संघः-

जमनालाल बजाज यांच्या महात्मा गांधींशी समर्पित असणाऱ्या वृत्तीतून व त्यांच्या उदार आश्रयातून जन्माला आलेली एक महत्त्वपूर्ण रचनात्मक संस्था म्हणजे 'गांधी सेवा संघ' होय. महात्मा गांधींच्या अनुयायांना पर्यायाने गांधी विचारांना एक सशक्त व्यासपीठ मिळावे व त्याद्वारे गांधीजींच्या कार्यपद्धतीवर विश्वास असणाऱ्या लोकांसाठी १९२३ ला गांधी सेवा संघ स्थापन करण्यात आला. या सेवा संघाच्या माध्यमातून विविध प्रकारची रचनात्मक कार्ये चालत. या सेवा संघास जमनालाल बजाज यांनी स्थापन करून त्यास फार मोठे वित्तीय बळ प्रदान केले. सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, सी. राजगोपालाचारी, श्रीकृष्णदास जाजू, गंगाधरपंत देशपांडे हे सुद्धा सेवा संघाचे विश्वस्त होते. डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे मार्गदर्शन गांधी सेवा संघास होते. सुरुवातीच्या काळात जमनालाल बजाज गांधी सेवा संघाचे अध्यक्ष होते. पुढे संघाचे उत्तरदायित्व त्यांनी किशोरीलाल मश्रुवाला यांचेकडे सोपविले. या सेवा संघाच्या माध्यमातून गांधी विचारांचा प्रसार झाला.

## अखिल भारतीय चरखा संघ (ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन ):-

'शस्त्राविण स्वातंत्र्य कोणा मिळाले' अशीच धारणा सर्वत्र असण्याच्या काळात तसेच 'अहिंसा ' हे तत्व ज्या भारतभूमीने इतिहास काळापासून गौरविले त्या तत्वप्रणालीनुसार महात्मा गांधींनी भारतीयांसमोर अहिंसक चळवळीचा कार्यक्रम ठेवला व या कार्यक्रमास रचनात्मक कार्याची जोड दिली. स्वराज्याच्या लढाईकरिता स्वावलंबनाची व स्वदेशीच्या भावनेची आणि संघटित स्वरुपाच्या पूर्वतयारीची आवश्यकता आहे, हा विचार दृष्टीसमोर ठेवून खादीनिर्माण व खादीप्रचार यांना त्यांनी स्थान दिले. गांधीजी म्हणत, ''तुम खादी मेरे हाथ पर रक्खो, मै तुम्हारे हाथ पर स्वराज्य रख दूंगा | '' १९२० च्या नागपूर व १९२१ च्या अहमदाबाद येथील काँग्रेस अधिवेशनात दारुबंदी, खादीप्रचार इत्यादी कार्यक्रम मान्य करण्यात आले. महात्मा गांधींच्या खादी निर्माण व खादी प्रसाराच्या कार्याला प्रत्यक्षात उतरविणारी व आपले जीवन त्या कार्याला समर्पित करणारी जी काही मंडळी आहेत. त्यात वर्धा येथील सेठ श्रीकृष्णदास जाजू, सेठ जमनालाल बजाज यांचा विशेषत्वाने उल्लेख करणे

आवश्यक ठरेल. असहकार आंदोलनाच्या काळात जमनालाल बजाज यांनी खादीप्रचार केला. एप्रिल १९२१ मध्ये कॉंग्रेस महासमितीने देशात २० लाख चरखे चालविण्याचा संकल्प केलेला होता. देशातील छोट्यास छोट्या खेड्यांपार्यत हे चरखे वितरित व्हावे, असे ठरले.

चरख्याच्या प्रत्येक तारात शांती, सद्भाव आणि प्रेमाची भावना भरलेली आहे. चरखा हे युद्धाचे नसून शांतीचे प्रतिक आहे. सूत कातण्याची प्रक्रिया तपस्या किंवा यज्ञ आहे. या यज्ञाने स्वावलंबी वृत्ती वाढते असे मत वेळोवेळी महात्मा गांधींनी व्यक्त केले आणि या रचनात्मक कार्याची सांगड स्वातंत्र्य आंदोलनाशी घातली. खादी प्रसाराच्या कार्यात बृहत् बजाज परिवाराने बजावलेली भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरली. आपले चातुर्य, संघटन कौशल्य, धनशक्ती, समयशक्ती सर्व काही पणाला लावून खादी प्रचाराचे कार्य वर्धा जिल्हयाने केले. खादी प्रसाराकरिता जमनालाल बजाज यांनी सर्वत्र प्रचारयात्रा केल्यात. 'खादी जगत' नावाच्या पत्रिकेद्वारे खादीचा प्रसार केला जाई. खादी कार्यासाठी सप्टेंबर १९३७ मध्ये कॉंग्रेसच्या महासमितीने एक बैठक आयोजित केली. या बैठकीत अखिल भारतीय चरखा संघ स्थापन करण्यात यावा यावर चर्चा करण्यात आली. त्याप्रमाणे ८ नोव्हेंबर १९३७ ला चरखा संघ स्थापन झाला. कार्यकारिणीमध्ये ''महात्मा गांधी (अध्यक्ष), मौलाना शौकत अली, डॉ. राजेंद्रप्रसाद, सतीशचंद्र दासगुप्ता, मगनलाल गांधी, जमनालाल बजाज (कोषाध्यक्ष), स्वाईब कुरेशी, शंकरलाल बैकर, जवाहरलाल नेहरू यांचा समावेश होता. सुरुवातीला चरखा संघाचे मंत्री शंकरलाल बैकर असल्याने संघाचे कार्यालय अहमदाबाद येथे होते. १९४१ मध्ये मंत्री श्रीकृष्णदास जाजू झाले त्यामुळे हे कार्यालय वर्धा येथे बजाजवाडीत आणण्यात आले.'' [१२]

चरखा संघाचे मुख्य कार्यालय बिहारमध्ये स्थापन करण्यात यावे, असे डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे मत होते- परंतु या कार्याकरिता वर्धा-सेवाग्राम ऐवजी अधिक सुंदर स्थान दुसरे असूच शकत नाही असे गांधीजींनी स्पष्ट केले. त्यामुळे ते कार्यालय वर्धा येथेच होते. अखिल भारतीय चरखा संघाच्या अनेक प्रांतिक शाखा देखिल होत्या. त्यातील महाराष्ट्र शाखा

---

१२. जाजू, श्रीकृष्णदास, अ.भा. चरखा संघ, इतिहास, पृ. १०६

वर्धा येथेच होती परंतु नंतर शाखेचे चंद्रपूर जिल्हयातील 'मूल' येथे स्थलांतर करण्यात आले. चरखा संघ ही खादी निर्माणामध्ये कार्यरत असणारी सेवाभावी संस्था होती. या संस्थेने खेड्यापाड्यांमध्ये खादीचे महत्व रुजविण्याचे कार्य  वर्धा परिसरातील लोकांनी केले. सुरुवातीच्या काळात हिंदुस्थानी तालीम संघ मध्ये चरखा संघाचे कामकाज चालत असे. १९४२ मध्ये चरखा संघाची स्वतंत्र इमारत उभारण्यात आली. चरखा संघाच्या अंतर्भूत १ऑगस्ट १९४१ ला लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथी दिनाचे औचित्यसाधून खादी विद्यालय स्थापन करण्यात आले. विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या निवासाची व शिक्षणाची सोय करण्यात आली. ''चरखा संघाच्या शिक्षण समितीने खादीनिर्माणाचे योग्य शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे, याकरिता उपयुक्त पाठ्यक्रम तयार केला. त्यात खादी प्रथमा, खादी मध्यमा आणि खादी विशारदचे पाठ्यक्रम होते.''[१३]

खादी निर्माणाकरिता कताई व बुनाईकरिता लोकांना चरखा संघाने वेळोवेळी प्रेरित केले. खादी निर्माण करणाऱ्या गरीब लोकांना चरखा संघाने चार कोटी रुपये मजूरीपोटी वितरित केले. अशा  या सेवाभावी संस्थांकडून पाच लाख रुपयांची वसुली सरकारने केली. तेव्हा या प्रकरणी महात्मा गांधींनी व्हॉईसरॉय लिनथिनगो यांना पत्र लिहून दाद मागितली. तेव्हा लिनथिनगो यांनी ती फेटाळून लावली. चरखा संघाच्या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू खेडी होता. त्याकरिता सेवाग्राम येथे 'विणकर विभाग' सुरु केला. 'खादी जगत' या पत्रिकेतून खादीविषयक लेख प्रकाशित करण्यात येत. म्हणून सरकारने या पत्रिकेवर नियंत्रण प्रस्थापित केले. सेवाग्राम  येथेही चरखा संघाचे कार्य चालत असे. या संघातील कार्यकर्त्यांनी १९४२ च्या छोडो भारत आंदोलनात सहभाग घेतला. आजही वर्धा - सेवाग्राममध्ये 'सूतकताईचे' काम बघायला मिळते. सेवाग्राम, वर्धा येथे त्या काळात उभारण्यात आलेल्या खरखा संघाच्या इमारती त्या कार्याची साक्ष देतात. २ ऑक्टोंबर हा महात्मा गांधींचा जन्मदिवस 'चरखा जयंती' म्हणून सेवाग्राम येथे संपन्न केला जाई. आजसुद्धा सेवाग्रामच्या चरखा संघातून खादी संशोधन सुरु आहे.

---

१३.   सहस्त्रबुद्धे, अ. वा. (प्रकाशक) सेवाग्राम रचनात्मक संस्था, पृ. २१

## हिंदूस्थानी तालीम संघः-

लॉर्ड मेकॉले प्रणित शैक्षणिक योजनेद्वारे तसेच १८५४ च्या वुडच्या शिफारसीनुसार भारतात इंग्रजी माध्यमातून शिक्षणाला सुरुवात झाली. तसेच हंटर कमिशनने सुद्धा अनेक बदल शिक्षणपद्धतीत घडवून आणलेत. त्यामुळे भारतात राष्ट्रीय शिक्षणाबद्दल अनास्था निर्माण झाली. परंतु भारतात ज्यावेळी २० व्या शतकाच्या प्रारंभी राष्ट्रवाद प्रबळ झाला त्यावेळी राष्ट्रीय शिक्षणावर भर देण्यात आला.लोकमान्य टिळकांनी आपल्या चतुःसुत्रीद्वारे कार्यक्रमात राष्ट्रीय शिक्षणावर भर दिला. असहकार चळवळीदरम्यान वर्धा जिल्ह्यात सरकारी शिक्षणसंस्थांवर व्यापक प्रमाणात बहिष्कार घालण्यात आला. १९३७ च्या निवडणूक जाहीरनाम्यात ग्रामीण भागात शिक्षण प्रसारावर भर देण्यात आला. ''महात्मा गांधी म्हणत, योग्य शिक्षण पद्धती त्यालाच म्हणता येईल की, ज्यामुळे बालकांच्या बौद्धिक, शारीरिक शक्तीचा विकास व आत्म्यातील गुणांचा सर्वांगिण विकास होईल व तो तेजस्वी बनेल.''

दि. २२ व २३ ऑक्टोंबर १९३७ ला नवभारत विद्यालय वर्धा येथे राष्ट्रीय शिक्षा सम्मेलनात त्यांनी शिक्षणाबाबत आपली मते प्रदर्शित केली.

१. मूलभूत शिक्षण एखाद्या व्यवसायाशी जोडले जावे.

२. मुलोद्योगातून विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचा मार्ग खुला करण्यात यावा. या कल्पनांचा शास्त्रीय पद्धतीने अवलंब करण्यासाठी झाकीर हुसेन समिती नेमण्यात आली. या समितीने जो अभ्यासक्रम तयार केला त्यास ' नई तालीम' असे नाव देण्यात आले.'' [१४] या झाकीर हुसेन समितीमध्ये डॉ. झाकीर हुसैन, आर्यनायकम, आशादेवी आर्यनायकम, विनोबा भावे, काकासाहेब कालेलकर, किशोरीलाल मश्रुवाला, जे.सी. कुमाराप्पा, श्रीकृष्णदास जाजू यांचा समावेश होता. नयी तालीमच्या प्रत्यक्ष प्रयोगाला सेवाग्राम' येथून प्रारंभ झाला. त्याचे मुख्य कार्यालय 'सेवाग्राम' येथे स्थापन करण्यात आले. नयी तालीम पद्धती शिक्षणविकासाच्या दृष्टीने पुढे टाकलेले एक क्रांतीकारी पाऊल होते.

---

१४. चौधरी डॉ. किं. का. - वर्धा जिल्हा गॅझेटियर - पृ. ४४२

या शिक्षण पद्धतीचा अखिल भारतीय प्रचार करण्यासाठी सेवाग्राम येथे 'हिंदूस्थानी तालीम संघ' स्थापन करण्यात आला. श्रेष्ठ गांधीवादी आर्यनायकम व त्यांच्या पत्नी आशादेवी आर्यनायकम यांनी शेवटपर्यंत निष्ठापूर्वक कार्य केले. नयी तालीमची 'विद्यामंदीर स्कूल' ही पहिली संस्था 'वर्धा' येथे स्थापन झाली. तर सेवाग्राममध्ये 'आनंदनिकेतन' ही ईमारत शाळेसाठी उपयोगात आणली. यात सात ते चौदा वर्षाखालील बालकांनाच प्रवेश होता. जसजसा तालीम संघाचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत जात होता त्यामुळे जागेची कमतरता भासू लागली. त्यावेळी जमनालाल बजाज यांनी आपल्या आठ एकर जमिनीचे दानपत्र तालीम संघास दिले. विद्यार्थ्यांना गणित, भाषा, नागरिकत्व या विषयाव्यतिरिक्त सुतकताई, रुई पिंजणे, शेतीविषयक ज्ञान, ग्राम सफाई, अरोग्य विषयक ज्ञान दिले जात असे. त्याचप्रमाणे विधवा स्त्रियांना विविध प्रकारचे जीवनोपयोगी प्रशिक्षण तर लहान बालकांना खेळता खेळता शिक्षण दिले जाई.

परंपरागत शिक्षण व बुनियादी शिक्षण यांची सांगड घालून जर शिक्षण दिले तर विद्यार्थ्यांचा विकास होईल. या मुख्य उद्देशाने सुरू करण्यात आलेली पद्धती 'सेगाव' पद्धती (वर्धा पद्धती) म्हणून प्रसिद्ध आहे.

**सेगाव पद्धती (वर्धा पद्धती) उद्देश :-**

''१. विद्यार्थ्याला व्यवहारात व कुटुंबात एक जबाबदार स्थान मिळविण्याच्या लायकीचा बनविणे.

२. सामाजिक जीवनाच्या कर्तव्यात सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.

३. इतिहास, गणित, भूगोल, भौतिक आणि सामाजिक शास्त्र या विषयांच्या शिक्षणासोबत व्यवसायाचे शिक्षणाची तालीम देणे.

४. शरीरश्रमाप्रती ते काम भंग्याचे जरी असेल तरी कामाप्रती आदरभाव निर्माण करणे.''[१५]

नयी तालीमच्या उद्देशानुसार वर्धा पद्धती 'जीवनासाठी शिक्षण आणि जीवनाद्वारे शिक्षण' याप्रमाणे होती. विद्यार्थी या ठिकाणी जीवनाचे आदर्शपाठ गिरवित होते.

१५. बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास, पृ. १८०

पुस्तकी शिक्षणाबरोबरच जीवनापयोगी व व्यावहारिक शिक्षण येथे मिळत होते. वर्धा जिल्हयाबाहेरचे विद्यार्थीही येथे शिक्षण घेण्यासाठी येत. पुढे नयी तालीम संघाचे कार्य सर्व सेवा संघाने आपल्याकडे घेतले. आर्यनायकम व त्यांच्या पत्नी आशादेवी आर्यनायकम यांच्या मृत्यूनंतर संघाच्या कार्यात शिथीलता आली. परंतु या नयी तालीमचे विविध फायदे दृष्टीआड करता येणार नाही. महात्म गांधींनी जो खालील उद्देश नजरेसमोर ठेवून हा कार्यक्रम बनविला तो वर्धा येथे पूर्णत्वास नेला. नयी तालीमच्या प्रशिक्षणार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले होते.

''The aim of Basic Education was not to train spinners and weavers, but to develop the personality of students through productive work.''

निश्चितच हा उद्देश नयी तालीमच्या शिक्षा पद्धतीतून विकसित झाला.

## अस्पृश्यता निवारण :-

'अस्पृश्यता' हा भारतीय समाजाला लागलेला फार मोठा 'कलंक' आहे. जोपर्यंत भारतीय समाजातील स्पृश्य-अस्पृश्य दरी मिटणार नाही तोपर्यंत समाजात ऐक्य प्रस्थापित होणार नाही. देश परतंत्र अवस्थेत असतांना अनेक समाजसुधारकांनी अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाला स्वराज्यप्राप्तीच्या प्रश्नापेक्षाही प्राधान्य देवून कार्य केले. महाराष्ट्राच्या संदर्भात विचार करू जाता विष्णुबुवा ब्रम्हचारी, महादेवशास्त्री कोल्हटकर, महात्मा फुले, न्या. रानडे, कर्मवीर वि.रा. शिंदे, डॉ. भांडारकर, पुढे बाबासाहेब आंबेडकर यांच्याच कार्यापासून स्फूर्ती घेवून विदर्भामध्ये वामनराव कोल्हटकर, गंगाधरराव चिटणीस, रंगनाथ मुधोळकर, मोरोपंत जोशी, किसन फागुजी बनसोड अशा अनेकांनी या क्षेत्रात कार्य केले. परंतु समाजामध्ये खोलवर रुजलेल्या या समस्येचे म्हणावे त्या प्रमाणात निराकरण होवू शकले नाही. १९२० च्या असहकाराच्या ठरावातील एक ठराव 'अस्पृश्यता निवारणा'संबंधीचा होता. त्यापूर्वी सामाजिक सुधारणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले होते. ''१९१७पासून आपली भूमिका बदलून पददलितांवर रुढीनुसार लादण्यात आलेली बंधने नष्ट करण्याची गरज रास्त आणि न्यायपूर्व असल्याचा दावा संमत केला. राष्ट्रीय नेत्यांपैकी गांधीजींनी अस्पृश्यता निवारणाला सर्वोच्च स्थान दिले.''[१६]

---

१६. बिपीनचंद्र (मुळ लेखक) -मराठी अनुवाद डॉ. काळे, इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डन्स, पृ. २६२

## वर्धा येथील अस्पृश्यता निवारणाचे कार्य :-

महात्मा गांधींनी वेळोवेळी अस्पृश्यता निवारणाकरिता काय करावे, याबाबत लोकांना समर्पक असे मार्गदर्शन केले. अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न स्वराज्यापेक्षाही मोठा आहे, असे ते म्हणत. त्यामुळे त्यांचे निवारण खालील दिशानुसार करावे.

''१. सार्वजनिक शाळा, मंदिर व रस्ते खुले करावेत.

२. अस्पृश्यांच्या मुलांकरिता शाळा काढून मद्यपान बंद करावे.

३. त्यांच्याकरिता स्वतंत्र मंदिर व शाळा बांधणे.

४. स्पृश्य व अस्पृश्य यांचा संबंध ब्राह्मण व ब्राह्मणेतरांसारखा असावा. रोटी-बेटी व्यवहार करणे अस्पृश्यता निवारणाचे अंग नाही.

५. सर्व जाती नाहीशा करून फक्त चारच वर्ण असावे. ''[१७]

याकरिता महात्मा गांधींनी सर्वत्र प्रचार यांत्रा केल्यात. परंतु वर्धा जिल्ह्यामध्ये त्यांच्या या प्रचारयात्रा सुरू होण्यापूर्वीच अस्पृश्यता निवारणाचे कार्य जोमाने सुरु होते. असहकार आंदोलनाच्या काळात जमनालाल बजाज यांनी वर्धा येथील मारवाडी विद्यार्थी गृह व मारवाडी हायस्कूल हरिजन विद्यार्थ्यांकरिता खुले केले व अस्पृश्यता निवारणाचा प्रयत्न केला. त्यावेळी मारवाडी समाजबांधवांनी विरोध दर्शविला. पण जमनालाल बजाज आपल्या विचारांवर दृढ राहिलेत. याचवेळी हिंगणघाट येथे हरिजनांकरिता 'स्वतंत्र वस्तीगृह' बांधण्यात आले. त्यात सात विद्यार्थी निवासी होते.त्यांनी सार्वजनिक संस्था, स्वयंसेवी संस्था, व्यापारी मंडळाचे संचालक, नातलग, आप्तस्वकीय, मित्रपरिवार यांच्याशी पत्रव्यवहार करून अस्पृश्यता निवारणासंबंधी आवाहन केले. ठिकठिकाणी भेटी देवून शाळा, दवाखाने, तलाव, खानावळी सर्व लोकांकरिता खुले असावे, असे निवेदन दिले. वर्धा येथील बच्छराज धर्मशाळेची विहीर हरिजनांकरिता खुली केली. इतकेच नव्हे तर हरिजनांच्या पंक्तीत अन्नग्रहणसुद्धा केले. महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम उचलून घरला म्हणूनच नव्हे तर जमनालाल बजाज

---

१७. बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास, पृ. १८९

यांनी आपल्या अंतःप्रेरणेने हे कार्य केले. यासंदर्भात स्वतः गांधीजी लिहितात, ''अछुतोद्धार की यह भावना और संप्रदाय के प्रति भावनात्मक स्वतंत्रता तथा उसी तरह सभी धर्मो के प्रति आदर की जमनालाल में मेरे ही कारण है यह कहना गलत है। अपना विश्वास इस तरह दुसरो पर लादना किसी के लिए भी बिलकूल असंभव ही है। उनके मन में उपरोक्त विश्वास मुझसे मिलने से पहले से ही थे॥ '' [१८]

## लक्ष्मीनारायण मंदिर (हरिजनांचा मंदिर प्रवेश १९ जुले १९२८)

गांधीजींना अभिप्रेत असणारी समाजसुधारणा करण्याचे धैर्य त्यांचे 'पाचवे पूत्र' जमनालाल बजाज यांनी दाखविले. वर्धेतील लक्ष्मीनारायण मंदिर हे बजाज कुटुंबाच्या मालकीचे होते. या मंदिरात हरिजनांना प्रवेश नव्हता. हे मंदिर जमनालाल यांनी हरिजनांकरिता खुले करण्याचे ठरविले. आणि मंदिराच्या विश्वस्तांसमोर हा प्रस्ताव ठेवला. प्रथमतः विश्वस्तांनी हा प्रस्ताव बहुमताने नाकारला. परंतु जमनालालजींचा दृढसंकल्प पाहून अंती देवस्थानच्या विश्वस्तांनी हरिजनांच्या मंदिरप्रवेशाचा ठराव मान्य केला. याप्रमाणे १९ जुलै १९२८ रोजी वैदिक मंत्राच्या जयघोषात विनोबा भावे यांनी ४००० हरिजनांना सोबत घेवून मंदिरात प्रवेश केला. अस्पृश्यांच्या जीवनातील व वर्ध्यांच्या इतिहासातील हा एक अपूर्व क्षण होता. जमनालाल बजाज व त्यांच्या सहकाऱ्यांनी अस्पृश्यता निवारणासंबंधी उचललेले हे पाऊल अतिशय कौतुकास्पद होते. त्याबद्दल महात्मा गांधींनी त्यांचे अभिनंदन केले व याचे सर्वांनी अनुकरण करावे, असे आवाहन केले.

हरिजनांकरिता खुले केलेले हे मंदिर देशातील पहिले हरिजनांसाठी खुले केलेले मंदिर असावे, असे मत भ.ग. बापट यांनी आपल्या पुस्तकात नमूद केले आहे. तसेच वर्धा जिल्हा गॅझेटिरमध्ये नमूद आहे. अशाप्रकारे या घटनेला केवळ धार्मिक महत्व नसून धर्मसुधारणा व अस्पृश्योद्धार या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व आहे. '' जमनालाल बजाज यांच्या नेतृत्वात वर्धा शहरात राम मंदिरांसह ३ मंदिरे हिंगणघाट मध्ये ता. २३-९-१९१९ रोजी एक मंदिर खुले

---

१८. श्रीमन्नारायण-आधुनिक भारत के निर्माता- जमनालाल बजाज पृ. ५८

करण्यात आले. राधाकृष्णन यांनी हिंगणघाट मध्ये १० लहान मोठे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. १७-१-१९३४ ला सुरगाव, सेलू, पवनार, नालवाडी, सिंदी येथील मंदिरे खुली करण्यात आली. धनोडी येथे नरकेसरी अभ्यंकर यांनी अस्पृश्यांना आपल्या देवघरात, सार्वजनिक मंदिरात प्रवेश दिला. त्यावेळी लोकांनी अभ्यंकर घराण्याला बहिष्कृत केले. देवळी येथे संत पंडितांनी अस्पृश्यासाठी मंदिर खुले करण्यास विरोध केला.'' [१९]

## सार्वजनिक विहीरी हरिजनांकरिता खुल्या :-

हरिजनांच्या मंदिर प्रवेशाबरोबरच सार्वजनिक विहिरी हरिजनांकरिता खुल्या करण्यात आल्या. वर्धा जिल्ह्यातील १२५ गावांमध्ये फिरून नागपूरातील विद्यार्थ्यांनी ११५ विहिरी, हिंगणघाट येथे ३५ विहिरी हरिजनांकरीता खुल्या करण्यात आल्या. तर मीराबहन व जमनालाल बजाज यांच्या उपस्थितीत खरांगणा परिसरातील पाच विहिरी खुल्या करण्यात आल्या. नरकेसरी अभ्यंकर यांनी हरिजनांसोबत सहभोजन घेवून आपल्या विहिरीतून पाणी काढण्याची त्यांना परवानगी दिली.

वर्धा जिल्ह्यात अस्पृश्यता निवारणासंबंधी हे सर्व कार्य सुरू होते. या कार्याला अधिकच वेग आला ज्यावेळी महात्मा गांधी वर्धा-सेवाग्रामला येवून राहू लागलेत. महात्मा गांधींनी इंगजी साप्ताहिक 'हरिजन' सुरु केले. व त्या साप्ताहिकाध्ये अस्पृश्यता निवारणासंबंधी लेख लिहिलेत. २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर १९३३ हा 'अस्पृश्यता निवारण सप्ताह' पाळण्यात आला. ७ नोव्हेंबर १९३३ पासून अस्पृश्यता निवारणाकरिता ' विदर्भ दौरा' करण्याचे ठरले. या प्रचार यात्रेचा शुभारंभ त्यांनी 'वर्धा' येथून केला. त्यावेळी ते म्हणाले, '' I work it also to the centre of this movement''

## अस्पृश्यता निवारणासंदर्भात प्रचारयात्रा :-

अस्पृश्यता निवारणासंबंधीचा प्रचार करण्याकरिता महात्मा गांधींनी सर्व विदर्भात आपल्या अनुयायांसह प्रचारयात्रा केल्यात. वर्धा जिल्हयातील वर्धा, हिंगणघाट, सेलू,

१९. बैस डॉ. वीरेन्द्र - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्यआंदोलनाचा इतिहास, पृ. १९०

देवळी, आर्वी, आष्टी येथे प्रत्यक्ष भेट दिली. या प्रचारयात्रेदरम्यान त्यांना भरपूर लोकांनी सढळ हाताने व मनाने मदत केली. यासंदर्भात एक उदाहरण महात्मा गांधींनी १७/११/१९३३ च्या 'हरिजन' मधील लेखात नमूद केले. ते लिहितात, ''धनोडी येथील नरकेसरी अभ्यंकरांच्या पत्नीने दोन सोन्याच्या बांगड्या अस्पृश्यता निवारण निधीसाठी समर्पित केल्या. त्यावेळी माझ्या हृदयावर या घटनेचा विलक्षण प्रभाव पडला. ''I have steeled my heart, and I do not shed tear easily but these words could not move me.''[२०]

## सेवाग्राम आश्रमातील अस्पृश्यता निवारणाचे कार्य :-

३० एप्रिल १९३६ रोजी महात्मा गांधी वर्ध्याजवळील 'सेगांव' येथे राहण्याकरिता आले. त्यावेळी काशीराव पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. त्यावेळी गांधीजींनी परिसरातील लोकांसमोर मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, ''मै आपके गाव आ गया हूँ, आप लोगोंकी सेवा की दृष्टीसे अस्पृश्यता निवारण को मैने अपने जीवन का ध्येय बना लिया है।'' त्यावेळी काशीराव पाटील यांनी आपण हरिजनांसोबत कार्य करणार नाही, असे स्पष्टीकरण केले. म्हणजेच येथील लोकांच्या मनावर जातीव्यवस्थेचा पगडा होता हे लक्षात येते. परंतु गांधीजींनी येथील लोकांना जातीजातीमधील मतभेद संपुष्टात आणण्याची प्रेरणा दिली. परिसरातील जालमसिंह छत्रे, बापुराव देशमुख, गोपाळराव शिनगारे, दशरथ गवई, बंकिम ताकसांडे या सर्व जातींतील तरुणांना एकत्रित केले. या तरुणांनी 'स्पेशल क्लब' स्थापन करुन गणपती उत्सव साजरा केला. स्पेशल क्लबच्या या तरुणांनी लिबाशा मांग यास विठोबा मंदिरामध्ये व हरिजनांना दत्त मंदिरात प्रवेश मिळवून दिला. तर बांकेलाल नावाच्या भंग्याच्या हस्ते परिसरातील सार्वजनिक विहिरींचे पाणी काढून त्या विहिरी अस्पृश्यांकरिता खुल्या केल्यात.

कुष्ठरोगाने पिडीत असणाऱ्या संस्कृत पंडित परचुरे शास्त्री यांना सेवाग्राम आश्रमात राहण्याची मान्यता देवून समाजाकडून दुर्लक्षित असणाऱ्या लोकांना स्वीकारण्याची प्रेरणा म. गांधींनी परिसरातील लोकांना दिली. महात्मा गांधी, जमनालाल बजाज आणि विनोबा

---

२०. हरिजन ता. १७/११/१९३३ ,पृ. १९४

भावे यांच्या प्रेरणेने वर्धा जिल्हयात रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अस्पृश्यता निवारणाचा जो कार्यक्रम सेवाग्राम आश्रमातून राबविला, त्याकरिता जे कार्य झाले त्याला बहुतांश प्रमाणात यश लाभले. अस्पृश्य लोकांना विभिन्न कामांमध्ये सामावून घेतले. या संदर्भात अमेरिकन पत्र पंडित लुईफिशर की, ज्यांनी एक आठवडा गांधीजींच्या सान्निध्यात आश्रमात घालविला. ते लिहितात, ''आश्रमातील बहुतेक सर्व काम अस्पृश्यांच्या वतीने केली जात आहे आणि जो हिंदू या आश्रमात येईल त्यालाही अस्पृश्यांच्या हातचे अन्न खावे लागणार व त्यांच्या सान्निध्यात राहिले पााहिजे असा निर्बंध होता.'' [२१]

ग्रामसफाई, ग्रामीण स्वच्छता व आरोग्याचा कार्यक्रम हाती घेवून वर्धा जिल्यामध्ये अस्पृश्यता निवारणाचे कार्य मोठ्या प्रमाणात झाले.

## गोसेवा संघ :-

ऑक्टोंबर १९४१ ला ' गोसेवा संघा'ची स्थापना करण्यात आली. गांधीजींच्या दृष्टीने गोसेवा हा एक सिद्धांत होता. गोसेवा या कार्यक्रमात गाईला कसायाच्या हातून वाचविणे इतकाच मर्यादित अर्थ नव्हता तर तिची सेवा करणे हा होता, आणि म्हणूनच 'गोरक्षा' या शब्दाऐवजी 'गोसेवा' हा शब्द वापरण्यात आला. नालवाडीतील गोपुरी या ठिकाणाहून गोसेवेचे कार्य चालत असे. गोसेवा संघाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे होते.'' The institution functining from Gopuri is the all India Krishi Goseva Sangh. The Sangh was engaged in developing a dual purpose cow which is useful both for the bullocks as well as for milk and other product. ''[२२]

प्राणीसृष्टीची प्रतिनिधी गाय. अशा गायीचे महत्व सर्वांपर्यंत पोहचावे या उद्देशाने जानेवारी १९४२ ला विनोबा भावे यांच्या अध्यक्षतेखाली गोपुरी' येथे 'अखिल भारतीय गोसेवा संमेलना'चे आयोजन करण्यात आले. या संमेलनाचे उद्घाटक महात्मा गांधी तर प्रमुख अतिथी पंडित मदनमोहन मालवीय हे होते. तर मार्गदर्शक प्रसिद्ध विशेषज्ञ सरदार

२१. लुई फिशर (अनुवाद- अंत्यबोध हुदलीकर) गांधीजींच्या सहवासात एक आठवडा ,पृ. ५४
२२. Sevagram Ashram Pustika ,पृ. ३०

दातारसिंह हे होते. या संमेलनात गायीचे व तिच्या दुधाचे महत्व प्रतिपादन करण्यात आले. तसेच यावेळी दातारसिंह यांनी गोशाळांचे पुनर्संगठण व्हावे असा विचार मांडून गायीचे दुधापासून तयार होणारे तूप व वनस्पती तूप यातील अंतर निश्चित होण्याकरिता वनस्पती तुपात एखादे रंगद्रव्य असावे, असा विचार व्यक्त केला.

सेवाग्राम आश्रमातही गोशाळा स्थापन करण्यात आली. तेथे बलवंतसिंह, विजयबहन पटेल व डॉ. सुशीला नायर गोशाळेचे कामकाज पाहत असत. गोसेवा हे या सर्व लोकांनी स्वीकारलेले व्रत होते. हा गोसेवा संघ उत्तरोत्तर प्रगतीपथावर गेला.

**राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा :-**

देशाला एकतेच्या व अखंडतेच्या सूत्रात बांधण्याकरिता कोणतीही एक 'राष्ट्रभाषा' असणे अनिवार्य आहे व अशी राष्ट्रीय एकता व अखंडता निर्माण करण्याचे सामर्थ्य 'हिंदी' भाषेत आहे, असे महात्मा गांधीचे स्पष्ट मत होते. १९१८ मध्ये इंदोर येथे हिंदी साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले. या अधिवेशनात त्यांनी हिंदीला 'राष्ट्रभाषा' बनविण्यात यावे, असा आग्रह धरला. १९३६ च्या नागपूर येथील अधिवेशनानंतर हिंदी साहित्य संमेलनावेळी १५ सदस्यांनी 'हिंदी प्रचार समिती' स्थापन करण्याचा प्रस्ताव मान्य झाला. १९३७ ला समिती स्थापन करण्यात आली. तिला पुढे 'राष्ट्रभाषा प्रचार समिती' असे नाव प्राप्त झाले. समितीद्वारे 'राष्ट्रभाषा अध्यापन केंद्र' वर्धा येथे स्थापन करण्यात आले. ''या समितीद्वारा 'सबकी बोली' हे मुखपत्र चालविले. त्याचे १९५० मध्ये 'राष्ट्रभाषा' असे नामकरण करण्यात आले. आजही राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या माध्यमातून चार हजार केंद्रातून आठ हजार कार्यकर्ते प्रचार कार्य करतात.'' [२३]

याशिवाय अनेक धर्मादाय संस्था वर्ध्यात स्थित आहेत. कस्तुरबा हेल्थ सोसायटी, सेवाग्राम, महिलाश्रम, वर्धा, महारोगी सेवा समिती, दत्तपूर, गांधी मेमोरियल लेप्रसी फाउंडेशन वर्धा, मारवाडी शिक्षा मंडळ वर्धा या सर्व संस्थांच्या माध्यमातून जिल्हयात आजही मोठ्या प्रमाणात कार्य सुरू आहे.

२३. चौधरी डॉ. किं. का. - वर्धा जिल्हा गॅझेटियर - पृ. ४६८

## वर्धा जिल्ह्यातील भूदान चळवळ :-

समाजात प्रचलित असणारी आर्थिक विषमता ही शोषणावर आधारलेली आहे. त्यामुळे ही विषमता नष्ट करण्यासाठी योग्य शिक्षणाद्वारे लोकांचे मतपरिवर्तन करण्यासाठी सर्वोदय कार्यक्रम हाती घेतला. 'सर्वोदय' म्हणजे जो समाज शोषणविरहित असेल व जेथे सर्वांचा अभ्युदय होईल. त्यातूनच भूदान कार्य हाती घेतल्या गेले. भूमीपतींनी त्यांच्या जमिनीचा काही भाग भूमीहिनांच्या पुनर्वसनासाठी द्यावा, की, जेणे करून भूमीपती व भूमीहिन यांच्यातील 'आर्थिक विषमता' दूर होण्यास मदत होईल. ही भूदान चळवळ विनोबा भावे यांनी अतिशय सक्षमपणे चालविली. ''भूदान यज्ञातील पहिले दान आंध्र प्रदेशाच्या तेलंगण भागातील पोचमपल्ली येथील रामचंद्र रेड्डी यांनी केले. विनोबा भावे यांनी वर्धा येथूनच या भूदान चळवळीस सुरुवात केली. त्यांनी देशातील विविध प्रांतामध्ये पदयात्रा करुन लाखो एकर भूमी प्राप्त केली. १९५१ ते १९५७ या कालखंडात त्यांनी भारतातून ४३,८१,८७१ एकर जमीन प्राप्त केली'' [२४] चळवळीच्या दुसऱ्या कालखंडात म्हणजे १९५८ पासून पुढे मात्र भूदानात घट झाली. भूदान आंदोलनास ग्रामदानाचे स्वरुप प्राप्त झाले.

वर्धा जिल्हा ही विनोबा भावे यांची कर्मभूमी होती. त्यामुळे 'भूदान' चळवळीचा प्रभावीपणे प्रसार होणे क्रमप्राप्त होते. ''महाराष्ट्रातील जिल्हयांपैकी यवतमाळ व वर्धा जिल्हयामध्ये भूदान व्यापक प्रमाणावर झाले. या दोन जिल्हयातील दिलेले भूदान विदर्भातील आठ जिल्हयातील दात्यांनी दिलेल्या जमीनीच्या ६३.७६ टक्के होते. वर्धा जिल्हयामध्ये १२,५४७.४० एकर जमीन भूदान यज्ञाखाली प्राप्त झाली होती'' [२५] अशा प्रकारे भूदान आंदोलनात वर्धा जिल्याची भूमिका अत्यंत महत्वपूर्व ठरली.

वर्धा जिल्ह्यामध्ये आधुनिक काळातील विशेषतः स्वातंत्र्य संग्रामाच्या काळातील इतिहासाचा समृद्ध वारसा व रचनात्मक कार्याच्या पाऊलखुणा आढळतात.

---

२४. कित्ता, पृ. १०५

२५. नानेकर , खांदेवाले - विदर्भातील भूदान (नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर १९७०) पृ. २-५

महात्मा गांधी, विनोबा भावे, जमनालाल बजाज यांच्या प्रेरणांमुळे अखिल भारतीय पातळीवर विधायक कार्य करणाऱ्या अनेक गांधीवादी संस्था वर्धा येथे उदयास आल्यात. त्यांनी विविध प्रकारचे रचनात्मक कार्य केले. विविध धर्मादाय संस्था वर्धा येथे स्थापन झाल्यात. सेवाग्राम, नालवाडी, पवनार आश्रमाप्रमाणेच विश्वशांतीस्तुप, गीताई मंदिर, हुतात्मा स्मारक आष्टी, लोकमान्य वाचनालय आर्वी, बजाजवाडी चा उल्लेख करावा लागेल. या सर्वांनी वर्धा जिल्हयाचे स्थान निश्चितच श्रेष्ठ केले आहे.

**प्रकरण - ६**

# निष्कर्ष

भारताच्या इतिहासातील ‘स्वातंत्र्यलढा’ हे एक तेजस्वी क्रांतीपर्व होय. आधुनिक जगाच्या इतिहासातील सर्वाधिक मोठी चळवळ होती. या चळवळीने सर्व वर्गाच्या आणि विचारप्रणालीच्या लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीकरिता प्रेरणा देवून कृती करण्यास उद्युक्त केले. भिन्न भिन्न राजकीय प्रणाली विषयक प्रवाह असतांनाही ते या चळवळीमध्ये सामावून गेलेत. पारतंत्र्याच्या शृंखलेतून भारताला मुक्त करण्यासाठी विविध वयोगटातील स्त्री-पुरुषांनी आपले तन-मन-धन अर्पण करून बलाढ्य अशा ब्रिटीश साम्राज्याला आपल्यापुढे गुडघे टेकण्यास भाग पाडले. स्वातंत्र्यप्राप्तीकरिता आपले सर्वस्व अर्पण करण्याची ही भावना देशात सर्वत्र होती. यात वर्धा जिल्हा आघाडीवर होता. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील वर्धा जिल्ह्याने जे योगदान दिले यावर मी माझ्या संशोधनातून प्रकाश टाकलेला आहे.

प्रस्तुत संशोधन कार्याशी संबंधित संदर्भग्रंथ खाजगी सरकारी व सार्वजनिक स्वरुपाची समकालीन कागदपत्रे या सर्वांचा विषयाच्या अनुषंगाने अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष हाती आले आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

१. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात वर्धा जिल्हा अग्रेसर होता.

२. विविध राष्ट्रवादी चळवळीचे स्फूर्तिस्थान व केंद्रस्थान वर्धा जिल्हा हे होते.

३. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्वातंत्र्यलढ्याच्या मसलती वर्धा येथे झाल्यात.

४. १९३६ मध्ये महात्मा गांधी वर्धेजवळ सेगांव येथे वास्तव्यासाठी आले तेव्हापासून वर्धा जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावर महत्व प्राप्त झाले.

५. स्वदेशी चळवळ, वंगभंग चळवळ, होमरुल आंदोलन यात वर्धा जिल्ह्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

६. असहकार आंदोलनात वर्धा जिल्ह्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली.

७. १९२३ च्या नागपूर झेंडा सत्याग्रहाचे वेळी वर्धा येथील सत्याग्रह आश्रमातील स्वयंसेवक सत्याग्रहात सहभागी होऊन हा सत्याग्रह यशस्वी झाला.

८. सविनय कायदेभंग चळवळीतही जिल्ह्याची भूमिका महत्त्वपूर्ण होती. मीठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, शस्त्र सत्याग्रह, दारुबंदी अभियान, अस्पृश्यता निवारण कार्य यातही जिल्हा अग्रेसर होता.

९. महत्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, पांडुरंग सदाशिव खानखोजे, जमनालाल बजाज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी वर्धा जिल्हा ही होती.

१०. वैयक्तिक सत्याग्रह व भारत छोडो आंदोलनात वर्धा जिल्हा आघाडीवर होता. भारत छोडो आंदोलनाचा निर्णय वर्धा येथेच घेण्यात आला.

११. महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्याची प्रयोगशाळा वर्धा जिल्हा ही होती.

एकंदरीत भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात वर्धा जिल्ह्याने अतिशय महत्वपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी बजावली, असे संशोधनाअंती स्पष्ट झाले.

# प्रश्नावली

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत मी डॉ. स्मिता मनोहरराव जाधव लघुसंशोधन करीत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा मंजूर झालेल्या माझ्या लघुसंशोधनाचा विषय ''भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील वर्धा जिल्ह्यातील योगदान'' हा आहे. लघुशोध प्रकल्पावरील संशोधन कार्याकरिता सर्व माहिती प्राप्त करण्याच्या हेतूने तसेच अभ्यासाच्या दृष्टीने मी ही प्रश्नावली तयार केली आहे. मला या प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती देण्याची कृपा करावी ही विनंती.

संशोधक

**डॉ. स्मिता म. जाधव**

कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा

ता. तिवसा, जि. अमरावती

# प्रश्नावली

## भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील वर्धा जिल्हयातील योगदान

### १) व्यक्तिगत माहिती

अ) व्यक्तिचे नांव :-

आ) पत्ता :-

इ) लिंग :-

ई) वय :-

उ) शिक्षण :-

ऊ) व्यवसाय :-

प्र. १ :- भारतीय स्वातंत्र्य आंदोलना संबंधी आपणांस माहिती आहे काय ?

होय ( ) नाही ( )

प्र. २:- राष्ट्रवादी चळवळीचे स्फूर्तिस्थान व केन्द्रस्थान वर्धा जिल्हा हे होते हे मत तुम्हास संयुक्तीक वाटते काय ?

होय ( ) नाही ( )

प्र. ३:- स्वदेशी चळवळ, वंगभंग चळवळ, होमरूल आंदोलन यातही वर्धा जिल्हयाची भूमिका अत्यंत महत्वाची होती असे आपणांस वाटते काय ?

होय ( ) नाही ( )

प्र. ४:- वरील सर्व आंदोलनासाठी कोणकोणत्या समाजबांधवांनी प्रचंड जनजागृती घडवून आणली? यासबंधी आपणांस माहिती आहे काय ?

होय ( ) नाही ( )

प्र.५:- वर्धा जिल्हयातील आष्टीचा स्वातंत्र्यलढा महत्वाचा ठरला यासंबंधी आपणांस माहिती आहे काय ?

होय ( ) नाही ( )

प्र. ६ :- अस्पृश्यता निवारणासंबंधी वर्धा जिल्हयाची भूमिका अत्यंत महत्वाची होती, यासंबंधी आपणास माहिती आहे काय ?

होय ( ) नाही ( )

प्र. ७ :- वर्धा येथील सत्याग्रहाश्रम हे राष्ट्रवादी विचारसरणीचे केंद्रस्थान होते याबाबत आपणांस कितपत माहिती आहे ?

होय ( ) नाही ( )

प्र. ८:- जनजागृती घडवून आणण्यासाठी वर्धा जिल्हयातील लोकांनी कोणत्या पद्धतीने भाग घेतला ? थोडक्यात मत लिहा.

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

प्र. ९ :- असहकार आंदोलनातील वर्धा जिल्हा अग्रेसर होता याबाबत आपणास माहिती आहे काय ? असल्यास थोडक्यात लिहा.

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

प्र. १० :- सविनय कायदेभंग व वैयक्तिक सत्याग्रह यात वर्धा जिल्हयाची कामगिरी महत्वाची होती. थोडक्यात लिहा.

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

प्र. ११ :- पवनार येथे विनोबा भावेंनी वैयक्तिक सत्याग्रहाला कशी सुरुवात केली यासबंधी आपणास माहिती आहे काय ?

होय ( ) नाही ( )

प्र. १२ :- दारुबंदीसाठी वर्धा जिल्हयाने कोणत्या पद्धतीने प्रयत्न केले ?

----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

प्र. १३:- भारत छोडो आंदोलनातील वर्धा जिल्हयाचा सहभाग महत्वपूर्ण होता. थोडक्यात लिहा.

----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

प्र. १४ :- असे म्हणतात की, महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्याची प्रयोगभूमी वर्धा जिल्हा होती याबाबत आपले काय मत आहे ?

----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

प्र. १५:- स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक गांधीवादी विधायक संस्था वर्धा जिल्हयात होत्या. थोडक्यात लिहा.

----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

**उत्तरदात्याचे नांव**

दिनांक -

स्थळ -






भारतीय स्वातंत्र्य लढयाचे केंद्रस्थळ : सेवाग्राम आश्रम



१६ ऑगस्ट १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्याचे साक्ष देणारे

हेच ते आष्टीचे पोलीस स्टेशन




१६ ऑगस्ट १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्याचे साक्ष देणारी काही क्षणचित्रे




हरिजनांसाठी खुले केलेले हेच ते लक्ष्मीनारायण मंदिर (वर्धा )




वर्धा येथील महिलाश्रम

# संदर्भ ग्रंथ सूची (REFERENCES)

## मराठी


| | | | |
|---|---|---|---|
| १) | अणे श्रीहरी<br>इंदापवार मंगेश (मराठी अनु.) | - विदर्भगाथा | - विसा बुक्स, नागपूर, २०१६ |
| २) | आठल्ये, डॉ. विभा अनिल | - भारताचा इतिहास(१५२६ -१७६१) | - विश्व पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, २०१६ |
| ३) | आचार्य, डॉ. धनंजय | - आधुनिक भारत (१७५०-१९७१) | - श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१७ |
| ४) | आचार्य, डॉ. धनंजय | - भारताचा इतिहास (१७६१-१९७१) | - श्री साईनाथ प्रकाशन, |
| ५) | काळे यादव माधव | - नागपूर प्रांताचा इतिहास | - काळे प्रकाशन, बुलढाणा |
| ६) | काळे, डॉ. एम. व्ही. (अनु.)<br>बिपीनचंद्र (मुळ लेखक) | - इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेन्डन्स | - के. सागर पब्लिकेशन, पुणे आवृत्ती ४ थी २०१० |
| ७) | कोलारकर डॉ. शं.गो. | - आधुनिक विदर्भाचा इतिहास | - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर आवृत्तील १ ली, २००३ |
| ८) | कोलारकर, डॉ. शं.गो. | - आधुनिक भारत (१७६०-१९५०) | - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००४ |
| ९) | कोठेकर, डॉ. शांता | - आधुनिक भारताचा इतिहास (१९४७-२०००) | - साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६ |
| १०) | कुळकर्णी, डॉ. विजय | - भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महाराष्ट्रीय सशस्त्रता | - विद्या प्रकाशन, नागपूर, २०१२ |
| ११) | कंटक, प्रेमा | - पुण्यधाम सेवाग्राम | - सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठाण १९६९ |
| १२) | गद्रे, डॉ. प्रभाकर | - विदर्भात संक्रमण काळ (१८०३-१८५३) | - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००८ |
| १३) | गद्रे, डॉ. प्रभाकर | - नागपूर राज्याचा उदय आणि आस्थापना | - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००१ |

| | | |
|---|---|---|
| १४) गाठाळ, डॉ.एस.एस. | - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१९६०) | - कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद २०१६ |
| १५) ग्रोवर, डॉ. बी.एल. बेल्हेकर, डॉ. एन.के. | - आधुनिक भारताचा इतिहास (१७०७ पासून आधुनिक कालखंडापर्यंत) | एस. चंद्र आणि कंपनी प्रा. लि. नवी दिल्ली, २०१६ |
| १६) चौधरी डॉ. कि.का. | - महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (वर्धा जिल्हा) | - दार्शनिक विभाग महाराष्ट्र शासन, आवृत्ती १९९२ |
| १७) जाधव, प्रा. वसंत | - आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास | - विद्या प्रकाशन, नागपूर, २००५ |
| १८) जाधव, प्रा. व्ही.के. | - आधुनिक भारताचा इतिहास (इ.स. १७६५ ते १९६१) | - विद्या प्रकाशन, नागपूर, २००४ |
| १९) जोशी वि. श्री. | - महाराष्ट्रातील कायदेभंगाचा इतिहास | - प्रकाशक वि.श्री.जोशी, मुंबई १९५१ |
| २०) थटेरे बलवन्त | - भारतीय राष्ट्रध्वजाचा इतिहास व आचारसंहिता | - नाथे पब्लिकेशन प्रा.लि. नागपूर, २०१२ |
| २१) पवार, डॉ. जयसिंगराव पवार, सौ. वसुधा | - आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास | विद्या प्रकाशन, नागपूर, २०१२ |
| २२) पाठक, डॉ. अरुणचंद्र शं. (संपादक) | - नागपूर जिल्हा-भाग-२ (महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर) | - दार्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २००५ |
| २३) पाठक, डॉ. दमयंती | - भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात वैदर्भीय महिलांचे योगदान | - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००३ |
| २४) पारधी मा. कृ. (अनु-) बिपीनचंद्र | - स्वातंत्र्याचा लढा | - नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया तिसरी आवृत्ती २००४ |
| २५) पांढरीपांडे, सु.श्री. | - महात्मा गांधींचे हिन्दस्वराज्य आणि नवे मन्वन्तर | - प्रतिमा प्रकाशन,पुणे,२०१० |
| २६) बापट, भ. ग. | - विनोबा | - राजहंस प्रकाशन, पुणे फेब्रुवारी , २००४ |
| २७) बैस, डॉ. विरेन्द्र गोपालसिंह | - वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास | - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५ |

२८) वक्काणी डॉ. नि.आ. - आधुनिक विदर्भाचा इतिहास (१८४७-१९५०) - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३

२९) वैद्य, डॉ. सुमन कोठेकर, डॉ. शांता - आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०) - श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१५

३०) वैद्य, डॉ. सुमन कोठेकर, डॉ. शांता - आधुनिक भारताचा इतिहास (१९२०-१९४७) - साईनाथ प्रकाशन,नागपूर, १९९४ नागपूर, २००९

३१) सावळे/मोरे डॉ. दीपा दिनेश- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१९०५) - एज्युकेशन पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१३

३२) कथले प्रकाश - लेख - वर्धा- श्रम आणि आश्रम संस्कृती, लोकराज्य, ऑक्टोबर २०१२, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

३३) महाराष्ट्राचे जिल्हे- वर्धा - माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

३४) दैनिक लोकमत - सेवाग्राम आश्रम अमृत महोत्सव विशेष दि. १६जुन २०११

३५) दैनिक लोकमत - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास (दीर्घ सदर) २००६

## हिंदी


१) अग्रवाल श्रीमन्नारायण - काँग्रेसजनो के लिए रचनात्मक कार्यक्रम - अ.भा. काँग्रेस कमिटी, नई दिल्ली

२) आर्यनायकम (संपादक) - नई तालीम के सात साल १९३८-१९४६ - हिंदुस्थान तालीम संघ सेवाग्राम १९४६

३) आलोक कुमार - काँग्रेस का इतिहास एवं कार्य - इंशिका पब्लिशिंग हाउस, जयपूर २०१२

३) गजरानी डॉ. शिव - आधुनिक भारत का इतिहास - विश्वकोष भाग १, अर्जुन पब्लि. हाउस, नई दिल्ली, २०१३.

४) गजरानी डॉ. शिव - आधुनिक भारत का इतिहास (१८५८-१९४७) अर्जून पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली

५) गजरानी डॉ. शिव - आधुनिक भारत का इतिहास - विश्वकोष भाग १, भाग २, व भाग ३ अर्जुन पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली, २०१३.

६) बजाज, रामकृष्ण (संपादक) - रचनात्मक राजनीती - सस्ता साहित्य मंडल, नई दिल्ली

७) बजाज कमलनयन - काकाजी -बापू- विनोबा - सस्ता साहित्य मंडल, नई दिल्ली

८) बारड डॉ. बी.आर - भारत के महान क्रांतिकारी - रावत प्रकाशन, नई दिल्ली,२०१६

९) भोया प्रो. गोबिन्दभाई - महात्मा गांधी के सम्पूर्ण आन्दोलन- रावत प्रकाशन,नई दिल्ली,२०१६

१०) मित्तल डॉ. ए.के. गुप्त डॉ. मानिकलाल शर्मा डॉ- पंकज - भारतीय इतिहास साहित्य भवन पब्लिकेशन,आगरा २००७

| | | | |
|---|---|---|---|
| ११) | रामगोपाल - | भारतीय स्वतंत्रता संग्राम का इतिहास | - भारत बुक सेंटर, लखनौ, द्वितीय संस्करण-२००६ |
| १२) | व्यास नंदकिशोर - | नागपूर नगर एवम् स्वतंत्रता | - तिडके प्रिंटींग प्रेस, नागपूर |
| १३) | वाला डॉ. डी.पी. - गायेती डॉ. यु.बी. | भारत का इतिहास (१८५७-१९४७) | - रावत प्रकाशन, नई दिल्ली, २०१५ |
| १४) | वालिया श्रीमती ममता - | महात्मा गांधी और जीवन कौशल शिक्षा | - क्रिसेन्ट पब्लिशिंग कॉरपोरेशन, नई दिल्ली, २०१५ |
| १५) | शुक्ला डॉ. नलिनी - | भारत का राष्ट्रीय आंदोलन | - इशिका पब्लिशिंग हाउस, जयपूर २०१० |
| १६) | ग्रोवर बी.एल. - मेहता अलका | आधुनिक भारत का इतिहास | - एस चंद अँड कंपनी प्रा. लि., दिल्ली, २०१५ |
| १७) | सक्सेना डॉ. विरेंद्रकुमार- | गांधी और अहिंसा शिक्षा | - रितु पब्लिकेशन, जयपुर, २०१५ |
| २०) | गांधीजी - | ग्रामोद्योग | - नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद -१४ |
| २१) | जाजू श्रीकृष्णदास - | अ.भा. चरखा संघ का इतिहास | - अ.भा. चरखा संघ, सेवाग्राम, १९५० |

# संदर्भ ग्रंथ सूची

# Bibliography

## English


| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Grover B.L. | - | Modern India History, S. Chand & Company Pvt. Ltd., Delhi, 2015. |
| 2) | Gajrani S. Ram | - | History of Modern India (1935-1947) Commonwelth Publishers, Delhi, 2013 |
| 3) | Gajarani S. Ram | - | Modern India (1905-1925) - Common welth Publication, Delhi, First Published, 2013 |
| 4) | Mahajan V.D. | - | Modern India Histroy - S. Chand & Company Pvt. Ltd., Delhi, 2016. |
| 5) | Meena Hemraj<br>Meena Kanta | - | Gandhi and Ambedkar - Book Enclave, Jaipur, 2013. |
| 6) | Meena Hemraj<br>Fernandez Preeti | - | Gandhi (A socio-political contributions to India Politics), Aadi Publications, Jaipur, 2013. |
| 7) | Sharma K.K.<br>(Compliler) | - | Intellectual Sandharba Maharashtra, Bhopal , Intellectual Book, Bureao, Val. II |

8) Maharashtra State Gazettieers : Wardha District (Revised Edition),1974

9) Central Provinces District Gazetteers : Wardha District, Govt. of Maharashtra,1987

# SUMMARY

**"Bhartiya Swatantrya Aandolanatil Wardha Jilhyatil Yogdan"**

## Introduction :-

U.G.C. sanctioned Minor Research Project on 'Bhartiya Swatantrya Aandolanatil Wardha Zilhyache Yogdan' in the period of 2015 to 2017 has been completed.

In Indian history "Indian freedom struggle is a revolutionary event. It was the largest movement in the modern history of world. It inspired all peoples & various ideological sections of the society. It was supported by the vision of independance through different political thinkers. To make India free from the bondage of British rule, each & every people of India have been sacrificed their lives and Wardha district became immortal in the Indian freedom struggle.

## Objective of the Research :-

Main objectives of this research work are as follows :

1) To explain the historical importance and the place of Wardha district.
2) To explain the contribution of Wardha district in India freedom struggle.
3) To explain the Wardha district as a constructive land of work for Ma hatma Gandhi.

Researcher tries to study the importance of Wardha district in the Indian freedom struggle and completed the objectives of the research.

## Methodology :-

For any research work the use of primary and secondary source for data connection is necessary work.

For this research work researcher visited verious libraries for the selection of historical books and for necessary data colection and data selection. Imoportant historical documents have been studied by the researcher for this purpose.

Researcher visited the place where freedom struggle have been taken place which gave the direction for this research work. Researcher visited the places such as Sevagram, Pawanar, Kharangna, Ashti, Talegaon, Wadala etc.

Researcher visited and discuss with the people who actualy work for this freedom struggle and write the conclude this research work.

**Conclusion** :-

Conclusions are found out after the study of the topic, they are as follows :-

1) Wardha district was the major centre for the Indian Independance Movement.
2) Wardha was the centre & inspiraton for the national movements
3) Regarding India freedom movement various important discussions, decisions hae been taken at Wardha.
4) In the year 1936, when Mahatma Gandhi staying in Segao, Wardha district is found more importance at national level.
5) Wardha district played an important role in 'Swadeshi Movement, Vangbhang Movement and Homrul Aandolan.'
6) Wardha district played very important role in Non-cooperation movement also.
7) In the year 1923, at the time of Zenda Satyagraha, Volenteers of Satyagraha Aashram were participated in it, and that Satyagraha became successful.
8) Wardha district also lead in Salt-March, Jungle Satyagraha, Civil Disobidiance Movement prohibition on alchohol, discrimination etc.

9) Wardha was functional land of Mahatma Gandhi, Aacharya Vinoba Bhave, Pandurang Sadashiv Khankhoje, Jamnalal Bajaj, Rashtra Sant Tukdoji Maharaj etc.

10) The historical decision of 'Quit India Movement' has been taken at wardha & Wardha is found importance in Quit India Movement. Personal satyagraha of 1940 has initiated from sevagram Aashram.

11) Wardha district was the functional land of Gandhiji for the constructive work. Many Institutions have been done constructive work at pre and post independance period.

## Problems & Remedies

While studying this project researcher found that during the British Era, the city Wardha got most important seats of the Indian National Movement. The contribution of this district in the Indian freedom struggle is noticable. At the time Wardha district become more important place for Indian freedom strugle not only in India but in the world. Many important decisions for Indian future have been taken in that environment. But after independance, this district is neglected and for away from the development point of view. There is no industrial, scientific and other development of the district found till today. While world is moving towards globalization, this district become backward than other development districts of India.

The past memories, historical places, monuments are the preceious assets of each nation and this should be protected & developed by the nation. But after independance, the historical places in this district

are not conserved or developed as the witness of our freedom struggle. Some of them are going to ruined & some are awaiting to reconstruct and conserve them.

To study the past of any nation capabl of shapping the present, which inspires the new generation. History helps the students to know where we come from, how the past & how we can shape our future. It also proves us the framework of knowledge that we need to build our entrire lives. It also take us closer to the past events and who were the personalities that helped to change our present.

From all this point of view researcher wants to note that the importance of Wardha district should be known by this young generation. Some of the tahasils of this district contributed in the Indian freedom struggle. Some of them are Sevagram, Pavanar, Kharangna, Aashti, Talegaon, Wadala, These place should be conserved and developed by the govt.. which inspires as the freedom struggle monuments.

Another this researcher wants to note that the history of this district should be include in the school syllabus, so the local importance should be known by the students from their school life & they should know the importance of Wardha district as an immortal place of the great Indian freedom struggle.